गुढी पडवा

# जनमाध्यम

Epaper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ अमरावती, गुरुवार १९ मार्च २०२६ ■ मूल्य ४.०० ■ पृष्ठ १०




## 1 एप्रिलपासून इलेक्ट्रॉनिक्स वस्तू महागणार

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था-**नवीन आर्थिक वर्ष सुरू होताच सर्वसामान्यांना महागाईचा फटका बसण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. उत्पादनासाठी




लागणा-या कच्च्या मालाच्या वाढत्या किमती आणि वाहतूक खर्चात झालेली वाढ यामुळे अनेक कंपन्यांनी आपल्या उत्पादनांच्या दरात वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे १ एप्रिलपासून इलेक्ट्र?निक्स तसेच वाहन क्षेत्रातील अनेक वस्तूंच्या किमती वाढण्याची शक्यता आहे. अलीकडील काळात प्लास्टिक, रेझिन आणि प?लिमर यांसारख्या कच्च्या पदार्थांच्या किमतीत मोठी वाढ झाली आहे. या घटकांचा वापर प्रामुख्याने इलेक्ट्र?निक्स उपकरणांच्या निर्मितीत केला जात असल्याने उत्पादन खर्च वाढला आहे. याशिवाय जागतिक स्तरावर मालवाहतूक दरांमध्येही वाढ झाली असून फ्रेट खर्च सुमारे ७ ते १० टक्क्यांनी वाढल्याचे उद्योग क्षेत्रातील सूत्रांनी सांगितले आहे. त्याचबरोबर अमेरिकन ड?लरच्या तुलनेत भारतीय रुपयाचे मूल्य सुमारे दोन टक्क्यांनी कमी झाल्यामुळे आयात होणारा कच्चा माल अधिक महाग झाला आहे. परिणामी कंपन्यांना उत्पादन आणि वितरणाचा खर्च वाढल्याने दरवाढ करण्याचा पर्याय निवडावा लागत आहे. या पार्श्वभूमीवर एप्रिल महिन्यापासून अनेक इलेक्टानिक्स उत्पादनांच्या किमती साधारण ५ ते १० टक्क्यांपर्यंत वाढू शकतात, असा अंदाज व्यक्त केला जात आहे. वाहन उत्पादक कंपन्यांनी १ एप्रिलपासून दरवाढ करण्याची घोषणा केली आहे.

# दिल्लीत अग्निकांड; 9 जणांचा होरपळून मृत्यू

## मृतांमध्ये 3 मुलांचा समावेश

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** देशाची राजधानी असलेल्या दिल्लीच्या दक्षिण-पश्चिम भागातील पालम परिसरामध्ये एका व्यावसायिक आणि निवासी इमारतीला अचानक मोठी आग लागल्याची भयंकर घटना घडली. या दुर्दैवी दुर्घटनेत निष्पाप तीन बालकांसह एकूण ९ जणांना आपला जीव गमवावा लागला. सध्या अग्निशमन दलाच्या अथक परिश्रमाने आग विझविण्यात आली आहे. मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, साध नगरमधील या बहुमजली इमारतीच्या सर्वांत खालच्या मजल्यावर असलेल्या एका सौंदर्यप्रसाधनांच्या दुकानाला सकाळी पहिल्यांदा आग लागली.पाहता पाहता या आगीने अत्यंत रौद्र रूप धारण केले आणि ती वेगाने वरच्या मजल्यांपर्यंत भडकली. काही क्षणांतच संपूर्ण वास्तूमध्ये प्रचंड काळा धूर पसरल्यामुळे आत अडकलेल्या रहिवाशांना बाहेर पडण्यासाठी कोणताही मार्ग उरला नाही. जीव वाचवण्यासाठी नागरिकांनी आरडाओरड सुरू केली, तर घाबरलेल्या अवस्थेत दोघांनी इमारतीवरून खाली उडी मारल्याचाही धक्कादायक प्रकार घडला. पालम मेट्रो स्टेशनजवळ असलेल्या लेन क्रमांक २ मधील या इमारतीला आग लागल्याची माहिती सकाळी साधारण सातच्या सुमारास अधिका-यांना मिळाली. या आणीबाणीच्या घटनेची माहिती मिळताच दिल्ली अग्निशमन दलाची तब्बल ३० वाहने घटनास्थळी दाखल झाली आणि त्यांनी युद्धपातळीवर मदतकार्य सुरू केले.आगीच्या ज्वाला आणि धुराच्या लोळात अडकलेल्या १० जखमींना जवानांनी बाहेर काढून उपचारांसाठी रुग्णालयात नेले. तसेच सुरुवातीला खाली उडी मारलेल्या दोन व्यक्तींनाही रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. दुर्दैवाने या भीषण दुर्घटनेत तीन लहान मुलांसहित ९ जणांचा मृत्यू झाला असून, आगीचे नेमके कारण अद्याप समजू शकलेले नाही.



**१० जणांचा वाचविण-यात यश-**दुर्घटनेत डाक्टरांनी नउ जणांना मृत घोषित केले. मृतांमध्ये प्रवेश (३५), कमल (४०), आशू (३२) यांच-या तीन अल्पवयीन मुलींचा समावेश आहे. आयजीआय रुग्णालयात दाखल ३८ वर्षीय महिलेचा उपचारापूर्वीच मृत्यू झाल-याचे डाक्टरांनी जाहीर केले. येथे एका पुरुषासह दोन वर्षांच्या चिमुरडीवर उपचार सुरू आहेत. सफदरजंग रुग्णालयात २५ टक्के भाजलेल्या तरुणाला दाखल करण्यात आले असून, आतापर्यंत एकूण १० जणांना वाचवून रुग्णालयात हलवण्यात आले आहे.

**मुख्यमंत्री रेखा गुप्तांनी व्यक्त केले तीव्र दुःख-**दरम्यान, दिल्लीच्या मुख्यमंत्री रेखा गुप्ता यांनी या घटनेबद्दल तीव्र दुःख व्यक्त करत दंडाधिकारी चौकशीचे आदेश दिले आहेत. तसेच दिल्लीचे नायब राज्यपाल तरनजीत सिंह संधू यांनीही या दुर्घटनेवर शोक व्यक्त करत पीडितांना सर्वतोपरी मदत करण्याचे आश्वासन दिले आहे.

## कार चार्जिंग करताना शार्ट सर्किट; 7 ठार

**इंदूर / वृत्तसंस्था-**मध्य प्रदेशची आर्थिक राजधानी असलेल्या इंदूरमध्ये मंगळवारी रात्री एक अत्यंत भीषण आणि मन सुन्न करणारी घटना घडली. प्रीती नगर भागात इलेक्ट्रिक कार चार्ज करत असताना झालेल्या शार्ट सर्किटमुळे घराला आग लागली. या आगीत घरात ठेवलेल्या ४ गॅस सिलिंडरचे एकापाठोपाठ एक स्फोट झाले, ज्यामध्ये ५ निष्पाप मुलांसह कुटुंबातील ७ सदस्यांचा होरपळून मृत्यू झाला.घराबाहेर उभी असलेली इलेक्ट्रिक कार चार्जिंगला लावलेली होती. रात्रीच्या वेळी चार्जिंग पाईंटमध्ये शार्ट सर्किट झाले.



घरामध्ये १५ हून अधिक गॅस सिलिंडर ठेवलेले होते. कारच्या चार्जिंग पाईंटला लागलेली आग वेगाने घराच्या आत पसरली. घराच्या तळमजल्यावर आणि पहिल्या मजल्यावर आगीच्या उष्णतेमुळे चार सिलिंडरचा भीषण स्फोट झाला. हा स्फोट इतका शक्तिशाली होता की घरातील व्यक्तींचा जागीच मृत्यू झाला.रात्रीची वेळ असल्याने सर्वजण गाढ झोपेत होते. मृतांमध्ये ७ महिने ते १२ वर्षे वयोगटातील ५ मुलांचा समावेश आहे. तिघांना वाचविण्यात आले असून हे घर प?लिमरच्या व्यापा-याचे होते. शिवाय घरामध्ये स्फोटक रसायने देखील होती. यामुळे भीषण आग लागली. त्यांच्या घरात एवढे सिलिंडर कुठून आले, याचा तपास पोलिस करत आहेत.

**बचाव कार्यात अडथळे-** परिसरातील गल्ल्या अत्यंत अरुंद असल्याने अग्निशमन दलाच्या गाड्यांना घटनास्थळी पोहोचण्यास विलंब झाला. स्थानिक नागरिकांनी मदतीचा प्रयत्न केला, पण सिलिंडरच्या स्फोटांमुळे आगीची तीव्रता एवढी होती की कोणालाही जवळ जाता आले नाही. ढिगा-याखालून मृतदेह बाहेर काढताना बचाव पथकाच्याही डोळ्यांत पाणी आले.
















जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

# तुरखेडात सोपीनाथ महाराजांची भव्य यात्रा

## गुढीपाडव्याला भक्तिमय वातावरणाची रेलचेल

**अंजनगाव सुर्जी / प्रतिनिधीः-** अंजनगाव सुर्जी तालुक्यातील तुरखेड (आलमपूर) येथे गुढीपाडवा निमित्त आयोजित करण्यात आलेला सोपीनाथ महाराज यात्रा महोत्सव (वर्ष ५२ वे) यंदा अत्यंत भक्तिमय वातावरणात आणि उत्साहात साजरा होत आहे. गावातील समस्त ग्रामस्थांच्या वतीने या भव्य धार्मिक सोहळ्याचे आयोजन करण्यात आले असून परिसरात आध्यात्मिक ऊर्जा आणि उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.



या यात्रा महोत्सवाची सुरुवात गुरुवार, दि. १२ मार्च २०२६ रोजी झालेली असून समारोप गुरुवार, दि. १९ मार्च २०२६ रोजी होणार आहे. आठ दिवस चालणाऱ्या या सोहळ्यात अखंड हरिनाम सप्ताह, श्री ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण, संगीतमय शिवमहापुराण कथा तसेच नामसंकीर्तन महोत्सव अशा विविध धार्मिक कार्यक्रमांची रेलचेल पाहायला मिळत आहे.

दररोज पहाटे ५ ते ६ वाजता काकड आरती, त्यानंतर सकाळी ६ ते ११ ज्ञानेश्वरी पारायण, दुपारी २ ते ५ शिवमहापुराण कथा, सायंकाळी ६ ते ७ हरिपाठ आणि रात्री ९ ते ११ कीर्तन असा नियोजित कार्यक्रम होत आहे.

शिवमहापुराण कथा प्रवक्ते म्हणून प्रसिद्ध प्रवचनकार ह.भ.प. दादा महाराज पाटील (नांदुरा) यांचे मार्गदर्शन लाभत असून त्यांच्या प्रभावी कथेमुळे भक्तांना अध्यात्मिक ज्ञानाची मेजवानी मिळत आहे.

ज्ञानेश्वरी व्यासपीठाचे नेतृत्व ह.भ.प. श्रीधर महाराज अवारे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडत आहे. सप्ताहादरम्यान दररोज वेगवेगळ्या कीर्तनकारांचे कीर्तन आयोजित करण्यात आले असून त्यामध्ये गुरुवार, दि. १२ मार्च रोजी ह.भ.प. केशव महाराज हगवने, शुक्रवार, दि. १३ मार्च रोजी ह.भ.प. श्रीधर महाराज अवारे, शनिवार, दि. १४ मार्च रोजी ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज वाघ, रविवार, दि. १५ मार्च रोजी ह.भ.प. यशवंत महाराज चौखंडे, सोमवार, दि. १६ मार्च रोजी ह.भ.प. मंदार महाराज पाटील, मंगळवार, दि. १७ मार्च रोजी ह.भ.प. पुरुषोत्तम महाराज बावस्कर, बुधवार, दि. १८ मार्च रोजी ह.भ.प. विठ्ठल महाराज तेल्हारकर आणि गुरुवार, दि. १९ मार्च रोजी ह.भ.प. दादा महाराज पाटील यांचे कीर्तन होत आहे.

या महोत्सवात विविध संत-महंत व कीर्तनकारांची विशेष उपस्थिती व मार्गदर्शन लाभत असून त्यामध्ये ह.भ.प. विष्णु महाराज राऊत, ह.भ.प. रमेश महाराज अवारे, ह.भ.प. श्रीधर महाराज अवारे, ह.भ.प. राम महाराज गाळे, श्री पुरुषोत्तम महाराज तळोकार, श्री गोकुळ महाराज ढेपे (तुरखेड) तसेच ह.भ.प. पुरुषोत्तम महाराज मानकर यांचा समावेश आहे.

यात्रेचे विशेष आकर्षण म्हणजे मंगळवार, दि. १७ मार्च रोजी सकाळी ७ वाजता भव्य कावड यात्रा संपन्न झाली. तसेच बुधवार, दि. १८ मार्च रोजी गणेश पुंडलिकराव मोंढे यांच्या निवासस्थानी दिंडीकऱ्यांसाठी स्नेहभोजनाचे आयोजन करण्यात आले. याच दिवशी रात्री १२ वाजल्यापासून गावातून सोपीनाथ महाराजांची भव्य रथयात्रा व ढोल-दिंडी मिरवणूक मोठ्या उत्साहात पार पडणार आहे. या मिरवणुकीत गावातील तसेच परिसरातील हजारो भाविकांनी उत्स्फूर्त सहभाग राहणार आहे.

महोत्सवाच्या समारोपाच्या दिवशी म्हणजे गुढीपाडवा, गुरुवार दि. १९ मार्च रोजी दुपारी १ वाजता सोपीनाथ महाराज संस्थानच्या वतीने भव्य महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले असून मोठ्या संख्येने भाविकांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. यासोबतच महोत्सवात मृदुंगाचार्य म्हणून ह.भ.प. पांडुरंग महाराज गोरे व ह.भ.प. निवृत्ती महाराज बोपुलकर यांनी साथ दिली असून गायनाचार्य म्हणून ह.भ.प. किशोर महाराज सोमवंशी, ह.भ.प. जगदीश महाराज धोंडगे तसेच ह.भ.प. मदन गोपाल महाराज ठाकरे यांनीही आपली सेवा अर्पण केली आहे. एकूणच, सोपीनाथ महाराज यात्रा महोत्सव हा गावाच्या धार्मिक परंपरेचा, श्रद्धेचा आणि सामाजिक ऐक्याचा अनोखा संगम ठरत असून या सोहळ्यामुळे तुरखेड (आलमपूर) परिसर पुन्हा एकदा भक्तिरसात न्हाऊन निघत आहे. ही माहिती संस्थानचे सुदर्शन मधुकरराव वाघ (तुरखेड) यांच्याकडून प्राप्त झाली.

# महापौरांनी केली रस्त्याच्या कामाची पाहणी; तात्काळ काम सुरू करण्याचे निर्देश

**अमरावती/प्रतिनिधी:-** अमरावती महानगरपालिकेचे महापौर श्रीचंद तेजवाणी यांनी आज, बुधवार दिनांक १८ मार्च २०२६ रोजी पोद्दार शाळेजवळील डांबरीकरण रस्त्याच्या बंद पडलेल्या कामाची प्रत्यक्ष पाहणी केली. सदर रस्त्याचे काम काही दिवसांपासून बंद असल्यामुळे परिसरातील नागरिकांमध्ये नाराजी निर्माण झाली होती तसेच महापौरांना याबाबत पोद्दार शाळेने निवेदन देण्यात आले होते. त्या अनुषंगाने महापौरांनी स्वतः स्थळी भेट देत परिस्थितीचा आढावा घेतला.

पाहणीदरम्यान महापौर श्रीचंद तेजवाणी यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांना रस्त्याचे डांबरीकरण काम तात्काळ पुन्हा सुरू करण्याचे स्पष्ट निर्देश दिले. नागरिकांना होणारी गैरसोय लक्षात घेऊन काम विलंब न करता नियोजनबद्ध आणि दर्जेदार पद्धतीने पूर्ण करावे, असे त्यांनी सांगितले.



याावेळी परिसरातील नागरिकांनी रस्त्यालगत वाढलेल्या झुडपांमुळे वाहतूक तसेच पादचाऱ्यांना अडथळा निर्माण होत असल्याची समस्या मांडली. त्याची तत्काळ दखल घेत महापौरांनी उद्यान विभागाला रस्त्यालगत असलेली झुडपे व अनावश्यक वाढलेली झाडांची फांदी कमी करून परिसर स्वच्छ व सुरक्षित करण्याच्या सूचना दिल्या. नागरिकांना दिलासा मिळेल अशा पद्धतीने त्वरित कार्यवाही करण्याचे आदेश त्यांनी दिले.

महापौरांनी सांगितले की, 'नागरिकांच्या दैनंदिन वाहतुकीसाठी हा रस्ता महत्त्वाचा असून कामात होणारा विलंब सहन केला जाणार नाही. गुणवत्ता राखून आणि सुरक्षिततेची काळजी घेत काम लवकर पूर्ण करणे आवश्यक आहे.'

महापौरांच्या निर्देशानंतर सार्वजनिक बांधकाम विभागाने रस्त्याचे काम पुन्हा सुरू करण्याची कार्यवाही हाती घेतली असून परिसरातील अडथळे दूर करण्याचे कामही तत्काळ करण्यात येणार आहे.

या पाहणीदरम्यान सार्वजनिक बांधकाम विभाग उपविभाग क्र.२ चे उपविभागीय अभियंता विनोद बोरसे, शाखा अभियंता सुनील जाधव, श्रीकांत गिरी, महेश जोशी, संबंधित अधिकारी-कर्मचारी तसेच परिसरातील नागरिक उपस्थित होते.

# एकता रॅलीच्या अध्यक्ष पदी समाजसेवक चंद्रकुमार जाजोदिया यांची निवड



**अमरावती/प्रतिनिधीः-** संपूर्ण महाराष्ट्रभर जातीय सलोखा व राष्ट्रीय एकात्मता करिता प्रसिद्ध असणारी एकता रॅली आयोजन समिती अमरावती व अभिजीत बहुउद्देशीय सामाजिक विकास संस्था अमरावती. याद्वारे मागील सत्तावीस वर्षापासून विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती दिन उत्सव समारंभ विविध जाती-धर्माच्या अनुयायांना घेऊन जयंती उत्सव साजरा करण्यात येतो. समितीचे वैशिष्ट्य म्हणजे दरवर्षी बौद्धतर समाजातील प्रतिष्ठित व्यक्तींना

समितीचे अध्यक्ष पद देण्यात येते. अमरावती शहरातील नव्हे तर महाराष्ट्रातील अनेक मान्यवरांनी एकता रॅली आयोजन समितीचे मानाचे अध्यक्षपद आजपर्यंत भूषविले आहे. ही परंपरा एकता रॅलीने कायम ठेवलेली आहे. हे विशेष उल्लेखनीय आहे.

अमरावतीचे सुप्रसिद्ध ज्येष्ठ समाजसेवक, व महाराष्ट्राचे उद्योगपती चंद्रकुमार जाजोदिया उर्फ लप्पी भैया हे मागील २००७ पासून एकता रॅली समिती सोबत जुळलेले आहेत. त्यांना एकोणीस वर्षा पूर्वी २००७ मध्ये समितीचे अध्यक्ष पद देण्यात आले होते.

एकंदरीत सामाजिक व धार्मिक कार्य बघता, व राष्ट्राप्रती समर्पित भाव बघता परत एकदा त्यांना समितीचे २०२६ चे महत्वाचे व मानाचे अध्यक्ष पद बहाल करण्यात आले आहे.

दिनांक १७ मार्च २०२६ ला सायंकाळी ५ वाजता समितीचे मुख्य संयोजक समजभूषण राजूजी नन्नावरे व समितीचे माजी अध्यक्ष तुषार वरणगावकर यांनी चंद्रकुमार जाजोदिया यांचे नावाची घोषणा करून अध्यक्षपदाची माळ त्यांच्या गळ्यात टाकली. आकर्षित पुष्प माला व शाल , भीमपर्व अंक भेट स्वरूपात देण्यात आली. त्यांना या आनंदाच्या प्रसंगी पेढा भरविण्यात आला. चंद्रकुमार जाजोदिया यांचे राहते घरी समितीचे सदस्य यांनी जाऊन त्यांचा सन्मान केला.

या प्रसंगी मुख्य संयोजक समजभूषण राजूजी नन्नावरे यांनी एकता रॅलीची भूमिका विषध करून, समितचे अध्यक्ष पद बौद्धेतर समाजातील व्यक्तीनाच का देण्यात येते या बाबत समितीची भूमिका स्पष्ट करून चंद्रकुमार जाजोदिया यांच्या नावाची अध्यक्ष पदारिता निवड करून घोषणा केली. उपस्थित सर्व समिती प्रमुखाणी टाळ्या वाजून एकमुखी सहमती दिली.

मावळते अध्यक्ष तुषार वरणगावकर यांनी समितीचे राबविण्यात येणारे वर्षभर उपक्रम, समितीचा राष्ट्रीय एकात्मता, जातीय सलोखा हा उद्देश याची प्रशंसा करून आपण समिती बरोबर कायम राहू व मी पण पुन्हा येईल पुन्हा येईल असा सकारात्मक संदेश दिला.

लप्पी भैया जाजोदिया यांनी एकता रॅली ची मुक्त कंठाणे प्रशांसा करून समजभूषण

राजूजी नन्नावरे यांच्या मेहनत, जिद्द, चिकाटी व निर्भीड स्वभावाची तारीफ करून समाजभूषण हे खरोखर नावाप्रमाणे कार्याने समाजभूषण आहेत.

मागील २७ वर्षा पासून हा ऐकतेचा गाढा ते मोठ्या हिमतीने व अपार कष्टाने पुढे नेत आहेत. कोणतेही कार्य वर्षनवर्षे सुरु ठेवणे ही बाब पाहिजे तेवढी सोपी नाही. मात्र एकता रॅली याला अपवाद ठरली आहें.

भविष्यात एकता रॅली चा हा इतिहास नक्कीच सुवर्ण अक्षरात लिहिला जाईल यात तिळमात्र शंका नाही. मला आपण परत एकदा समितीचे अत्यंत मानाचे असणारे अध्यक्ष पद दिले, मी समितीला पूर्ण पणे सहकार्य करेलच व पुढेही आपल्या कार्यात निरंतर सहभागी असणार अशी ग्वाही दिली.

अध्यक्ष पदाची घोषणा होतास राजूजी नन्नावरे व तुषार वरणगावकर यांनी भव्य आकर्षक हार, शाल, व भीम पर्व अंक २००७ आणि २०२५ भेट दिला. या वेळी समितीचे इतर मान्यवर, एल. जे. वानखडे, मोहन इंगळे,, सलीम भाई मीरावाले,लोभेश्वर रंगारी,राजेश फुले,अरुण बनारसे, म्हल्हार आदिनी पुष्प माला ने स्वागत करून शुभेच्या दिल्यात.

या वेळी समिती तर्फे संचालन सलीम भाई मीरावाले यांनी केले तर आभार प्रदर्शन मोहन इंगळे यांनी केले. असे समिती चे प्रसिद्धी प्रमुख राजेश फुले यांनी प्रसिद्धी पत्रकार द्वारे कळविले आहें.

## १ व १० वरिल उर्वरित

### इन्स्टाग्रामवर प्रेम, गरोदर

राहायची. एप्रिल २०२५ मध्ये इन्स्टाग्रामवर या महिलेची ओळख रेहान मोहम्मद शेख याच्याशी झाली. इन्स्टाग्रामवर मेसेज झाल्यानंतर दोघांनी मोबाईल नंबर एकमेकांना दिले. त्यानंतर दोघांमधील संवाद वाढत गेले आणि प्रेमसंबंध निर्माण झाले. आरोपीने महिलेला लग्न करू म्हणून विश्वास संपादन केला. त्यानंतर महिलेला १९ मे २०२५ रोजी अमरावती वरून छत्रपती संभाजी नगरला बोलावले. तिथून महिलेला तो राजनगावला घेऊन गेला. तिथे दोन दिवस त्याने महिलेसोबत शरीरसंबंध ठेवले.आरोपी अमरावतीला गेला. महिलेला तिच्या आईच्या घरी जाऊन भेटला. तिथेही त्याने तिच्या सोबत शरीर संबंध ठेवले. त्यानंतर महिला गर्भवती राहिली. तिने त्याच्याकडे लग्नाची मागणी केली. मात्र आरोपीने लग्नास नकार देण्यास सुरूवात केली.आरोपीने महिलेकडे गर्भपात करण्यासाठी दबाव टाकला. तू गर्भपात केला नाही, तर जिवे मारेन अशी धमकी दिली. आरोपीकडून धमक्या दिल्या जात असल्याने महिलेने फ्रेजरपुरा ठाण्यात तक्रार दिली. त्यानंतर पोलिसांनी गुन्हा दाखल करून हा गुन्हा वाळूज एमआयडीसी पोलिसांकडे वर्ग केला आहे.

### रिक्त पद भरतीसाठी

बंजारा समाजासाठी समिती बनवून आदिवासी विकास विभागाचे फंड खर्च नाही झाले पाहिजे. दीनदयाल योजनेची मर्यादा रद्द करा, बोगस आदिवासींची नियुक्ती करण्यात आलेले पद रिक्त करून त्यांच्या जागी आदिवासींची भरती करा. शबरी योजना मध्ये १० लाखापर्यंत विना व्याज लोन द्या, अमरावती मध्ये ट्रायबल उपकेंद्र सुरू करा, आदिवासी विद्यार्थ्यांसाठी होस्टल सह इतर मागण्या करण्यात आल्या. आंदोलन करणाऱ्यांमध्ये रोहित झाकडे, प्रवीण काळे, राहुल भलावी, सौरभ सुरतने, हरिदास सावलकर, ऋषिकेश सोलकर, शंकर कोपसे, निखिल शेडमाके, रामेश्वर तोटा, निलेश उईके,शिव भिल, सागर देवकर, विकास शेळके, आकाश वाघमारे, संदीप हनमले सह आदिवासी विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी होते.

### साई मार्केटिंगमध्ये अग्नीतांडव

विभागाला दिली. माहिती मिळतात अग्निशमन विभागाचे पथक घटनास्थळी दाखल झाले.आगीची दाहकता लक्षात घेता अग्निशमन नियंत्रण कक्षावरून अतिरिक्त मदत मागविण्यात आली. अग्निशमन विभागाने शर्तीचे प्रयत्न करून आगीवर नियंत्रण आणले. तो पर्यंत कन्फेशनरी साहित्य, टाटा एस वाहन ,कम्प्युटर, टीव्ही कॅमेरे, दोन लॅपटॉप, फर्निचर सह ५ लाखांचे साहित्य जळून खाक झाले होते. सुदैवाने या घटनेत कोणीही जखमी नाही झाले. अचानक लागलेल्या आगीमुळे एकच खडबड उडाली होती. नागरिकांची बरीच गर्दी होती. माहितीनुसार दुकानासमोर असलेल्या छपराखाली एमएच २७ एक्स ७५४८ टाटा एक्स मध्ये मोठ्या प्रमाणात कागदी भरलेले होते. सुरुवातीला या पुठ्ठयांनी पेट घेतला आणि त्यानंतर झालेल्या विजेच्या प्रभावातील बिघाडामुळे आगीने भीषण रूप धारण करून संपूर्ण दुकानाचा ताबा घेतला. यामध्ये दुकानातील मौल्यवान लाकडी फर्निचर विक्री साहित्य आणि इतर सामग्री जळून खाक झाली.

अग्निशमन विभागाच्या ५ वाहनांनी दोन तासाच्या अथक प्रयत्नानंतर आगीवर नियंत्रण मिळविले. तोपर्यंत लाखोचे नुकसान झाला होते. केंद्रप्रमुख प्रेमानंद सोनकांबळे यांच्या आदेशानुसार वाहन चालक संजय चव्हाण, राजकुमार खडसे, शेख अमीन, मनीष उताणे, राहुल घोडे, निखिल चौधरी, ताहीर शेख, श्याम भोपळे, मुजाहिद, यावले यांनी आग विझवण्यासाठी प्रयत्न केले.

### चित्रा चौक ते नागपूर गेट

आयुक्त संजय खताळे यांनी केलेले आहे. या दरम्यान पर्याय मार्गाचा वापर करण्याचे आवाहन केले आहे.उडानपुलावर स्लॅब, क्युरिंग लोखंडी ट्रसल काढणे सह इतर कार्य करण्यात येत आहे. यामुळे मार्गावर सर्व प्रकारची वाहतूक सर्वसामान्य नागरिकांसाठी बंद करण्यात आली आहे. आज रात्रीपासून हा आदेश लागू करण्यात आलेला आहे. नियमाचे उल्लंघन करणाऱ्यांवर कार्यवाही करण्यात येणार आहे.

**हे मार्ग राहणार बंद-** -टांगा पडाव ते नागपूर गेट चौक पर्यंत सर्व प्रकारच्या वाहनांना प्रवेश बंदी -चित्रा चौक ते नागपूर गेट पर्यंत जड व हलके मालवाहू , बसेस इत्यादी वाहनांना प्रवेश बंदी राहील

**पर्यायी मार्ग-** -टांगा पडाव -जवाहर गेट-सक्करसाथ -नागपूर गेट -दीपक चौक, चौधरी चौक, आदर्श हॉटेल, पिंजारा मज्जिद मार्गे नागपूर गेट या मार्गावर फक्त दुचाकी, कार ,ऑटो जाणार आहे.

### दर्यापूरात एसटीच्या चालकाचा

नेहमीप्रमाणे आपल्या पत्नीला दर्यापूर बसस्थानकातून अंजनगाव सुर्जी येथे सोडण्याकरीता आले होते. बराच वेळ झाल्यानंतर सकाळी ११ वाजताच्या सुमारास नामफलक नसलेली एम.एच.४० वाय ५३७२ बस डेपोत आली. यावेळी विशाल खंडारे यांनी नामफलक नसल्याने बसचालकास हि बस कोणत्या मार्गाने कोठे जाणार आहे, अशी विचारणा केली. यावर चालकाने उद्धटपणे उत्तर देवून शाब्दिक वाद घातला. या अपमानास्पद प्रकारानंतर विशाल खंडारे यांनी आगार व्यवस्थापक आशिष बाहुलकर यांच्याकडे लेखी तक्रार दिली असून संबंधित बस चालकांवर योग्य ती कारवाई करण्याची मागणी केली आहे.

### श्रीक्षेत्र सावंगा (विठोबा) नगरीत

आहे. चांदूररेल्वे तालुक्यातील सावंगा विठोबा अवधूत महाराज मंदिरात महाराष्ट्र सह इतर राज्यातील लाखो भाविक गुढी पाडव्याच्या शुभ दिवसी श्रीकृष्ण अवधूत महाराजांचे दर्शन करण्यासाठी येतात.

१९ मार्च रोजी संस्थानचे विश्वस्त चरणदास कांडलकर यांच्या हस्ते आणि लाखो भाविकांच्या उपस्थितीत झेंड्याना खोल चढविली जाते तर गुढी पाडवा ते रामनवमी दरम्यान संस्थानच्या वतीने विविध धार्मिक कार्यक्रम आयोजित करण्यात येते. त्यात अवधूत भजन, रमणा, पालखी रथ आणि महाराजांच्या ओवीवर प्रवचन कार्यक्रम तर रामनवमीनिमित्त चंदनउटी आणि रमणा,चैत्र मास मांडीच्या वाढव्यास अजर्जानी प्रारंभ व मंदिर संस्था तर्फे दैनिक भोजन प्रसाद भक्तांसाठी सुरू असते तर श्रीक्षेत्र सावंगा (विठोबा) नगरीत गुढीपाडवा, रामनवमी यात्रा महोत्सवात लाखों भक्ताचा जनसागर उसळणार आहे.

### मध्यरात्री अवकाळी पावसाचा

दल यांना कॉल केला. नगर परिषद चांदुर रेल्वेचे कर्मचारी यांनी तात्काळ घटना स्थळी येऊन वीज पडल्याने आग निर्माण झाली असता विझवण्याचा प्रयत्न केला. यावेळी मध्य रात्री परिसरातील नागरिकांनी सुद्धा धावपळ करून आग नियंत्रणाचे प्रयत्न केले. मात्र शहरात एवढी मोठी घटना घडली असता कुठल्याही प्रशासकीय अधिकाऱ्यांनी या घटनास्थळी भेट दिली नाही. त्यामुळे परिसरातील नागरिकांमध्ये प्रशासकीय अधिकाऱ्यांबद्दल नाराजी व्यक्त केल्या जात आहे.

### अवैध वाळू तस्करी करणारा ट्रक

२.५० लाखाचा दंड ठोठावला आहे. हा ट्रक अमरावती तहसील कार्यालयामध्ये जमा करण्यात आला आहे. माहितीनुसार ट्रक एमएच २७ बीएक्स ४७०० रॉयल्टी पासच्या विना अवैध रेतीची तस्करी करत असल्याची माहिती महसूल विभागाच्या पथकाला मिळाली. यावरून पथकाने जुनी वस्ती येथील चमन नगर जवळ चालकाला रॉयल्टी पास बद्दल विचारले तर त्याच्याजवळ नव्हती. यामुळे चालकाला २.५० लाखांचा दंड ठोठवला आणि ट्रक जप्त केला. उपविभागीय अधिकारी अनिल भटकर यांच्या मार्गदर्शनात कारवाई मध्ये नायब तहसीलदार टीना चव्हाण, मंडळ अधिकारी विशाल धोटे, यशवंत चतुर, गजानन हिवसे, तलाठी विजया देशमुख, गोपाल लांजेवार, सुरज रताळे, पवन बोंडे, राजेश दंदे यांनी सहभाग घेतला.

### सणांच्या पार्श्वभूमीवर सोशल

शोभायात्रा व इतर सार्वजनिक कार्यक्रमांदरम्यान भडक घोषणाबाजी, आक्षेपार्ह फलक, उत्तेजक गाणी किंवा वादग्रस्त देखावे यावर बंदी घालण्यात आली आहे.

तसेच, सोशल मीडियावर जातीय किंवा धार्मिक भावना दुखावतील असे पोस्ट, व्हिडिओ किंवा संदेश प्रसारित केल्यास संबंधित व्यक्तींविरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ अंतर्गत गुन्हा नोंदविण्यात येणार आहे. अफवा पसरविणे किंवा चुकीची माहिती व्हायरल करणे यालाही पोलिसांनी गंभीरतेने घेतले आहे. पोलीस आयुक्त राकेश ओला यांच्या निर्देशानुसार जारी आदेशात नागरिकांना संयम पाळण्याचे आवाहन करण्यात आले आहे. सणांचा आनंद साजरा करताना कायद्याचे भान ठेवावे आणि कोणत्याही प्रकारे सामाजिक सौहार्द बिघडणार नाही याची खबरदारी घ्यावी, असेही सांगण्यात आले आहे. एकूणच, सणकाळात शहरात शांतता राखण्यासाठी पोलिसांनी 'अलर्ट मोड' घेतला असून, प्रत्येक हालचालीवर बारीक नजर ठेवली जाणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

### नगरसेवक सय्यद मुनज्जर अली

यांनी युक्तिवाद केला. माहिती नुसार २० फेब्रुवारी रोजी झालेल्या सर्वसाधारण सभेमध्ये एमआयएम गटनेता शेख हमीद शेख वाहेद यांनी स्वीकृत नगरसेवक म्हणून सै.मुनज्जर यांचे नाव प्रस्तावित केले होते. एमआयएमच्या वतीने त्यांची स्वीकृत नगरसेवक म्हणून नियुक्ती करण्यात आली. सभा संपल्यानंतर माहित झाले की, सै.मुनज्जर महानगरपालिका मध्ये कंत्राटदार आहे. यामुळे त्यांना शो कॉज नोटीस पाठविण्यात आली होती. आयुक्तांनी त्यांची सदस्यता रद्द केली. याला त्यांनी हायकोर्टात आव्हान दिले आणि हायकोर्टाने प्रथम सुनावणी दरम्यान त्यांना दिलासा दिला आहे. यामुळे सय्यद मुनज्जर यांचे नगरसेवक पद कायम राहणार आहे.

### शुध्दीपत्रक

**दि.१८/०३/२०२६ रोजी प्रसिध्द झालेल्या जाहीरातीमध्ये चुकीची दुरुस्ती.**

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने अवसायनातील संस्थेची नोंदणी रद्द करण्याबाबत अंतीम अवसायन सभेची नोटीस दिनांक १८ - ०३ - २०२६ रोजीच्या आमच्या वृत्तपत्रात प्रकाशीत करण्यात आली होती. तथापि, सदर जाहिरातीत अनावधाने अंतीम सर्वसाधारण सभा दिनांक २७/०४/२०२६ नमूद करण्यात आली होती. त्या ऐवजी अंतीम सर्वसाधारण सभा दिनांक २७/०३/२०२६ असे वाचण्यात यावे. ही विनंती.

**व्यवस्थापक,**
**जनमाध्यम**

### जाहिरनामा / सायटेशन

**दिवाणी न्यायालय वरीष्ठ स्तर, अमरावती**
**वि. श्री. एस.एस. भिंगारदेव ८ वे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, अमरावती यांचे न्यायालयात**

किरकोळ अर्ज क्र.४३९/२०२६ **श्री. शेल मुझामिल अधिक दोन विरुध्द निरंक** पुढील तारीख ०७.०४.२०२६

अर्जदार - **1. Shaikh Muzammil s/o Shaikh Rauf,** Age 34 yrs, Occu. Labour, R/o. Noor Nagar, Amravati, Tq. & Dist. Amravati.

**2. Anis Fatima w/o Taslim Khan,** Age-37 yrs, Occu. Household, R/o. Mukeripura, Achalpur, Tq. Achalpur Dist. Amravati.

**3. Nilofar Tabsum w/o Fateh Mohammad Khalid Khan**
Age-40 yrs, Occu. Household Saima Colony, Paratwada, Tq. Achalpur Dist. Amravati.

**विरुध्द-गैरअर्जदार- निरंक**

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की **मयत शेख रऊफ s/o शेख इब्राहिम** हे **१२.०२.२०२०** रोजी अमरावती ता.जि अमरावती येथे व मयत **राजीया बानो w/o शेख रऊफ** हया **२८.०४.२०१६** रोजी अमरावती ता.जि. अमरावती येथे मयत झाले. अर्जदार **शेख मुझामिल अधिक दोन विरूध्दध निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे. त्यापेक्षा श्री. शेख मुझामिल अधिक दोन विरूध्दध निरंक वरीलप्रमाणे सवर्ह ममतांचे वारसदार नव्हे असे कोणांस समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की जर सबहू मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्दू कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिल्यास त्यांना सवहू मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि. १६.०३.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले

शिक्का

**आदेशानुसार**
**सहायक अधिक्षक दिवाणी न्यायालय**
**वरिष्ठ स्तर, अमरावती**

### सायटेशन/जाहिरनामा

**विद्यमान व्यवहार न्यायाधिश साहेब (कनिष्ठ स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात**

आर.एम.जे.सी.क. १०७/२०२६ ने.ता. १७/०४/२०२६६

**अर्जदार- १) श्रीमती सुनिता केशवराव बिजवे,** वय-५० वर्ष, व्यवसाय-घरकाम
**२) कुणाल केशवराव बिजवे,** वय-२१ वर्ष,व्यवसाय-शेती
**३) कु. वृषाली केशवराव बिजवे,** वय-१९ वर्ष,व्यवसाय- शिक्षण सर्व रा.अंबाडा, ता. मोर्शी, जि. अमरावती.**४) सौ. निकीता निकेश श्रीराव,** वय-२४ वर्ष,व्यवसाय- घरकाम रा. वार्ड नं.५ काकदरा, पो. तळेगांव, ता. आष्टी, जि. वर्धा.

**//विरूध्द// कोणीही नाही**

वरील सर्व अर्जदारांनी विद्यमान दिवाणी न्यायाधिश साहेब, (कनिष्ठ स्तर) मोर्शी यांचे न्यायालयांत वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत सेक्शन २, बॉम्बे रेग्युलेशन (८) १८२७ प्रमाणे प्रकरण दाखल केलेले आहे. अर्जदाराप्रमाणे अर्जदार नं.१ चे पती तर अर्जदार नं.२ ते ४ चे वडील नामे **केशवराव बापुराव बिजवे** हे दिनांक ०५/०९/२०२५ रोजी Ambada, Tq.Morshi, Dist-Amravati येथे मय्यत झालेले आहे त्यांचे मृत्युनंतर त्यांचे वारस हे वरीलप्रमाणे आहे तसेच मयताचे नांवे असलेल्या शासकिय व निमशासकिय अभिलेखांत नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदर प्रकरण दाखल केलले आहे. मयताला वरील अर्जदारांशिवाय इतर कोणतेही वारस नाही तेव्हा या जाहिर नोटीसद्वारे कळविण्यांत येते की, जर कुणालाही सदर अर्जदारांचे प्रकरणांवर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एका महिण्याचे आंत विद्यमान न्यायालयांत आपला लेखी आक्षेप सादर करावा अन्यथा कोणालाही आरोप बरहीर कर समजुन पुढील कार्यवाही करण्यांत येईल.

शिक्का

**आदेशान्वये**
**सहायक अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय, मोर्शी.**

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय
अकोला । वाशिम । बुलडाणा
■ गुरुवार, १९ मार्च २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४
paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com

# आदिवासी भागातील रस्त्याचे काम रखडले

## पाण्याच्या टाकीवर चढून शोले स्टाईल आंदोलन



*__वाशिम :__ तालुक्यातील आदिवासीबहुल भागातून जाणाऱ्या मुख्य रस्त्याच्या दुरुस्ती करिता वारंवार आंदोलने उपोषण इशारा देऊनही सार्वजनिक बांधकाम विभाग व ठेकेदार यांच्या मनमानीमुळे गेल्या सहा वर्षापासून रस्ता दुरुस्तीच्या प्रक्रीयेतच अडकलेला आहे. अनेक निवेदने आंदोलने उपोषणे करूनही न्याय मिळत नसल्याने सामाजिक आदिवासी कार्यकर्ता सीता धंदरे व संदीप घाटोळे यांनी १८ मार्च सकाळी ४ वाजता पासून पाण्याच्या टाकीवर चढून आंदोलन चालू केले ४० डीग्री तापमात सुमारे ८ तास प्रतीक्षा करुनही वरिष्ठ अधिकाऱ्याची भूमिका स्पष्ट न झाल्याने आंदोलन चालूच ठेवले आहे .*

मागील सहा वर्षांपासून जऊळका ते अमानवाडी , कुत्तरडोह ते किन्हीराजा, अमानवाडी ते मांडोली या आदिवासी भागातील खेडेगावात असणाऱ्या रस्त्यांना शहरासह जिल्ह्याला जोडणारे रस्ते कित्येक वर्षापासून नादुरुस्त असून त्यावर मोठ मोठाले खड्डे पडलेले आहेत तसेच अनेक ठिकाणी पुलाला भगदाड पडले असून खराब रस्त्यामुळे अनेकांना गंभीर आजारी व्यक्तीसह इतरांना दुखापतग्रस्त व्हावे लागत आहे. तसेच रस्त्याने गरोदर स्त्रियांना नेत असताना मध्येच खड्ड्यामुळे प्रस्तुती झाल्याच्या अनेक घटनाही घडलेल्या आहेत.

सदर रस्त्याबाबत विविध सामाजिक संघटना कार्यकर्ते यांनी वारंवार जिल्हाधिकारी व सार्वजनिक बांधकाम यांच्याकडे लाखो तक्रारी करूनही अद्याप पर्यंत रस्त्यांच्या कामाला सुरुवात करण्यात आली नाही सदर रस्त्याच्या दुरुस्ती संदर्भात आदिवासी कार्यकर्त्या सीता धंदारे यांनी २३ जानेवारी २०२४ रोजी नदीत आमरण उपोषण २८ ऑक्टोबर २०२५ रोजी आंदोलन आश्वासन देऊन काम चालू केले नाही, म्हणून पुन्हा परत २९ डिसेंबर २०२५ रोजी पुन्हा आंदोलन तसेच ६ जानेवारी २०२६ रोजी कडाक्याच्या थंडीतही धमधमी येथे सलग आठ दिवस आमरण उपोषण केले. त्यावर उपाय म्हणून सर्वजनिक बांधकाम अभियंता केशव जोगदंड यांनी दोन-तीन दिवस थातूरमातूर काम चालू केले सदर काम अवघ्या तीन दिवसातच पुन्हा उखडले तेव्हापासून आतापर्यंत सदर रस्त्यावर ठेकेदाराचे काम करणारे वाहने आहेत मात्र कुठलेही काम चालू नसून रस्ता दुरुस्त झाला नाही. त्यामुळे सीता धंदरे यांनी १२ मार्च २०२६ रोजी जिल्हाधिकारी कार्यकारी अभियंता तहसीलदार पोलीस अधीक्षक व जऊळका पोलीस यांना पुन्हा निवेदन दिले होते. त्याची प्रशासनाने दखल घेतली नसून त्याच्या निषेधार्थ कार्यकर्त्यांसह १८ मार्च रोजी अमनवाडी येथील पाण्याच्या टाकीवर चढून गंभीर आंदोलन आंदोलन चालू केले असून त्यांच्यासोबत संदीप घाटोळे सह तीस चाळीस कार्यकर्ते सुद्धा पाण्याच्या टाकी खाली आंदोलन करीत आहेत. पुढील होणाऱ्या परिणामास सार्वजनिक बांधकाम उपविभाग मालेगाव तसेच संबंधित ठकेदार जवाबदार राहणार आहेत. गंभीर इशारा दिला आहे.

**आता आश्वासन नको, काम करा.**
**आता आश्वासन नाहीतर**

जोपर्यंत सार्वजनिक बांधकाम विभाग चे वरिष्ठ अधिकारी प्रत्यक्षात दोन्ही रस्त्याचे काम चालू करत नाही तोपर्यंत आंदोलन चालू राहणार सामाजिक कार्यकर्त्या. आनदोलक सीता धंदरे यांचा संकल्प.

# डाबकी रोडचा खेळखंडोबा

**प्रशासनावर सभापती विजय अग्रवाल यांचा संताप**

## २ वर्षांपासून रखडलेले काम, अतिक्रमणावर कारवाईचा अभाव



**■ प्रतिनिधी | अकोला ■**

शहरातील डाबकी रोडच्या रखडलेल्या कामावरून महापालिका प्रशासनाचा निष्क्रिय कारभार पुन्हा एकदा उघडकीस आला आहे. तब्बल दोन वर्षांपासून संथगतीने सुरू असलेल्या या रस्त्याच्या कामामुळे नागरिक त्रस्त झाले असून स्थायी समिती सभापती विजय अग्रवाल यांनी बुधवारी घेतलेल्या विशेष बैठकीत संबंधित विभागांना चांगलेच फैलावर घेतले.

महापालिकेच्या स्थायी समिती सभागृहात पार पडलेल्या या बैठकीत नगररचना, बांधकाम, अतिक्रमण, विधी, पाणीपुरवठा, विद्युत व क्षेत्रीय कार्यालयातील अधिकाऱ्यांची उपस्थिती होती.

डाबकी रोडवरील कामाची दयनीय अवस्था, अतिक्रमण हटविण्यातील टाळाटाळ आणि विभागांमधील समन्वयाचा अभाव यावर सभापतींनी तीव्र नाराजी व्यक्त केली. विशेष म्हणजे, छाया हॉस्पिटल व परिसरातील कॉम्प्लेक्सचे अनधिकृत बांधकाम आणि पार्किंगच्या अभावामुळे निर्माण झालेली वाहतूक कोंडी याकडे लक्ष वेधण्यात आले. नगररचना विभागाने अनेकदा रस्ता रुंदीकरणासाठी मार्किंग केले असतानाही अतिक्रमण विभाग व क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी कोणतीही ठोस कारवाई केली नसल्याचे स्पष्ट झाले.

काही प्रकरणे न्यायालयात प्रलंबित असल्याचा आधार घेत अधिकाऱ्यांनी जबाबदारी टाळण्याचा प्रयत्न केला. मात्र, विधी विभागाने तातडीने पाठपुरावा करून ही प्रकरणे निकाली काढावीत, असे स्पष्ट निर्देश देण्यात आले. तसेच नियमबाह्य अंतरात उभी करण्यात आलेली बांधकामे थेट अनधिकृत ठरवून नोटीस न देता हटविण्याचे आदेश देण्यात आले.

बैठकीदरम्यान सर्व विभागांमध्ये समन्वयाचा अभाव असल्याचे प्रकर्षाने दिसून आले. कोणताही अधिकारी जबाबदारीने उत्तर देण्यास तयार नसल्याने प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. 'केवळ कागदोपत्री काम नको, प्रत्यक्ष कारवाई दिसली पाहिजे,' असा सज्जड दम सभापती अग्रवाल यांनी दिला.

डाबकी रोडचे काम तातडीने गतीने सुरू करून पुढील १५ दिवसांत रस्त्यावरील सर्व अतिक्रमणे हटवावीत, तसेच टीडीआर संदर्भातील प्रलंबित अर्जांवर त्वरीत निर्णय घ्यावा, असे स्पष्ट आदेश देण्यात आले.

या बैठकीस उपमहापौर अमोल गोगे, नगरसेवक अनिल गरड, नितीन ताकवाले, अमोल मोहोकार, नगरसेविका मंजुषा शेळके, महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त सुमेध अलोने, शहर अभियंता नीला वंजारी, बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता अजय गुजर, सहाय्यक नगररचनाकार मृणालिनी मानतकर, जलप्रदाय विभागाचे कार्यकारी अभियंता अमोल डोईफोडे, मालमत्ता अधिकारी संदीप गावंडे, विधी अधिकारी शाम ठाकुर, सहाय्यक अतिक्रमण निर्मूलन अधिकारी चंद्रशेखर इंगळे, प्रवीण मिश्रा, सामाजिक कार्यकर्ते तथा माजी नगरसेवक विलास शेळके, पंकज गावंडे, उपअभियंता वाकोडे, श्रीकांत माणिकराव, कृष्णा वाडेकर यांच्यासह इतर अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

**नागरिक त्रस्त; १५ दिवसांत फरक पडणार का?**

दरम्यान, दोन वर्षांपासून रखडलेल्या या कामामुळे परिसरातील नागरिकांना धूळ, खड्डे आणि वाहतूक कोंडीचा मोठा त्रास सहन करावा लागत आहे. आता प्रशासनाला दिलेल्या १५ दिवसांच्या मुदतीनंतर तरी प्रत्यक्षात काही बदल होणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या १९९ व्या जयंतीनिमित्त चौक - स्मारकाच्या विकासाची मागणी



**■ प्रतिनिधी | कारंजा ■**

येत्या ११ एप्रिल रोजी क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या १९९ व्या जयंतीनिमित्त कारंजा येथील महात्मा फुले चौक व स्मारकाचा सर्वांगीण विकास करण्याची मागणी नागरिकांकडून जोर धरत आहे. सामाजिक परिवर्तनाचे प्रतीक असलेल्या या ऐतिहासिक स्थळाचे जतन आणि सौंदर्यीकरण करण्यासाठी प्रशासनाने तातडीने पावले उचलावीत, अशी एकमुखी मागणी पुढे येत आहे. स्थानिक नागरिकांच्या मते, महात्मा फुले चौक हा केवळ वाहतुकीचा केंद्रबिंदू नसून तो प्रेरणास्थान आहे. त्यामुळे या परिसराचा चेहरामोहरा बदलण्यासाठी व्यापक विकास आराखडा राबविण्याची गरज अधोरेखित होत आहे. सौंदर्यीकरणासह आधुनिक सुविधा देण्याची मागणी स्मारकाच्या दुरुस्ती व रंगरंगोटी करून त्याला नवसंजीवनी देण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. परिसरातील ग्रॅनाईट व टाईल्सची दुरुस्ती करून दर्जेदार रंगकाम केल्यास स्मारक अधिक आकर्षक दिसेल, असे मत व्यक्त होत आहे.

# खोटा एफआयआर खारीज करण्याची मागणी

## संबंधित व्यक्तीच्या संपत्तीची चौकशी करा – सकल माळी समाज

**■ प्रतिनिधी | वाशिम ■**

सकल माळी समाज, वाशिम यांच्या वतीने दि. २६ फेब्रुवारी रोजी दाखल करण्यात आलेला एफआयआर खोटा असल्याचा आरोप करत तो तात्काळ खारीज करावा, तसेच संबंधित तक्रारदार भारत हेंबाडे ऊर्फ राजू पाटील राजे (रा. लाखाळा, वाशिम) यांची आर्थिक गुन्हे शाखेमार्फत सखोल चौकशी करावी, अशी मागणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

निवेदनात नमूद केल्यानुसार, संबंधित व्यक्तीच्या आर्थिक व्यवहारांबाबत व संपत्तीवाढीबाबत समाजात संभ्रम निर्माण झाला असून, २००४-०५ पर्यंत भाड्याच्या छोट्या खोलीत राहणाऱ्या व्यक्तीकडे आज कोट्यवधींची संपत्ती कशी आली, याबाबत चौकशी होणे गरजेचे असल्याचे म्हटले आहे. तसेच २००७ साली चेक बाऊंस प्रकरणात कारावास भोगल्याचा उल्लेखही करण्यात आला आहे.

यासंदर्भात लोणी गवळी (ता. मेहकर, जि. बुलढाणा) येथील तेजराव इनामदार (वय ७०) यांनी दिलेल्या नोटरी प्रतिज्ञापत्रात संबंधित व्यक्तीवर अनेकांना फसवल्याचे आरोप असल्याचे नमूद करण्यात आले आहे. समाजात अशा प्रकारच्या घटनांची चर्चा असून, विरोध करणाऱ्यांवर दबाव टाकणे, हल्ल्याच्या घटना घडविणे किंवा खोट्या तक्रारी दाखल करण्याचे प्रकार घडत असल्याचाही आरोप निवेदनात करण्यात आला आहे.

तसेच, संबंधित व्यक्ती राजकीय प्रभावाचा वापर करून सामाजिक वातावरण दूषित करत असल्याचा आरोप करत, त्यांच्या मालमत्ता, उत्पन्नाचे स्रोत व आर्थिक व्यवहारांची सर्वंकष चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे.

दरम्यान, दि. २६ फेब्रुवारी रोजी दाखल झालेल्या एफआयआरची निष्पक्ष चौकशी करून तो खोटा आढळल्यास कायदेशीर प्रक्रियेद्वारे खारीज करण्यात यावा, अशीही मागणी करण्यात आली आहे. या प्रकरणात न्याय न मिळाल्यास सकल माळी समाजाच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल.

### स्वीकृत नगरसेवकांचा सत्कार

**अकोला :** राजस्थानी समाजाच्या सामाजिक व सांस्कृतिक कार्यात सक्रिय योगदान देणाऱ्या महाराष्ट्र प्रादेशिक मारवाडी संमेलन व मारवाडी युवा मंच,अकोला शाखेच्या संयुक्त विद्यमान सत्कार करण्यात आला.

# फळबागांचे अनुदान काढण्यासाठी कृषी विभाग ॲक्शन मोडवर



**■ प्रतिनिधी | मंगरुळपीर ■**

तालुक्यातील महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना फळबाग लागवडीच्या गोगरी, खेर्डा खु, खेर्डा बु, चोरद, येडशी, भूर , पुर व शेलूबाजार या गावातील शेतकऱ्यांच्या फळबागांच्या प्रलंबित अनुदानाचे प्रकरण प्रसारमाध्यमात प्रचंड गाजत असतानाच तोंडावर मार्च महिन्याचे अवघे काही दिवस उरले असल्याने कृषी विभागातील सबंधित अधिकाऱ्यांची लगबग पहायला मिळत आहे.

उन्हाचा प्रचंड पारा वाढला असून जीवाची लाही लाही होत असताना सुटीच्या दिवशीही कृषी कर्मचारी खेड्यावर जाऊन शेतकऱ्यांच्या भेटी घेत आहेत. चोरद गावातील सहा शेतकऱ्यांचे तीन वर्षाचे फळबागेतील कलमांचे व इतर साहित्याचे रुपये ५०२८५४ प्रलंबित आहेत. येडशी गावातील चार शेतकऱ्यांचे दोन वर्षाचे फळबागेतील कलमा व साहित्याचे रु .१३१४९९ प्रलंबित आहेत.

गोगरी गावातील अकरा शेतकऱ्यांचे तीन वर्ष मिळून रु. १०४६६६३ प्रलंबित आहेत, ह्या सर्व प्रलंबित रकमा या महिन्याचे अखेरपर्यंत शेतकऱ्यांचे बँक खात्यात जमा करणे क्रमप्राप्त आहे. या महिन्यात ह्या प्रलंबित रकमा शेतकऱ्यांना मिळाल्या नाहीत तर त्या कधीच शेतकऱ्यांना मिळणार नाहीत याची जाणीव कृषी अधिकाऱ्यांना आहे

# खंडाळा खुर्द येथे सामाजिक सभागृहाचे भूमिपूजन संपन्न

**■ प्रतिनिधी | वाशिम ■**



येथून जवळच असलेल्या खंडाळा खुर्द येथे अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकाच्या वस्तीचा विकास करणे योजनेअंतर्गत सामाजिक सभागृहाचे भूमिपूजन करण्यात आले. अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या वस्तीचा विकास व्हावा म्हणून महाराष्ट्र शासन विविध प्रकारच्या विकास योजना राबविते.

त्याच अनुषंगाने अडोळी जि.प.तत्कालीन सदस्य दिलीपभाऊ देशमुख यांच्या शिफारसी मुळे व पुढाकाराने अडोळी सर्कल मधील खंडाळा खुर्द येथे सामाजिक सभागृह मंजूर करण्यात आले आहे.म्हणून खंडाळा खुर्द येथे छत्रपती शहाजी राजे महाराज यांच्या जयंतीचे औचित्य साधून व त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण दि.१८ मार्च २०२६ येथे सकाळी ११ वाजता सामाजिक सभागृहाचे भूमिपूजन जिल्हा परिषद सदस्य दिलीपराव देशमुख यांचे हस्ते करण्यात आले.प्रसंगी डॉ.ज्ञानेश्वर गायकवाड, उपसरपंच प्रतिनिधी भोयर,पो.पा.रमेश सुर्वे, डॉ बाबासाहेब आंबेडकर पदवीधर संघटनेचे अध्यक्ष राजकुमार पडघान, दादाराव भालेराव, ज्ञानबा वंजारी, कैलास सावके, डॉ.भागवत सावके , सदस्य उत्तम सावके, शिवराम गायकवाड, सुभाष सुर्वे, नंदा वंजारी, संजय सुर्वे, वसंतराव भालेराव, ग्रामपंचायत अधिकारी अरविंद पडघन, वाशीम पंचायत समितीचे शाखा अभियंता टि.टी.जाधव, ठेकेदार वैभव जाधव व महीला आणि गांवकरी यांची उपस्थिती होती.

यावेळी सभागृह भूमिपूजन कार्यक्रमाचे प्रास्ताविक ग्रामपंचायत अधिकारी अरविंद पडघन यांनी केले तर सुत्रसंचलन राजकुमार पडघान यांनी केले.

## समाज प्रबोधनासाठी आयुष्य झोकून देणारे पी. एस. खंदारे उपचारासाठी मदतीच्या प्रतीक्षेत



**■ प्रतिनिधी | वाशिम ■**

कर्मयोगी संत गाडगेबाबांच्या वेशात समाजप्रबोधन करत अंधश्रद्धा निर्मूलन, व्यसनमुक्ती आणि सामाजिक समतेचा संदेश देणारे वाशिम जिल्ह्यातील ज्येष्ठ समाजसेवक व आदर्श लोककलावंत पी. एस. खंदारे सध्या दुर्धर आजाराशी झुंज देत आहेत. समाजासाठी आयुष्य समर्पित करणाऱ्या या निःस्वार्थ कार्यकर्त्यावर उपचारासाठी मोठा खर्च अपेक्षित असून त्यांच्या कुटुंबाकडे उत्पन्नाचे कोणतेही स्थिर साधन नसल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे त्यांच्या उपचारासाठी समाजबांधवांनी पुढे येऊन मदतीचा हात द्यावा, असे भावनिक आवाहन करण्यात येत आहे. पी. एस. खंदारे यांनी अनेक वर्षे अंधश्रद्धा निर्मूलन चळवळ, व्यसनमुक्ती जनजागृती, जिल्हा परिषद शाळा बचाव आंदोलन तसेच लोककलावंतांच्या मानधन वाढीसाठी सातत्याने संघर्ष केला आहे.

## मालेगांवात प्रेम भुतडा यांचा दानशूर उपक्रम

### वृद्धाश्रमासह माहेश्वरी भवनाला आर्थिक मदत



**■ प्रतिनिधी | मालेगाव ■**

शहरातील दानशूर व्यक्तिमत्त्व म्हणून ओळख असलेले प्रेम रतन भुतडा यांनी सामाजिक बांधिलकी जपत मालेगांव येथील वृद्धाश्रमास भेट देऊन दहा हजार रुपयांची आर्थिक मदत केली. यासोबतच वृद्धाश्रमातील गरजू वृद्धांसाठी दहा पलंग भेट देत त्यांनी संवेदनशीलतेचा परिचय करून दिला. यावेळी वृद्धाश्रमातील रहिवाशांच्या सोयी-सुविधांचा आढावा घेत भुतडा यांनी त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या. त्यांच्या या उपक्रमाबद्दल वृद्धाश्रम संचालकांनी कृतज्ञता व्यक्त करत, 'अशा मदतीमुळे संस्थेचे कार्य अधिक सक्षम होते,' असे सांगितले. तसेच, त्यांच्या या उल्लेखनीय कार्याबद्दल वृद्धाश्रमाच्या वतीने प्रेम रतन भुतडा यांचा सत्कार करण्यात आला.भुतडा हे सातत्याने सामाजिक व धार्मिक कार्यात पुढाकार घेत असून, यापूर्वीही त्यांनी गरजू रुग्णांसाठी मोतीबिंदू शस्त्रक्रिया मोफत करून दिल्या आहेत. तसेच उन्हाळ्यात पिण्याच्या पाण्याची सोय व्हावी यासाठी पाणपोई उपक्रम राबवून अनेकांना दिलासा दिला आहे. याच पार्श्वभूमीवर त्यांनी शहरातील माहेश्वरी भवनासाठीही एक लाख रुपयांची आर्थिक मदत जाहीर केली.

**मध्यरात्री राजकीय भूकंप**

# जिल्हाप्रमुख काळेंसह चार नगरसेवक शिंदे गटात; ठाकरेंच्या सेनेला धक्का

## पांडे गुरुजींचा 'मास्टरस्ट्रोक'; महानगरातील समीकरणे बदलली

**■ प्रतिनिधी | अकोला ■**

*महानगराच्या राजकारणात मंगळवारी मध्यरात्री मोठा स्फोट झाला. शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटातील चार नगरसेवकांनी अचानक मुंबई गाठत उपमुख्यमंत्री ना. एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत शिंदे गटात प्रवेश केला. या धक्कादायक घडामोडीमुळे अकोल्यात ठाकरेंच्या सेनेला जबर हादरा बसला असून राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे.*

या नाट्यमय पक्षांतरामागे शिंदे सेनेचे जिल्हाप्रमुख चंद्रशेखर पांडे गुरुजी यांची रणनीती असल्याची जोरदार चर्चा रंगली आहे. 'मध्यरात्री ऑपरेशन' यशस्वी करत पांडे यांनी ठाकरेंच्या गडाला थेट सुरुंग लावल्याची प्रतिक्रिया राजकीय निरीक्षकांकडून व्यक्त होत आहे.

अकोला महानगरपालिकेच्या निवडणुकीत उबाठा गटाचे सहा नगरसेवक निवडून आले होते. भाजपविरोधी लाटेत नागरिकांनी या सहाही नगरसेवकांवर विश्वास दाखवला होता. मात्र, त्यातील चार नगरसेवकांनी अचानक पलटी घेत शिंदे गटाची वाट धरल्याने मतदारांमध्येही संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे.



शिंदे गटात दाखल झालेल्यांमध्ये सागर भारुका, मनोज पाटील, सोनाली सरोदे आणि सुरेखा मंगेश काळे यांचा समावेश आहे. यांच्यासोबतच अल्पमताने पराभूत झालेले माजी नगरसेवक व विद्यमान जिल्हाप्रमुख मंगेश काळे यांनीही शिंदे गटात प्रवेश केला. या एकाच झटक्यात ठाकरेंच्या गटाची ताकद कमी झाली असून महापालिकेतील सत्तासमीकरणे बदलण्याची चिन्हे स्पष्ट झाली आहेत.

राजकीय वर्तुळात या घडामोडीला 'गेमचेंजर' मानले जात असून आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर याचे दूरगामी परिणाम होण्याची शक्यता व्यक्त होत आहे. ठाकरेंच्या गटासाठी हा मोठा धक्का मानला जात असताना शिंदे गटाने मात्र अकोल्यात आपली पकड मजबूत केल्याचे चित्र आहे.

**जनतेसाठीच निर्णय – नव्याने प्रवेश केलेल्या नगरसेवकांचा दावा**

'जनतेने आम्हाला विकासकामे आणि मूलभूत सुविधा देण्यासाठी निवडून दिले आहे. आम्ही शिवसेनेतच आहोत, फक्त नेतृत्व बदलले आहे. बाळासाहेबांच्या विचारांनुसार जनसेवा करत राहू. प्रभागातील कामांसाठी निधीची कमतरता भासणार नाही, असा शब्दही ना. एकनाथ शिंदे यांनी दिला आहे,' अशी प्रतिक्रिया मंगेश काळे, सागर भारुका, मनोज पाटील, सुरेखा काळे आणि सोनाली सरोदे यांनी दिली.

# जनमाध्यम

paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक १११ ■ गुरुवार, १९ मार्च २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मूल्य ३.०० रु.


# सिंदी नगर परिषदेची अतिक्रमण हटाव मोहीम वादाच्या भोवऱ्यात

## -बड्यांना अभय तर गरिबांवर हातोडा? -मुख्याधिकाऱ्यांविरुद्ध पोलिसात तक्रार

### -राजकीय दबावापोटी कारवाई केल्याचा आरोप

**सेलू जनमाध्यम :** तालुक्यातील सिंदी (रेल्वे) येथील नगर परिषदेने मंगळवारी (दि.१८) राबविलेली अतिक्रमण हटाव मोहीम वादाच्या भोवऱ्यात सापडली आहे. सिंदी पोलीस स्टेशन ते बाजार चौक या मार्गावरील अतिक्रमणांवर बुलडोझर चालवण्यात आला; मात्र या कारवाईत निवडकपणा केल्याचा आरोप नागरिकांतून होत आहे. बड्यांना अभय, गरिबांवर कारवाई अशी संतप्त चर्चा परिसरात रंगली असून मुख्याधिकाऱ्यांविरुद्ध पोलिसांत तक्रार दाखल करण्यात आली आहे.

सकाळी सुमारे ११ वाजता बाजार समितीसमोरील दुकानांपासून कारवाईला सुरुवात झाली. बसस्थानक परिसरात पोहोचताच सुधाकर वाघमारे यांच्या अतिक्रमणावरून वाद निर्माण झाला. वाघमारे यांनी १९९४ मधील दिवाणी न्यायालयाचा आदेश दाखवत जागेची मोजणी करण्याची मागणी केली. यावरून मुख्याधिकारी पौर्णिमा गावित व वाघमारे यांच्यात जोरदार शाब्दिक चकमक झाली. सुमारे दीड तास परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले.

न्यायालयाच्या स्थगिती आदेशानंतरही काही बांधकाम पाडल्याचा आरोप करत वाघमारे यांनी राजकीय दबावाखाली कारवाई झाल्याची तक्रार सिंदी पोलिस ठाण्यात दिली आहे. दरम्यान, बाजार चौकातील काही दुकानदारांनी स्वतःहून अतिक्रमण काढण्यासाठी एक दिवसाची मुदत मागितली. प्रशासनाने त्यांची लेखी संमती घेऊन मुदत मंजूर केली.

या मोहिमेदरम्यान ठाणेदार नरेंद्र निस्वादे, पीएसआय ज्ञानोबा पळनाटे, पीएसआय ओम कालेगुरवार यांच्यासह पोलिसांचा मोठा फौजफाटा तैनात होता. उर्वरित अतिक्रमण २३ मार्च रोजी हटविण्यात येणार असल्याचे मुख्याधिकारी गावित यांनी सांगितले.





### ■ नगरसेविकेच्या पतीच्या हॉटेलकडे दुर्लक्ष?

सामान्य दुकानदारांवर कारवाई होत असताना सत्ताधारी नगरसेविकेचे पती अमोल बोंगाडे यांच्या हॉटेलसमोरील टिन शेडवर मात्र कारवाई न झाल्याचा आरोप आहे. 'नोटीस पोहोचली नाही, असे प्रशासनाचे स्पष्टीकरण देण्यात आले. त्यामुळे प्रशासनाच्या भूमिकेबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.

### ■ न्याय मिळेपर्यंत लढा सुरूच

न्यायालयाच्या आदेशाचा अवमान करून राजकीय दबावाखाली कारवाई करण्यात आली. आम्हाला न्याय मिळेपर्यंत लढा देऊ.

**सुधाकर वाघमारे, तक्रारदार**

हा विकास नाही... देशाच्या सुरक्षेचा प्रश्न

# पुलगाव-आर्वी-वरुड रेल्वेसाठी दिल्ली हादरवली

**नवी दिल्ली । वर्धा जनमाध्यम :** वर्षानुवर्षे आश्वासनांचे ढग दाखवून प्रत्यक्षात काहीच न करणाऱ्या सत्ताधाऱ्यांवर संतापाचा स्फोट करत खासदार अमर काळे यांनी थेट दिल्ली दरबारात धडक देत केंद्रीय संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांच्यासमोर पुलगाव–आर्वी–वरुड रेल्वेमार्ग ब्रॉडगेजचा मुद्दा आक्रमकपणे मांडला.

भेटीदरम्यान काळे यांनी स्पष्ट शब्दांत सरकारला सुनावत सांगितले की, हा केवळ विकासाचा विषय नाही, हा देशाच्या सुरक्षेशी थेट संबंधित अत्यंत गंभीर राष्ट्रीय प्रश्न आहे. त्यामुळे या कामाला तातडीने प्रथम प्राधान्य दिले पाहिजे.



पुलगाव केंद्रीय दारुगोळा भांडार आणि मध्यप्रदेशातील आमला डेपो यांच्यातील दारुगोळा वाहतूक सध्या नागपूरमार्गे करावी लागते. त्यामुळे १०५ किमी अतिरिक्त अंतर, विलंब आणि सुरक्षा धोका वाढत असल्याची गंभीर बाब त्यांनी मांडली. राजकीय उदासीनतेमुळे सैनिकांच्या सुरक्षेशी खेळ सुरू आहे, असा आरोपही त्यांनी केला. १९७१ च्या युद्धकाळात पुलगाव डेपो लक्ष्यावर असल्याने दारुगोळा आमला येथे हलवताना रेल्वेमार्ग नसतानाही हाच मार्ग रस्त्याने वापरावा लागला होता. तरीही आजपर्यंत हा सामरिकदृष्ट्या अत्यंत महत्त्वाचा मार्ग ब्रॉडगेज न होणे म्हणजे प्रशासनाची अक्षम्य चूक असल्याचे काळे यांनी ठणकावून सांगितले. हा मार्ग ब्रॉडगेज करून वरुडपर्यंत वाढविल्यास केवळ आर्वी–आष्टी–कारंजा–वरुड पट्ट्याला रेल्वेचे जाळे मिळणार नाही, तर दोन महत्त्वाच्या मिलिटरी डेपोमधील दळणवळण सुरक्षित व वेगवान होणार आहे. संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी या मार्गाचे सामरिक महत्त्व मान्य करत सकारात्मक शिफारस करण्याचे आश्वासन दिले. तसेच देशहिताचा मुद्दा आक्रमकपणे मांडल्याबद्दल खासदार अमर काळे यांचे कौतुकही केले.दरम्यान, स्थानिक पातळीवर दुर्लक्षित प्रश्नासाठी दिल्लीपर्यंत झुंज देणार,असा इशारा देत काळे यांनी सत्ताधाऱ्यांना थेट आव्हान दिले असून त्यांच्या या आक्रमक भूमिकेमुळे राजकीय वर्तुळात प्रचंड खळबळ उडाली आहे.

# शहरात धुमाकूळ घालणारा दुचाकी चोरटा जेरबंद

## पोलिसांच्या सापळ्यात अडकला; चोरीची गाडी जप्त

**वर्धा जनमाध्यम :** शहरात दुचाकी चोरी करून नागरिकांच्या नाकी नऊ आणणाऱ्या चोरट्याला अखेर शहर पोलिसांनी बेड्या ठोकल्या. गोपनीय माहितीच्या आधारे गुन्हे शोध पथकाने रचलेल्या सापळ्यात हा तरुण अडकला असून त्याच्याकडून चोरीची दुचाकी जप्त करण्यात आली आहे.

अनुराग प्रवीण धाबर्डे (वय २०, रा. तळोदी (कुटकी), ता. सेलू) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. सुरेंद्र रामचंद्र महाकाळकर (रा. गोपुरी चौक, नागपूर रोड, वर्धा) यांची दुचाकी अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याने परिसरात संताप व्यक्त होत होता. या प्रकरणी शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याचा छडा लावण्यासाठी पोलिसांनी कसून तपास सुरू केला. खात्रीलायक माहिती मिळताच पोलिसांनी अनुराग यास ताब्यात घेतले. कडक चौकशीत त्याने चोरीची कबुली दिली. त्याच्याकडून चोरीची दुचाकी जप्त



करण्यात आली आहे. ही कारवाई प्रभारी ठाणेदार भुसारी यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलिस निरीक्षक प्रमोद रासकर, पोलिस उपनिरीक्षक शरद गायकवाड, महेंद्र पाटील, अभिजित वाघमारे, रंजीत भुरसे व अमोल साळवन यांच्या पथकाने केली.

खादीचा अखेरचा दीप विझला...

# विनोबांचे सावलीसारखे सहचर आचार्य बालविजयजी अनंतात विलीन

**पवनार जनमाध्यम :** राष्ट्रसेवेला आयुष्याचे व्रत मानणारे, अनासक्त कर्मयोगाचे मूर्तिमंत रूप आणि विनोबा भावे यांचे स्वीय सचिव म्हणून दीर्घकाळ कार्य करणारे खादी चळवळीतील ज्येष्ठ गांधीवादी आचार्य बालविजयजी (बालभाई/दादा) बुधवारी दुपारी १२.३० वाजता परमधामात विलीन झाले. ते १०१ व्या वर्षात होते. त्यांच्या निधनाने पवनारच्या शांत आश्रमभूमीवर शोकाचे दाट ढग दाटून आले असून खादी विश्वातील एक तेजस्वी, पण निःस्पृह दीप कायमचा मालवला आहे.

२६ फेब्रुवारी १९२६ रोजी भंडारा येथे जन्मलेल्या या साधकाने शतायुषी प्रवास पूर्ण करत आयुष्याचा प्रत्येक श्वास राष्ट्रसेवेला अर्पण केला. खादी, ग्रामोद्योग, स्वदेशी आणि आश्रमजीवन हीच त्यांची खरी ओळख होती. नाव, प्रसिद्धी, पद, सत्तेचा मोह यापासून दूर राहून त्यांनी आयुष्यभर सेवेला साधना मानले. त्यांच्या व्यक्तिमत्त्वात गांधी-विनोबा परंपरेची शांत ताकद आणि करुणा अनुभवायला मिळत असे. विनोबाजींच्या निकट सहवासात राहून त्यांनी भूदान चळवळीच्या काळातही पडद्यामागे राहून महत्त्वाची जबाबदारी सांभाळली.



आश्रमातील शिस्त, साधेपणा आणि अध्यात्मिक वातावरण जपण्यात त्यांचा सिंहाचा वाटा होता. अनेक कार्यकर्त्यांना त्यांनी वडिलकीच्या छायेत घडवले. कर्म करा, पण कर्तेपणा सोडा हा त्यांचा जीवनमंत्रच होता.

पवनार येथील ब्रह्मविद्या मंदिर आणि खादी-मिशन सेवा ट्रस्टशी त्यांचे अतूट नाते होते. खादी हा फक्त कपडा नसून स्वावलंबनाचा मंत्र आहे, ही भावना त्यांनी आयुष्यभर जपली. त्यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक युवक समाजकार्यात उतरले. परमधाम मुद्रणालय परिसरात अत्यंत साधेपणाने त्यांच्या पार्थिवावर अंतिम संस्कार करण्यात आले. कोणताही दिखावा नाही, कोणताही गाजावाजा नाही, जसे आयुष्य जगले तसेच शांतपणे त्यांनी निरोप घेतला. त्यांच्या पश्चात आश्रम परिवार, खादी क्षेत्रातील सहकारी, शिष्यवृंद आणि असंख्य अनुयायी असा विशाल परिवार आहे. त्यांच्या जाण्याने खादी चळवळीचा एक आधारस्तंभ कोसळल्याची भावना व्यक्त होत असून सेवा, साधेपणा आणि अनासक्ती यांचे चालते-बोलते विद्यापीठ हरपल्याची हळहळ सर्वत्र व्यक्त होत आहे.

पवनारच्या वाऱ्यात आजही चरख्याचा मंद आवाज घुमतो आहेष्ठ पण तो फिरवणारे हात कायमचे थांबले, ही वेदना प्रत्येकाच्या मनाला चटका लावून गेली आहे.

# महागड्या कारने जनावरे चोरणारी टोळी जेरबंद

## -स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई; १५.३० लाखांचा मुद्देमाल जप्त



**वर्धा जनमाध्यम :** देवळी परिसरात जनावरे चोरीच्या वाढत्या घटनांना आळा घालत स्थानिक गुन्हे शाखेने महागड्या कारचा वापर करून जनावरे चोरणाऱ्या टोळीचा पर्दाफाश केला. या प्रकरणात तिघांना अटक करण्यात आली असून कारसह रोख रक्कम असा सुमारे १५ लाख ३० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

देवळी येथील आशिष मधुकर माहुरे यांच्यासह मारोतराव झाडे, नरहरी कामडी, मंगल तलमले, शंकर कामडी व प्रज्वल पाचपोर यांची जनावरे अज्ञात चोरट्यांनी चोरून नेल्याची तक्रार देवळी पोलिस ठाण्यात दाखल झाली होती. त्यानुसार गुन्हा नोंद करून स्थानिक गुन्हे शाखेने समांतर तपास सुरू केला.

तपासादरम्यान परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची पाहणी करण्यात आली. गोपनीय माहितीच्या आधारे पथक नागपूर येथे गेले. यशोधरा परिसरातील अब्दुल अलीम अब्दुल लतिक याला एमएच-४७ एयू-५३६६ क्रमांकाच्या कारसह ताब्यात घेण्यात आले. त्याचे साथीदार मोहम्मद अर्षद मोहम्मद अजगर शेख (रा. नागपूर) व रोशन धर्मेसिंग उईके (रा. कळमना, नागपूर) यांनाही अटक करण्यात आली.

चौकशीदरम्यान आरोपींनी जनावरे चोरी केल्याची कबुली दिली. त्यांच्या ताब्यातून कार व रोख ३० हजार रुपये जप्त करण्यात आले. ही कारवाई पोलिस अधीक्षक सौरभकुमार अग्रवाल, अपर पोलिस अधीक्षक सदाशिव वाघमारे व पोलिस निरीक्षक विनोद चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक प्रकाश लसुंते, मनोज धात्रक, हमीद शेख, महादेव सानप, दिनेश बोथकर, अक्षय राऊत व विनोद कापसे यांच्या पथकाने केली.

# बंद घरावर चोरट्यांचा डल्ला; १७ लाखांचा ऐवज फस्त

## -सीसीटीव्हीत चेहरे कैद रामदरा परिसर हादरला

**तळेगाव (शा. पंत) जनमाध्यम :** घर बंद असल्याची अचूक माहिती मिळवत चोरट्यांनी रामदरा परिसरातील एका घरावर मध्यरात्री धाड टाकत तब्बल १६ ते १७ लाख रुपयांचा ऐवज लंपास केला. या धाडसी घरफोडीने परिसरात खळबळ उडाली असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

मंगेश ठाकरे हे पत्नीसमवेत नातेवाईकांच्या मय्यतीसाठी मोर्शी येथे गेले होते. ही संधी साधत चोरट्यांनी मुख्य दरवाज्याचा कोंडा तोडून घरात प्रवेश केला. त्यानंतर कपाटे फोडून सुमारे ६३ ग्रॅम सोन्याचे दागिने आणि अंदाजे ७ लाख ५० हजार रुपये रोख रक्कम असा मोठा ऐवज पळविला.

विशेष म्हणजे, चोरट्यांची ही संपूर्ण कारवाई घरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाली असून त्यामध्ये त्यांचे चेहरे स्पष्ट दिसत आहेत. त्यामुळे पोलिसांसाठी हा महत्त्वाचा पुरावा ठरणार आहे.

चोरट्यांनी यापूर्वी परिसरातील दुसऱ्या एका घरालाही लक्ष्य केले होते. त्या घरातील सीसीटीव्ही कॅमेरा तोडून आत शिरण्याचा प्रयत्न करण्यात आला, मात्र घरात हालचाल जाणवल्याने त्यांनी माघार घेतली. त्यानंतर त्यांनी ठाकरे यांच्या बंद घरावर डाव साधला.घटनेनंतर पोलिसांनी श्वानपथकाला पाचारण केले. श्वानाने काही अंतरापर्यंत माग काढला; मात्र पुढे माग हरवला. यापूर्वी तळेगावातील जिनिंग कारखान्यांमध्ये झालेल्या मोठ्या चोऱ्यांचाही उलगडा न झाल्याने चोरट्यांचे मनोबल वाढल्याची चर्चा रंगली आहे. सध्या पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे तपासाची चक्रे वेगाने फिरवली असून आरोपींना लवकर अटक करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे. या प्रकरणाचा तपास ठाणेदार मंगेश भोयर यांच्या मार्गदर्शनाखाली पीएसआय किशोर खंडार, निखिल पाटील व पोलिस कर्मचारी करीत आहेत.

# बेलोरा गावात वाघाचा शिरकाव; बकरी ठार

**आष्टी (शहीद) जनमाध्यम:** आष्टी तालुक्यातील अप्पर वर्धा धरणाच्या पायथ्याशी असलेल्या बेलोरा (खुर्द) गावात बुधवारी पहाटे वाघाने गावात शिरकाव करून घरासमोर बांधलेल्या बकरीचा बळी घेतला. या घटनेमुळे ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून वाघाचा बंदोबस्त करण्याची मागणी होत आहे.

बेलोरा गावात गेल्या महिनाभरापासून वाघाचा वावर वाढला असून गावालगतच्या गोठ्यांमध्ये घुसून त्याने आतापर्यंत अनेक जनावरे ठार केल्याच्या घटना घडल्या आहेत. या पार्श्वभूमीवर दि. १८ मार्च रोजी पहाटे वाघाने गावात प्रवेश केला.

गावातील जानराव रामदास माहुरे हे कुटुंबासह झोपेत असताना वाघ घरासमोर आला आणि बांधलेल्या बकरीवर हल्ला करून तिला ठार केले. सकाळी हा प्रकार लक्षात आल्यानंतर ग्रामस्थांमध्ये भीती पसरली.

घटनेची माहिती वनविभागाला देण्यात आली असून संबंधित अधिकाऱ्यांनी घटनास्थळी भेट दिली. हा वाघ अमरावती जिल्ह्यातील जंगल परिसरातून येत असल्याचा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे.

ग्रामस्थांनी वाघाला जेरबंद करण्याबरोबरच गावात सीसीटीव्ही कॅमेरे बसवून सतत निगराणी ठेवावी, अशी मागणी केली आहे. योग्य उपाययोजना न झाल्यास आंदोलनाचा इशाराही देण्यात आला आहे.

# हिट-अँड-रनमध्ये ८ वर्षांच्या मुलाचा मृत्यू; ट्रक जप्त, चालक फरार

**सेलू जनमाध्यम :** सुकळी स्टेशन परिसरात झालेल्या भीषण हिट-अँड-रन अपघातात आठ वर्षांच्या मुलाचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली. अपघात करून पळून गेलेला नंबरप्लेटविना ट्रक सेलू पोलिसांनी अमरावती जिल्ह्याच्या सीमेवर झुडपात लपवून ठेवलेल्या अवस्थेत जप्त केला असून चालक अद्याप फरार आहे.

मृत मुलाचे नाव वैभव मनोज करपाते (वय ८) असे आहे. तो मित्रासोबत सायकलवरून जात असताना सुकळी स्टेशनकडून येणाऱ्या पांढऱ्या रंगाच्या कॅबिनच्या, नव्या चेसिसच्या आणि नंबर नसलेल्या ट्रकने मागून जोरदार धडक दिली. धडकेनंतर वैभव रस्त्यावर पडला व ट्रकचे चाक त्याच्या अंगावरून गेल्याने त्याचा जागीच मृत्यू झाला. सायकल चालवणारा त्याचा मित्र प्रथमेश करपाते हा बाजूला फेकला गेल्याने बचावला. घटनास्थळी उपस्थित नागरिकांनी वाहन थांबवण्याचा प्रयत्न केला; मात्र चालकाने वेग वाढवत घटनास्थळावरून पळ काढला. या प्रकरणी सेलू पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता २०२३ मधील संबंधित कलमे तसेच मोटार वाहन कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपासादरम्यान पोलिसांना ट्रक अमरावती जिल्ह्याच्या सीमेजवळील एका ढाब्याच्या मागे झाडाझुडपात लपवून ठेवले असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार पोलिसांनी रात्रीच धाड टाकून वाहन ताब्यात घेतले. चालक फरार असून त्याचा शोध सुरू असल्याचे पोलिसांनी सांगितले.

# पेठ येथे अतिरिक्त साठ्यावर कारवाई : १९ गॅस सिलिंडर जप्त

**वर्धा जनमाध्यम :** समुद्रपूर तालुक्यातील गिरड परिसरात घरगुती गॅस सिलिंडरची चढ्या दराने विक्री होत असल्याच्या पार्श्वभूमीवर तालुकास्तरीय पथकाने पेठ येथे धडक कारवाई करत एका वितरकाकडून तब्बल १९ गॅस सिलिंडर जप्त केले. क्षमतेपेक्षा अधिक साठा आढळल्याने संबंधितावर नियमानुसार कारवाई करण्यात आली.



मिळालेल्या माहितीनुसार, गिरड परिसरात गॅस सिलिंडरचा कृत्रिम तुटवडा निर्माण करून अधिक दराने विक्री होत असल्याची तक्रार प्रशासनापर्यंत पोहोचली होती. त्यानंतर गोपनीय माहितीच्या आधारे गिरड पोलिसांच्या मदतीने पेठ येथील विष्णू भावराव धरत यांच्या ठिकाणी छापा टाकण्यात आला.

या वेळी भारत गॅसचे १८ आणि इंडियन गॅसचा १ असे एकूण १९ रिकामे सिलिंडर आढळले. संबंधिताकडे केवळ ७ सिलिंडर साठवण्याची परवानगी असताना हा अतिरिक्त साठा आढळल्याने जप्तीची कारवाई करण्यात आली.


विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर

(महाराष्ट्र शासनाचा अंगिकृत उपक्रम)

कार्यकारी अभियंता, वर्धा पाटबंधारे विभाग, वर्धा

ई-मेल **eewidn@gmail.com** दुरध्वनी क्र.०७१५२-२४३५४८

**निविदा सुचना क्र.२८/वपावि/२०२५-२०२६**

कार्यकारी अभियंता, वर्धा पाटबंधारे विभाग, वर्धा (भ्रमणध्वनी क्र.०७१५२-२४३५४८) हे **Government of India Ministry of Corporate Affairs** यांचेकडे प्रमाणित असलेल्या अधिकृत अभिकरणाकडून खालील कामासाठी ब-१ निविदा (टक्केवारी दराने) मोहरबंद लिफाफ्यात मागविण्यात येत आहे.

कोरी निविदा प्रपत्रे रु.१०००/- व जी.एस.टी.१८ टक्के असे एकुण रु.११८०/- कार्यालयीन कामकाजाच्या वेळेस दिनांक २०.०३.२०२६ ते २७.०३.२०२६ पर्यंत कार्यालयीन वेळेमध्ये प्राप्त करुन भरलेल्या निविदा मोहरबंद लिफाफ्यात मागविण्यात येत आहे. तसेच बयाणा रक्कम (ई.एम.डी.) ची रक्कम विभागीय कार्यालयात धनाकर्षाने नमुद दिनांकापर्यंत जमा करण्यात यावे तसेच कोऱ्या निविदा प्रपत्र व तांत्रिक कागदपत्रे (**Technical Envelop No.01**) बाबत सविस्तर माहिती वर्धा पाटबंधारे विभाग, वर्धा यांचे कार्यालयात मिळेल. निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, वर्धा पाटबंधारे विभाग, वर्धा यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ. क्र. | कामाचे नांव | कामाची किंमत (रु.) | बयाणा रक्कम | काम पूर्ण करण्याचा कालावधी | कोरी निविदा प्रपत्राची किंमत (रु.) | कंत्राटदाराचा वर्ग/वर्गीकरण | शेरा/सदरच्या निविदेसाठी कंत्राटदाराचा आरक्षण निकष |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १. | पंचधारा प्रकल्पाच्या सांडव्यावरील संरक्षण भिंतीचे व त्यावरील लोखंडी कठडे (ग्रील) ची दुरुस्तीचे काम | ५,३३,४४५/- | ५,५००/- | ०६ महिने | १००० + १८% जीएसटी = रु.११८०/- | सुशिक्षित बेरोजगार अभियंता करीता राखीव | |
| २. | उमरी व टेम्भरी लघु प्रकल्प अंतर्गत शेतकऱ्यांना खरीप हंगाम २०२३-२४ मध्ये पिकांकरीता प्रकल्पाचे पाणी मिळण्याबाबत. | ८२,६२६/- | १,०००/- | ०१ महिना | १००० + १८% जीएसटी = रु.११८०/- | वर्ग ९ व त्यावरील पात्र सा.बां.विभाग नोंदणीकृत पात्र कंत्राटदार | |

| | | | |
|---|---|---|---|
| अ) | निविदा लिफाफा स्विकारण्याचा कालावधी | - | दिनांक २०.०३.२०२६ ते २७.०३.२०२६ |
| ब) | निविदा लिफाफा सादर करण्याचा अंतिम कालावधी | - | दिनांक ०१.०४.२०२६ (सायं.६ वाजेपर्यंत) |
| क) | निविदा लिफाफा उघडणे | - | दिनांक ०२.०४.२०२६ (वेळ दुपारला १२.०० वाजता) |

(क्र.जिमाका-वर्धा/२४३/२०२५-२०२६)

स्वाक्षरी/-
कार्यकारी अभियंता,
वर्धा पाटबंधारे विभाग, वर्धा

## विधान भवनातून

### महावितरण कामांतील गैरप्रकारांची वरिष्ठ अधिका-यांमार्फत चौकशी

**मुंबई/प्रतिनिधी :** नाशिक येथे महावितरणच्या कामांमध्ये तसेच खासगी कंत्राटदारांच्या संदर्भात गैरप्रकार झाल्याच्या तक्रारींची दखल घेण्यात आली असून, याप्रकरणी वरिष्ठ अधिका-यांमार्फत चौकशी करण्यात येणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानपरिषदेत प्रश्नोत्तराच्या तासात सांगितले. याबाबत सदस्य अनिल परब यांनी प्रश्न उपस्थित केला.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, महावितरणची अधिकृत कामे आणि खासगी कंत्राटदारांकडून केली जाणारी कामे यामध्ये स्पष्ट फरक आहे. संबंधित कंत्राटदार महावितरणच्या यादीत नाही तसेच त्याला महावितरणकडून कोणतेही अधिकृत काम देण्यात आलेले नाही. मात्र, खासगी कामांच्या संदर्भात पदाचा गैरवापर करून कामे मिळवून देणे किंवा परवानग्यांमध्ये अनियमितता होत असल्याच्या तक्रारी समोर आल्या आहेत. विजेच्या चोरीसंदर्भात प्रकरणांमध्ये कारवाई करण्यात आली असून, पुढेही गरज भासल्यास गुन्हे दाखल करून कायदेशीर कारवाई केली जाईल असेही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी सांगितले.



### पर्यावरण नियमांचे उल्लंघन करणा-या उद्योगांना नोटिस -मंत्री पंकजा मुंडे

**मुंबई/प्रतिनिधी :** चंद्रपूर जिल्ह्यात वाढत्या औद्योगिक प्रदूषणाच्या पार्श्वभूमीवर विविध उद्योगांवर कारवाई करण्यात आली आहे. पर्यावरणीय नियमांचे उल्लंघन करणा-या उद्योगांना नोटिसा बजावण्यात आल्या असल्याची माहिती पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री पंकजा मुंडे यांनी विधानपरिषदेत प्रश्नोत्तराच्या तासात सांगितले. याबाबत सदस्य अभिजीत वंजारी यांनी प्रश्न उपस्थित केला. मंत्री पंकजा मुंडे म्हणाल्या, प्रदूषण कमी करण्यासाठी तांत्रिक सुधारणा, धूळ नियंत्रण, स्वच्छता उपाययोजना आणि पर्यावरणपूरक पद्धतींचा अवलंब करण्यावर शासनाचा भर आहे. चंद्रपूरमधील परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी एप्रिल महिन्याच्या पहिल्या आठवड्यात मी स्वतः भेट देणार असल्याचेही मंत्री मुंडे यांनी स्पष्ट केले. राज्यातील उद्योगांवर महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत नियमित पाहणी करण्यात येत असून, पाहणीदरम्यान आढळलेल्या त्रुटींवर नियमांनुसार कडक कारवाई केली जाते. मंडळाकडून उद्योगांची वेळोवेळी तपासणी करून पर्यावरणीय नियमांचे पालन होत आहे की नाही, याची पडताळणी केली जाते. नियमांचे उल्लंघन आढळल्यास संबंधित उद्योगांना कारणे दाखवा नोटीस बजावली जाते. तसेच आवश्यकतेनुसार अंतरिम निर्देश व प्रस्तावित निर्देश जारी करण्यात येत असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.



### परवानगीशिवाय हाटेल, रेस्टारंटमध्ये मद्य आढळल्यास परवाने रद्द

**मुंबई/प्रतिनिधी :** परवानगीशिवाय हाटेल व रेस्टारंटमध्ये मद्य आढळल्यास संबंधितांचे परवाने रद्द करण्यात येतील. अशी घटना ज्या क्षेत्रामध्ये घडेल त्या क्षेत्रातील पोलीस व प्रशासनातील अधिका-यांची जबाबदारी निश्चित करून त्यांच्यावरही आवश्यक कारवाई करण्यात येईल, असे गृह राज्यमंत्री पंकज भोयर यांनी विधान परिषदेत सांगितले. सदस्य दादाराव केचे यांनी आर्वी (जि.वर्धा) तालुक्यातील हाटेलमधील अवैध व्यवसायबाबत उपस्थित केलेल्या प्रश्नाला उत्तर देताना ते बोलत होते. या प्रश्नाच्या चर्चेत सदस्य शशिकांत शिंदे यांनीही सहभाग घेतला. गृह राज्यमंत्री डा.भोयर म्हणाले, आर्वी (जि.वर्धा) तालुक्यातील हॉटेलमधील अवैध व्यवसाय तक्रारींच्या अनुषंगाने सखोल चौकशी करण्यात आली असून कोणताही गैरप्रकार आढळला नसल्याचा अहवाल प्राप्त झाला आहे. तरीही लोकप्रतिनिधींच्या सूचनांची पुन्हा दखल घेत या प्रकरणाची पुन्हा एकदा चौकशी करण्यात येईल. ही चौकशी अतिरिक्त पोलिस अधीक्षकांमार्फत केली जाईल. या चौकशीत कोणीही दोषी आढळल्यास त्यांच्यावर कारवाई केली जाईल, अशी ग्वाही गृह राज्यमंत्री डा.भोयर यांनी दिली.



### वाहतूक नियम भंग; ई-चलनाद्वारेच दंड आकारणी- गृह राज्यमंत्री

**मुंबई/प्रतिनिधी :** वाहतूक नियमांचे उल्लंघन करणा-यांविरोधात कारवाई करताना पारदर्शकता राखली जात असून ई-चलन प्रणालीद्वारेच ऑनलाइन दंड आकारला जात असल्याची माहिती गृह राज्यमंत्री डा.पंकज भोयर यांनी विधान परिषदेत दिली.सदस्य निरंजन डावखरे यांनी या विषयी विधान परिषदेत प्रश्न उपस्थित केला.गृह राज्यमंत्री पंकज भोयर म्हणाले, महानगरपालिकांनी पार्किंगसाठी जागा निश्चित केलेल्या असतात. या ठिकाणी पार्किंग न करता चुकीच्या ठिकाणी पार्किंग करणा-यांवर वाहतूक पोलीस यांच्याकडून तत्काळ कारवाई केली जाते. या ठिकाणी वाहनमालक उपस्थित नसल्यास संबंधित वाहन टोइंगद्वारे उचलण्यात येते आणि नंतर नियमानुसार दंड आकारला जातो. मात्र कोणत्याही प्रकरणी अनधिकृत पद्धतीने दंडाची वसुली केली जात नसल्याचे त्यांनी सांगितले. नागरिकांनीही वाहतूक नियमांचे पालन करून सहकार्य करावे, असे आवाहन गृह राज्यमंत्री डॉ.पंकज भोयर यांनी यावेळी केले.

### प्रकल्पग्रस्तांच्या जमिनींच्या गैरव्यवहाराची 2 महिन्यांत चौकशी

**मुंबई/प्रतिनिधी :** नंदूरबार जिल्ह्यातील नर्मदा बचाव आंदोलनातील सक्रिय कार्यकर्त्याने शासनाकडून आर्थिक मोबदला व पुनर्वसनाचा लाभ घेतला असलेल्या प्रकरणाची पुढील दोन महिन्यात सखोल चौकशी करण्यात येईल, अशी माहिती राज्यमंत्री अड आशिष जयस्वाल यांनी विधानसभेत दिली. विधानसभा सदस्य आमश्या पाडवी यांनी याविषयीसंदर्भात विधानसभेत लक्षवेधी उपस्थित केली होती. राज्यमंत्री अड आशिष जयस्वाल म्हणाले की, नर्मदा बचाव आंदोलनातील प्रकल्पग्रस्तांच्या बाबतीत शासनाने शासन निर्णय ४ फेब्रुवारी २००४ व २० सप्टेंबर २००४ नुसार कार्यवाही केलेली आहे. नंदुरबार जिल्ह्यातील अक्कलकुवा तालुक्यातील गमन येथील हुन्या रूपा वसावे यांच्यासंदर्भात सविस्तर तक्रार दाखल करावी त्याची चौकशी दोन महिन्यात करण्यात येईल असे त्यांनी यावेळी नमूद केले.

### वर्धा जिल्ह्यातील मजूर संस्थांना 11 कोटी 87 लाखाची 176 कामे

**मुंबई/प्रतिनिधी :** वर्धा जिल्ह्यातील मजूर संस्थांना नियमानुसार काम वाटप केले जात असून जिल्ह्यातील २० संस्थांना ११ कोटी ८७ लाखाची १७६ कामे वाटप करण्यात आली आहेत. मजूर संस्थांना काम वाटपामध्ये कोणतीही अनियमित्ता, गैरप्रकार झाला नसल्याची माहिती सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी विधान परिषदेत दिली.सदस्य दादाराव केचे यांनी यासंदर्भात विधानपरिषदेत लक्षवेधी सूचना मांडली.यावेळी झालेल्या चर्चेत सदस्य अभिजीत वंजारी यांनीही सहभाग घेतला.सहकार मंत्री बाबासाहेब पाटील म्हणाले, वर्धा जिल्ह्यात ३६ मजूर संस्था आहेत. त्यापैकी दोन संस्थांनी नूतनीकरण न केल्याने त्यांना काम देण्यात आलेले नाही. उर्वरित ३४ संस्थांपैकी २० संस्थांना मार्केटिंग फेडरेशनच्या नियमानुसार कामांचे वाटप करण्यात आले आहे. सहकार मंत्री बाबासाहेब पाटील म्हणाले, ज्या संस्थानी फेडरेशनकडे मागणी केलेली नाही त्यांना काम वाटप करण्यात आलेले नाही. मजूर सहकारी संस्थांना काम वाटप करताना पूर्वीचा अनुभव आणि संस्थेचे आर्थिक व्यवहार पाहूनच काम वाटप केले जाते. ज्या १० संस्थांना काम मिळाले नाही, या बाबतची माहिती सदस्यांनी दिल्यास त्यांनाही काम दिले जाईल, असेही सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी सांगितले.

# बलात्काराचा आरोप असलेल्या भोंदूबाबाशी संबंध

## वडेट्टीवार यांनी मागितला रूपाली चाकणकर यांचा राजीनामा

**मुंबई/प्रतिनिधी :** नाशिकमधील स्वयंघोषित ज्योतिषी कॅप्टन अशोक खरात याच्यावर बलात्काराचा गुन्हा दाखल झाला असून नाशिक पोलिसांनी त्याला अटक केली आहे. या प्रकरणात आता शिवसेनेच्या (ठाकरे) नेत्या सुषमा अंधारे आणि काँग्रेसचे नेते विजय वडेट्टीवार यांनी महाराष्ट्र महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांच्यावर आरोपांची राळ उठवली आहे. चाकणकर यांनी कॅप्टन खरातची पाद्यपूजा केल्याचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. तसेच त्याच्यासाठी छत्री घेउन उभ्या असल्याचाही फोटो समोर आला आहे. यावरून त्यांच्या राजीनाम्याची मागणी होत आहे. कॅप्टन खरातची वरात निघाली आहे. त्याच्याकडून जप्त केलेल्या पेनड्राईव्हमध्ये ५६ व्हिडीओ मिळाले आहेत. राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर या भोंदू बाबांचे पाय धुताना एका व्हिडीओत दिसत आहेत. अशावेळी त्या इतर महिलांना काय न्याय देणार? असा सवाल विजय वडेट्टीवार यांनी माध्यमांशी बोलत असताना उपस्थित केला. वडेट्टीवार पुढे म्हणाले, चाकणकर यांचा अंधश्रद्धेवर आणि भविष्यवाणीवर विश्वास आहे, अशा राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षाकडून राज्यातील महिलांनी कोणत्या अपेक्षा ठेवायच्या? कॅप्टन खरात याने महिलांचे शोषण केल्याची माहिती मिळत आहे. अशा भोंदुबाबांचा सुळसुळाट दिसत आहे.

काही राजकीय पुढारी कर्तुत्वाने मोठे होण्यापेक्षा भविष्य पाहून मोठे होण्याची स्वप्न पाहत आहेत. त्यामुळे महाराष्ट्राची प्रगती होईल की अधोगती होईल, असा प्रश्न पडतो. अंधश्रद्धेवर विश्वास असणा-या भगिनींकडून राज्यातील भगिनींना न्याय मिळेल का? असा प्रश्न निर्माण होतो. त्यामुळे त्यांना (चाकणकर) राज्य महिला आयोगाच्या पदावर राहण्याचा नैतिक अधिकार नाही. त्यांनी राजीनामा दिला पाहिजे, अशी आमची मागणी असल्याचेही वडेट्टीवार म्हणाले.संशयित अशोक खरातची नाशिकच्या सिन्नर तालुक्यातील मिरगाव येथे श्री शिवानिका संस्थान नामक संस्था आहे. या संस्थानच्या कार्यकारी मंडळात रुपाली चाकणकर यांचा समावेश असल्याची यादी अंधारे यांनी प्रसारित केली आहे. तसेच या ज्योतिषाकडे अनेक राजकीय नेत्यांचा राबता होता, अशीही माहिती समोर येत आहे. अनेक राजकीय नेत्यांनी या ज्योतिषाच्या सांगण्यावर वेगवेगळ्या अघोरी पूजा करणे, स्वतःच्या हाताची करंगळी कापून घेणे असे अघोरी उद्योग केल्याची चर्चा आहे.



## मनरेगा अंतर्गत कुशल व अकुशल कामांच्या देयकांच्या वितरणासाठी ‘स्पर्श’ प्रणाली लागू

**प्रलंबित रक्कम लवकरच वितरित होणार – मंत्री शंभूराज देसाई**

**मुंबई/प्रतिनिधी :** मनरेगा अंतर्गत कुशल व अकुशल कामांच्या देयकांच्या वितरण प्रक्रियेला गती देण्यासाठी केंद्र शासनाकडून स्पर्श ही नवीन संगणकीय प्रणाली लागू करण्यात आली असून, लवकरच सर्व प्रलंबित रक्कम लाभार्थ्यांच्या खात्यावर थेट जमा केली जाईल, अशी माहिती मंत्री शंभूराज देसाई यांनी विधानसभेत दिली. आमदार नारायण कुचे यांनी गडचिरोली जिल्ह्यातील मनरेगा संदर्भात प्रश्नोत्तरांच्या तासात प्रश्न उपस्थित केला होता. मंत्री शंभूराज देसाई म्हणाले की, मनरेगामधील लाभार्थ्यांना २८०० कोटी रूपयांचे देणे प्रलंबित होते. ही रक्कम वितरित करण्यासाठी केंद्र आणि राज्याच्या हिश्श्याचा समन्वय आवश्यक असून, नव्या स्पर्श प्रणालीद्वारे ही प्रक्रिया अधिक पारदर्शक करण्यात आली आहे. केंद्राचा हिस्सा प्राप्त झाल्यानंतर राज्याचा हिस्सा एफटीओ सायबर ट्रेझरी मध्ये जमा केला जातो आणि त्यानंतर दोन्ही हिस्से एकत्र करून संबंधित लाभार्थ्यांच्या खात्यावर थेट रक्कम जमा केली जाते. ही प्रणाली लागू होउन अवघे चार महिने झाले असल्याने सुरुवातीला काही तांत्रिक अडचणी आल्या, मात्र पुढील एका महिन्यात सर्व प्रक्रिया सुरळीत होउन निधी वितरणाला वेग येईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. या प्रश्नावरील चर्चेत विधानसभा सदस्य डॉ. नितीन राउत, नाना पटोले, प्रकाश सोळंके,भास्कर जाधव यांनीही सहभाग घेतला.



## आराजी वर्ग 2 च्या जमिनींचे वर्ग 1 मध्ये रूपांतरित करण्याचा निर्णय-मुख्यमंत्री

**मुंबई/प्रतिनिधी :** आराजी असलेल्या शेत जमिनीबाबत शेतक-यांची फसवणूक होउ नये यासाठी आराजी असलेली वर्ग २ ची जमीन वर्ग १ मध्ये रूपांतरित करण्याचा निर्णय शासनाने घेतला असून या निर्णयाची अंमलबजावणी सुरू झाली असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधान परिषदेत प्रश्नोत्तराच्या तासावेळी दिली. सदस्य सचिन अहिर यांनी या विषयी विधान परिषदेत प्रश्न उपस्थित केला होता. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, मौजा भिवी ( ता. भिवापूर जि.नागपूर) येथील सर्वोदय सहकारी सामुदायिक शेती सोसायटीच्या नावावर असलेल्या आराजी जमिनीचे वर्ग २ मधून वर्ग १ मध्ये रूपांतरण व्यवहार प्रकरण २०२२ मध्ये घडले. या प्रकरणाची तक्रार २०२५ मध्ये करण्यात आली. तक्रारीनुसार या व्यवहाराची चौकशी करण्यात येत असून कायदेशीर मार्गाने रक्कम वसूल करून संबंधित शेतक-यांना दिलासा दिला जाईल असेही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. या प्रश्नाच्या उत्तरात अधिक माहिती देताना गृह राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर म्हणाले, नागपूर जिल्ह्यातील भिवापूर तालुक्यात आराजी असलेली शेत जमीन वर्ग २ मधून वर्ग १ मध्ये रूपांतरित करणे या प्रकरणी आर्थिक गुन्हे शाखेमार्फत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. न्यायालयात आरोपपत्रही दाखल करण्यात आले असून सुमारे १३ लाख ३० हजार रुपयांची फसवणूक झाल्याचे दिसत आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी सुरू आहे. अशा प्रकारे शेतक-यांची फसवणूक करणा-यांवर कारवाई करण्यात येईल, असेही गृह राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी सांगितले.



## आदिवासी आश्रमशाळांची कामे गतीने पूर्ण करणार - अशोक वूईके

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यातील दुर्गम आणि आदिवासी भागांमध्ये असलेल्या शासकीय आश्रमशाळांच्या बांधकाम व सुविधांबाबत शासन गंभीर आहे. आदिवासी आश्रमशाळांची कामे गतीने पूर्ण करणार असून ज्या ठिकाणी कामे अपूर्ण आहेत तेथील कंत्राटदारांवर कारवाई करण्यात येणार असल्याचे आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक वूईके यांनी विधानसभेत सांगितले. विधानसभा सदस्य नानाभाउ पटोले यांनी यासंदर्भात प्रश्न उपस्थित केला होता. मंत्री डॉ. अशोक वूईके म्हणाले की, गुहीर ता.वाडा जिल्हा पालघर मधील शासकीय आश्रमशाळेचे बांधकाम हे काम पूर्वी सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत सुरू होते. या कामामध्ये विलंब झाला होता. त्यामुळे संबधित ठेकेदारावर कामाच्या विलंबाचा दंड आकारण्यात आला आहे. मात्र दुर्गम भागांतील अडचणी लक्षात घेउन २०१६ पासून स्वतंत्र आदिवासी विभागाच्या माध्यमातून ही कामे गतीने पूर्ण करण्याचा निर्णय घेण्यात आला. मंत्री डॉ. वूईके यांनी सांगितले की, राज्यात सध्या सुमारे ५०० शासकीय आश्रमशाळा असून त्यापैकी ८० टक्के कामे पूर्ण झाली आहेत. उर्वरित कामे लवकर पूर्ण करण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. काही ठिकाणी कंत्राटदारांनी कामात विलंब झाल्यामुळे अडचणी निर्माण झाल्या आहेत. अशा कंत्राटदारांवर कारवाई करण्यासाठी त्यांना ब्लॅकलिस्टमध्ये टाकण्याची शिफारस करण्यात येणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. आश्रमशाळांतील विद्यार्थ्यांच्या निवास व मूलभूत सुविधांसाठी यावर्षी आवश्यक निधीची तरतूद करण्यात आली.

## ‘गुलजार ए रजा’ संस्थेची एटीएसमार्फत चौकशी सुरू-मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**मुंबई/प्रतिनिधी :** गुलजार ए रजा या संस्थेशी संबंधित आर्थिक व्यवहारांबाबत गंभीर बाबी समोर आल्याने या प्रकरणाची एटीएसमार्फत चौकशी सुरू करण्यात आल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानपरिषदेत प्रश्नोत्तराच्या तासात दिली. याबाबत सदस्य विक्रम काळे यांनी प्रश्न उपस्थित केला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, या प्रकरणाची मर्यादा केवळ धार्मिक कारणासाठी निधी जमा करण्यात आला एवढ्यावरच नसून तपासादरम्यान परदेशातील संस्थेकडून सुमारे २५ लाखांची रक्कम जमा झाल्याचे समोर आले आहे. या पार्श्वभूमीवर संबंधित संस्थेची सर्व बँक खाती सील करण्यात आली असून आर्थिक व्यवहारांची सखोल तपासणी सुरू आहे. गेल्या चार वर्षांत सुमारे १८,५७३ देणगीदारांकडून चार जिल्ह्यांतील ४०० ड्?प ब?क्सद्वारे निधी जमा करण्यात आला असून सर्व देणगीदारांची माहिती उपलब्ध नसल्याने त्याची सखोल पडताळणी सुरू आहे. विविध खात्यांमधून रक्कम काढून इतरत्र वळवण्यात आल्याची शक्यता तपासली जात आहे. निधीचा वापर कोणत्या कारणांसाठी करण्यात आला, तसेच त्यामागील उद्देश काय होता, याची चौकशी केली जात आहे.

या प्रकरणातील प्रत्येक पैलू स्पष्ट करण्यासाठी एटीएसकडून समांतर तपास सुरू असून, आवश्यकतेनुसार पुढील कायदेशीर कारवाई करण्यात येणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले.याबाबत अधिक माहिती देताना राज्यमंत्री ड?. पंकज भोयर म्हणाले, संबंधित संस्थेच्या नावाखाली विविध कारणे सांगून नागरिकांकडून सुमारे ४.७३ कोटींची रक्कम जमा करण्यात आली. ट्रस्ट माजलगाव येथे स्थापन करण्यात आला असला तरी बँक खाते लातूर येथील ॲक्सिस बँकेत उघडण्यात आले होते. या प्रकरणात आतापर्यंत दोन आरोपींना अटक करण्यात आली असून आणखी दोघांचा शोध सुरू आहे. ट्रस्टमार्फत आणखी कोणते गैरप्रकार झाले आहेत का, याची सखोल चौकशी सुरू असल्याचे त्यांनी सांगितले.

## ‘तीर्थ विठ्ठल, क्षेत्र विठ्ठल’ कॉफीटेबल बुकचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते प्रकाशन

**मुंबई/प्रतिनिधी :** तीर्थ विठ्ठल, क्षेत्र विठ्ठल काफीटेबल बुकचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते वर्षा निवासस्थानी आज प्रकाशन करण्यात आले. यावेळी ज्येष्ठ साहित्यिका अरुणा ढेरे, ज्येष्ठ गायिका पद्मश्री डा.अश्विनी भिडे-देशपांडे, काफीटेबल बुकचे निर्माते विनोद पवार, माजी खासदार विनय सहस्त्रबुद्धे, मुख्यमंत्र्यांच्या प्रधान सचिव अश्विनी भिडे तसेच शिष्टमंडळातील सदस्य उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, अतिशय सुंदर अशा काफी टेबल बुकचे प्रकाशन करता आले याबद्दल अतिशय आनंद आहे. महाराष्ट्राचे प्रतिबिंब हे आपल्याला आपल्या वारीमध्ये दिसते, ते पंढरपुरात दिसते, ते विठ्ठलाच्या आराधनेत आपल्याला पाहायला मिळते. इतक्या वेगवेगळ्या कथा, प्रत्येक वारीमध्ये तयार होतात. ते सर्व काफी टेबल बुकच्या माध्यमातून आपल्याला अनुभवता येणार आहे. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, तीर्थ आणि त्या तीर्थातला जो देव आहे, हे दोन्ही महत्त्वाचे आहेत. त्याची माहिती, इतिहास किंवा त्यातल्या प्रमुख गोष्टी या काफी टेबल बुकच्या माध्यमातून मिळाले. माहिती आणि छायाचित्रे यामुळे हे काफी टेबल बुक संग्रहणीय झाले आहे. आपली सांस्कृतिक माहिती जर कोणाला द्यायची असेल, तर काय द्यावे तर यामध्ये या पुस्तकाचा समावेश झाला आहे. इर्न्टेन्जिबल हेरिटेजमध्ये युनेस्कोला आता ही पंढरीची वारी सादर करण्यात येईल, यासाठी हे काफी टेबल बुक महत्त्वाचे ठरेल, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.



## महाराष्ट्रधर्म वाढवुया...मराठीची गुढी उंच उभी करु या..!

**मुख्यमंत्र्याकडून गुढी पाडव्याच्या शुभेच्छा**

**मुंबई/प्रतिनिधी :** 'महाराष्ट्रधर्म वाढवुया...मराठीची गुढी उंच उभी करु या..' या आकांक्षेसह मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मराठी नववर्ष प्रारंभ अर्थात गुढी पाडव्याच्या शुभेच्छा दिल्या आहेत. नववर्षाच्या पूर्वसंध्येला दिलेल्या या संदेशात म्हटले आहे की,' नववर्ष आपल्या सर्वांसाठी सुख, समाधान आणि समृद्धी घेउन येवो. सर्वांच्या आशा-आकांक्षा आणि मनोकामना पूर्ण करणारे ठरावे. नवसंकल्पना साकार व्हाव्यात यासाठी उर्जा देणारे ठरावे त्यासाठी सर्वांना निरामय आरोग्य लाभो, हीच प्रार्थना. यातून लाभणा-या नवचैतन्यातून महाराष्ट्रधर्म वाढविण्याचा... मराठीची गुढी आणखी उंच उभी करण्याचा निर्धार करु या !'




## आरोग्य उपकेंद्रातील अंशकालीन स्त्री परिचरांच्या मानधनात दुप्पट वाढ

मुंबई दि. १८ : सार्वजनिक आरोग्य विभागाच्या आरोग्य उपकेंद्रामध्ये कार्यरत असलेल्या अंशकालीन स्त्री परिचरांच्या मासिक मानधनात दुप्पट वाढ करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय सार्वजनिक आरोग्य विभागाने घेतला आहे. १ एप्रिल २०२६ पासून मानधनात वाढ करण्यात येणार असून याबाबतचा शासन निर्णय जारी करण्यात आला आहे. आरोग्य उपकेंद्रातील अंशकालीन स्त्री परिचर गाव पातळीवर, आदिवासी , दुर्गम, डोंगराळ भागात प्राथमिक स्वरुपाच्या आरोग्य सेवा तळागाळापर्यंत पोहोचवण्यासाठी मदत करतात. तसेच आरोग्य विभागाकडून राबविण्यात येणा-या विविध आरोग्यविषयक कार्यक्रमांचा लाभ प्रत्येक कुटुंबापर्यंत पोहचविण्यातही स्त्री परिचर महत्वाची भूमिका बजावत असतात. त्यांच्या कामाचे स्वरुप पाहता त्यांच्या मानधनात वाढ करण्याची मागणी लोकप्रतिनिधी व संघटनाकडूनही होत होती. अंशकालीन स्त्री परिचरांना २०१९ च्या शासन निर्णयानुसार दरमहा तीन हजार रुपये मानधन अदा करण्यात येत होते. स्त्री परिचरांच्या कामाचे बदलते स्वरूप, आरोग्य सेवेतील वाढती भूमिका आणि वाढत्या महागाईचा विचार करता आरोग्यमंत्र्यांनी पुढाकार घेउन स्त्री परिचरांच्या मासिक मानधनात तीन हजार रुपये वाढ केली असून आता त्यांना सध्याचे तीन हजार आणि प्रस्तावित वाढ तीन हजार रुपये असे एकूण सहा हजार रुपये मासिक मानधन १ एप्रिल २०२६ पासून देण्यात येणार आहे. सर्व जिल्हा परिषदांनी अंशकालीन स्त्री परिचरांना प्रचलित कार्यपद्धतीनुसार सुधारित मासिक मानधन देण्याची कार्यवाही करावी.तसेच दरमहा दहा तारखेपर्यंत मासिक मानधनाची रक्कम अदा करण्याची कार्यवाही करावी.याबाबतचा शासन निर्णय सार्वजनिक आरोग्य विभागाने नुकताच प्रसिद्ध केला आहे. या निर्णयामुळे राज्यभरातील अंशकालीन स्त्री परिचरांकडून समाधान व्यक्त होत आहे

## कलम 155 च्या गैरवापर प्रकरणी चौकशीचे आदेश

**■ दोषींवर कडक कारवाई होणार ■ महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे**

**मुंबई/प्रतिनिधी :** महसूल विभागात कलम १५५ च्या गैरवापरामुळे जमीन नोंदींमध्ये झालेल्या गंभीर अनियमिततेची शासनाने दखल घेतली असून या संदर्भात राज्यात सखोल चौकशीचे आदेश दिले आहेत. या प्रकरणी दोषींवर कडक कारवाई करण्यात येणार असल्याची माहिती महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधान परिषदेत दिली. सदस्य अड. अनिल परब यांनी उपस्थित केलेल्या लक्षवेधी सूचनेवर उत्तर देताना मंत्री बावनकुळे बोलत होते.

मंत्री बावनकुळे म्हणाले की, पुणे जिल्ह्यात ३८,०४७ प्रकरणे आढळून आली असून त्यापैकी २,३८८ प्रकरणांची तपासणी करण्यात आली आहे. या तपासणीत नावांमध्ये बदल, जमिनीचे क्षेत्रफळ कमी-जास्त करणे तसेच सातबारा उता-यात फेरफार केल्याचे प्रकार समोर आले आहेत. या प्रकरणी विभागीय आयुक्तांमार्फत चौकशी सुरू असून राज्यातील सर्व विभागांना अशी तपासणी करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. दोषी अधिका-यांविरोधात फौजदारी गुन्हे दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. तसेच जिल्हाधिका-यांना नोंदींचे पुनरावलोकन करून आवश्यक दुरुस्त्या करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. राज्यातील नागरिकांचे हक्क अबाधित राखण्यासाठी शासन कटिबद्ध असून अधिवेशन संपेपर्यंत या प्रकरणाचा सविस्तर ॲक्शन टेकन रिपोर्ट सभागृहात सादर करण्यात येईल, असेही मंत्री बावनकुळे यांनी स्पष्ट केले. या चर्चेत सदस्य सचिन अहिर यांनी सहभाग घेतला.



# संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

**शे**तकरी कर्जमाफीच्या घोषणा नेहमी निवडणुकीच्या तोंडावर होत असतात. महाराष्ट्रात ६ मार्च रोजी जाहीर झालेली कर्जमाफी मात्र निवडणुकीतील आश्वासनांची पूर्तता करण्यासाठी आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचा देशातील केंद्रबिंदू गेली अनेक वर्षे महाराष्ट्रात विदर्भ- मराठवाड्यात आहे. अनेकविध प्रयत्नांनंतरही आत्महत्यांच्या इथल्या आकड्यात फार घट नाही. आत्महत्या करण्यापर्यंत पोहोचलेला शेतकरी अडचणीत असतोच; पण त्याचवेळी तशाच अडचणीत असलेले अन्यही शेतकरी असतातच. त्यांना, त्यांच्या कुटुंबीयांना दिलासा देण्यासाठी सरकारला विविध योजनांचे बळ द्यावे लागते. कर्जमाफी हा त्यातला सर्वात लोकप्रिय मार्ग आहे. केंद्र सरकारने १९९० मध्ये पहिल्यांदा देशपातळीवर कर्जमाफी जाहीर केली. त्यावेळी त्यासाठी १० हजार कोटी रुपये खर्च झाले होते. २००८ मध्ये केंद्र सरकारने शेतकऱ्यांसाठी देशपातळीवरील दुसरी कर्जमाफी जाहीर केली. त्यावर तेव्हा ५२ हजार ५०० कोटी रुपये खर्च झाले होते. रिझर्व्ह बँकेच्या एका अभ्यास गटाने २०१६-१७ मध्ये या दोन्ही योजनांचा आढावा घेतला, तेव्हा त्यावर्षी या दोन्ही योजनांची किमत अनुक्रमे ५० हजार ६०० कोटी आणि ८१ हजार २०० कोटी ठरवली गेली. त्या योजनांचा असाच विचार आत्ता केला, तर त्याची आजची किमत आणखी किती तरी पटीने वाढलेली असेल केंद्र सरकारने त्यानंतर देशपातळीवर सरसकट कर्जमाफी योजना आणली नसली, तरी 'पंतप्रधान किसान सन्मान निधी', 'पंतप्रधान पीक विमा योजना, व्यापक प्रमाणावर राबवल्या जात आहेत. त्याचा शेतकऱ्यांना लाभ होतो आहेच. पण, तरीही राज्य सरकारांकडून वेळोवेळी कर्जमाफी योजना जाहीर होतच आहेत. त्यासाठी वेगवेगळे निकषही वापरले जात आहेत. १९९० पासून केंद्र आणि राज्य सरकारांच्या शेतकऱ्यांसाठीच्या अशा कर्जमाफी योजनांतून तब्बल तीन लाख कोटी रुपयांपेक्षाही अधिक रक्कम खर्च झाली आहे!! तरीही शेतकरी असमाधानी आहे. राज्याच्या कोणत्या ना कोणत्या भागातून शेतकऱ्यांच्या नुकसान भरपाईच्या, कर्जमाफीच्या मागण्या सुरूच आहेत. चूक शेतकऱ्यांची नाही आणि राज्य सरकारांची नाही. मतदारांतील सर्वात मोठ्या वर्गाला दिलासा देण्यासाठी सरकार या चक्रात फिरत राहतात. रिझर्व्ह बँक आणि शेती क्षेत्रातील तज्ज्ञांच्या सूचनांकडे लक्ष देऊन, धोरण म्हणून

## दीर्घकालीन उपाय?

या चक्रातून सुटण्याचा निर्धार सरकारांनी केला पाहिजे. त्यातच शेतकऱ्यांचे अधिक हित आहे. महाराष्ट्रात यापूर्वी २०१७ आणि २०१९ अशी दोनदा कर्जमाफी केली गेली. केंद्र सरकारच्या योजना गृहीत धरल्या, तर महाराष्ट्रातल्या शेतकऱ्यांना १९९०, २००८, २०१७, २०१९ आणि २०२६ अशा पाच वेळा सार्वत्रिक कर्जमाफीचा लाभ घेता आला. २०२३ मध्ये जाहीर झालेली 'नमो शेतकरी महासन्मान योजना' सध्या राज्यात सुरू आहे. 'पंतप्रधान किसान सन्मान निधी' आणि ही योजना मिळून शेतकऱ्यांच्या खात्यात दरमहा दोन हजार रुपये जमा करत आहे. अधेमधे आपत्कालीन परिस्थितीत मिळालेली तत्कालिक नुकसान भरपाई, विशिष्ट अनुदाने वेगळी. तरीही महाराष्ट्रातल्या शेतकऱ्यांची परिस्थिती देशात जास्त चांगली आहे, असे म्हणता येणार नाही. निवडणुकीत दिलेल्या आश्वासनाची पूर्तता म्हणून राज्य सरकारने या वर्षीच्या अर्थसंकल्पात शेतकऱ्यांना सर्वसाधारणतः दोन लाख रुपये कर्जमाफी जाहीर केली. नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्याला पन्नास हजार रुपयांचे प्रोत्साहनही देऊ केले. ही वचनपूर्ती म्हणून कौतुकास्पद बाब असली, तरी आपल्या समस्येवरच हे औषध नाही, हे शेतकऱ्यांनीही ओळखण्याची वेळ आली आहे. त्याऐवजी शेतीला जोड म्हणून पशुसंवर्धन, मत्स्यपालनासारख्या जोडधंद्यांचा आधुनिक पद्धतीने विचार केला, त्यासाठी सरकारने देऊ केलेल्या योजनांचा लाभघेतला, तर वारंवार कर्जमाफीच्या मागणीच्या दुष्टचक्रातून त्यांचीही सुटका होईल. अर्थात त्यासाठी शेतकरी वर्गाला उद्युक्त करावे लागेल. हा अर्थशास्त्रीय विचार त्यांच्यात रुजवावा लागेल. व्यापक प्रवोधन मोहीम आखून या योजनांचा, तसेच सौर ऊर्जेद्वारे स्वावलंबी होण्याच्या योजनांचा लाभ घेणे सुलभ केले, तर ग्रामीण अर्थव्यवस्थेला चांगली बळकट येईल. शेतकऱ्यांच्या कर्जमाफीच्या योजनांना आर्थिक क्षेत्रातून कायम विरोध असतो. त्यांच्या दृष्टिकोनातून शेतकऱ्याची मानसिकता यामुळे विघडतेच, पण ग्रामीण अर्थपुरवठ्याच्या चक्रालाही यामुळे बाधा पोहोचते. शेतकऱ्याची अर्थसंस्थांकडील पत घसरते. बँका शेतकऱ्याला, शेती क्षेत्राला कर्ज देण्यास नाखुश राहतात. शेतकऱ्याचा भांडवली खर्च कमी करण्यासाठी, त्याच्या उत्पादनात वाढ होण्यासाठी, शेतीच्या यांत्रिकीकरणाला किवा आधुनिकतेला गती देण्यासाठी; या सगळ्याच्या संशोधनासाठी जो निधी उपलब्ध व्हायला हवा, तो होत नाही. त्यामुळे, यात ना शेतकऱ्याची प्रगती होत, ना शेती क्षेत्राची, पर्यायाने देशाची. जुनी दुखणी तशीच राहतात. त्यावर वेळोवेळी वरवरची मलमपट्टी होते. 'शेतकऱ्या'चे प्रश्न न सुटता, 'शेतकरी मतदारा'ला काही प्रमाणात खूश करता येते. त्यातून राजकीय पक्षांना तात्कालिक लाभ मिळतो, शेतकऱ्याला हलकासा दिलासा मिळतो; पण 'मतदार' म्हणूनही त्याचे असमाधान कायम राहाते. कारण, 'सात-बारा कोरा करण्याच्या कितीही घोषणा झाल्या, तरी व्यवहारात ते अतिशय कठीण आहे. संपूर्ण देशाची, सर्व क्षेत्रातली प्रगती, विकासकामे ठप्प करून हे करायचे म्हटले, तरी त्यातूनही प्रश्न सुटणार नाहीच. सात-बारा कायमचा कोरा कधीच होत नाही. सात-वाऱ्यावर बोजा चढू नये, यादृष्टीने अधिक शाश्वत उपायांची गरज आहे. त्या उपायांसाठी सरकारांना पुरेशी उसंत दिली पाहिजे. सर्व राजकीय पक्षांना हे चांगले माहीत आहे. तरीही 'आपली बाजू बदलण्यासाठी' हे सर्वात सोपे हत्यार त्यांच्याकडून वारंवार वापरले जातेच. संपूर्ण देशातल्याच; पण खासकरून महाराष्ट्र, मध्य प्रदेश, राजस्थान, छत्तीसगड, कर्नाटक आणि तेलंगणातल्या शेतकऱ्यांनी हे समजावून घेण्याची जास्त गरज आहे. जे आज मिळाले, ते उत्तमच. यानंतर मात्र दीर्घकालीन उपायांचा आग्रह धरण्याचा विचार केला, तर त्यात खरे हित आहे.

# तेलाबाबत 'सावध ऐका पुढल्या हाका'

**पेटलेले तेल आणि युध्दाची ठिणगी आपल्या उंबरठ्यावर पोहोचण्याआधीच सुरक्षेचे उपाय योजून योग्य धोरण आखणे अधिक समंजसपणाचे ठरेल.**

**अ**मेरिका, इस्रायल आणि इराण यांच्यातील राजकीय वैमनस्यातून सुरू झालेल्या युद्धाला दोन आठवडे उलटत असून संपूर्ण आखाती प्रदेश या युद्धाच्या झळांत होरपळत असताना जगाच्या अनेक अर्थव्यवस्थांना याचे परिणाम कमी-अधिक प्रमाणात जाणवू लागलेले आहेत. इराक, सौदी अरेबिया इत्यादी पेट्रोलियम व खनिज संपत्तीने संपन्न असलेल्या देशांमधून जगातील कित्येक देशांना होर्मूझ सामुद्रधुनीतून होणारी पेट्रोलियमची निर्यात ठप्प झाली आहे व त्यातून इंधन टंचाईची समस्या जगापुढे आ वासून उभी राहिली आहे. या पार्श्वभूमीवर अनेक देशांना महागाईच्या संकटाचा सामना करावा लागेल व जनसामान्यांचे जीवन विस्कळीत होईल अशा प्रकारचे एक चित्र निर्माण झालेले आहे. राजकीय अर्थशास्त्राच्या दृष्टिकोनातून या परिस्थितीकडे पाहिले असता जागतिकीकरणानंतर आयात निर्यातीच्या संदर्भात देशांचे परस्परावलंबित्व प्रचंड प्रमाणावर वाढले असून अशा प्रकारची युद्धसदृश्य परिस्थिती निर्माण झाली तर तिचे परिणाम एका विशिष्ट देशापुरते मर्यादित न राहता संपूर्ण जागतिक अर्थव्यवस्थेला त्याचे परिणाम भोगावे लागतात.

भारताच्या संदर्भात युद्धाच्या पार्श्वभूमीवर महागाई वाढीची कुठलीही शक्यता दिसत नसून सुरळीत असलेली पुरवठ्याची साखळी, देशांतर्गत बाजाराचे चोख व्यवस्थापन आणि जागतिक पटलावर होणाऱ्या बदलांवर लक्ष ठेवून उचललेले धोरणात्मक पाऊल या सर्वांमुळे भारतीय बाजारपेठेत महागाईची परिस्थिती निर्माण होणार नाही, असे आश्वासन भारत सरकार तसेच रिझर्व बँकेच्या माध्यमातून देण्यात आलेले आहे. भारतीय ग्राहक बाजारपेठेचा विचार करता महागाईची सध्याची परिस्थिती, युद्धाच्या पार्श्वभूमीवर असलेले संभाव्य धोके आणि भविष्यकालीन अंदाज या दृष्टीने महागाईचे विश्लेषण करता येईल.

सध्याच्या परिस्थितीत महागाईचा किंमत निर्देशांक हा २.७५ टक्के एवढा असून महागाईचा आधारभूत निर्देशांक ३.४ टक्के आहे. जगातील इतर अर्थव्यवस्थांचा विचार करता भारतातील महागाईदर नियंत्रणात असून युद्धाच्या पार्श्वभूमीवर काही घटकांचा यावर परिणाम होणे अपेक्षित आहे. वित्त मंत्रालय आणि रिझर्व बँक यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीनुसार युद्धाचा महागाईवरील परिणाम टाळण्यासाठी अनेक उपाययोजना करण्यात येत आहेत. इंधनाच्या दरातील बदल, पुरवठा साखळीतील बदल आणि चलन विनिमय दरातील बदल या तीन घटकांच्या आधारे महागाई व आखाती युद्ध यांचे विश्लेषण करता येईल. साधारणतः भारतीय बाजारपेठेत भाववाढ निर्माण करणारे दोन कारणीभूत घटक म्हणजे पेट्रोलियम व अन्नपदार्थ यांच्यातील किंमतवाढ होय. भारतीय बाजारात निर्माण होणारी महागाईची परिस्थिती ही अन्नधान्याच्या किमती आणि पेट्रोलच्या किमती यावरून निर्धारित होते. चालू हंगामात शेतीचे पुरेसे उत्पादन झाले असल्याने पुरवठा साखळी सुरळीत असून त्यातून महागाई वाढण्याची शक्यता नाही परंतु युद्धाच्या पार्श्वभूमीवर पेट्रोलियमची आयात वरचेवर महाग होत गेली तर त्याचा परिणाम प्रकर्षाने दिसून येईल.




भारतात एकूण गरजेपैकी ८० ते ८५ टक्के तेल आयात केले जाते. तसेच घरगुती व व्यावसायिक वापरासाठीच्या गॅसची आयात एकूण आयातीच्या १८ टक्के आहे. देशाच्या एकूण गरजेच्या ५० टक्क्यांपेक्षा जास्त एलपीजी गॅसची आयात देशात करावी लागते. सौदी अरेबिया, कतार आणि युनायटेड अरब अमिरात या देशांकडून आपण एलपीजीची आयात करतो. भारत हा एलपीजी गॅसचा चीननंतर जगातील दुसऱ्या क्रमांकाचा आयातदार देश आहे. त्यामुळे तेलाच्या आयातीचा खर्च वाढला तर त्याचा थेट परिणाम हा देशांतर्गत पेट्रोल व डिझेलच्या किमतीवर दिसून येईल. वाहतूक खर्च वाढेल व त्यातून वस्तू व सेवांच्या किमती वाढतील. तेलाच्या आयातीचा खर्च हा अशा प्रकारे भाववाढीशी थेट संबंधित असतो. गेल्या दोन ते तीन दिवसांत घरगुती गॅस सिलिंडरचे भाव ६० ते ७० रुपयांनी वाढले असून व्यावसायिक वापरासाठीच्या गॅस सिलिंडरची किंमत साधारणतः ११५ रुपयांनी वाढली आहे. त्याचा तुटवडा देशातील अनेक शहरांत जाणवत आहे. त्यामुळे हॉटेल व्यवसाय अडचणीत सापडला आहे. घरगुती वापरासाठीच्या गॅस सिलिंडरचा मुबलक साठा देशात असून लोकांनी साठेबाजी करू नये यासाठी सरकार प्रयत्नशील आहे. तसेच खबरदारीचा उपाय म्हणून देशात अत्यावश्यक वस्तू कायदा लागू केला असून सरकार सर्व बाजूने परिस्थितीवर लक्ष ठेवून आहे.

**पेट्रोल, डिझेलच्या किमतीचे निर्धारण कसे होते?**

इंधनाच्या किमती महागाईला कारणीभूत ठरत असल्याने देशांतर्गत बाजारात या किमतीचे निर्धारण कसे होते हे समजून घेणे महत्वाचे आहे. समजा मुंबईसारख्या शहरात पेट्रोल प्रति लिटर १०५ रुपये असेल तर त्यात कच्चे तेल आयात करणे व त्याच्या शुद्धीकरणाचा खर्च हा साधारणतः ३५ ते ४० रुपये, केंद्रीय उत्पादन कराचा वाटा २० ते २५ रुपये, राज्य सरकारचा मूल्यवर्धित कर २५ ते ३० रुपये व शुद्धीकरण केलेल्या तेलाचा वाहतूक खर्च ५ ते १० रुपये एवढा असतो. या सर्व घटकांचा विचार करून पेट्रोल व डिझेलच्या किमती ठरत असतात. तसेच प्रत्येक राज्याचा मूल्यवर्धित कर हा वेगवेगळा असल्याने शहरागणिक पेट्रोलच्या किमती वेगवेगळ्या असतात.

तेलाच्या आयातीचा वाढत खर्च लक्षात घेऊन पेट्रोल व डिझेलचे देशांतर्गत उत्पादन वाढवणे, केंद्र व राज्य सरकारच्या पेट्रोल वरील करात बदल करणे व तेलाच्या आयातीचे विविध स्रोत शोधणे या उपाययोजना सरकारकडून केल्या जात आहेत व म्हणूनच देशात महागाई वाढणार नाही याची हमी सरकार देत आहे.

मागच्या काही वर्षात भारताने रशियाकडून तेल आयात करण्याचे प्रमाण वाढवले असून मध्य आशियातील आखाती देशांवरील अवलंबित्व कमी केले आहे. २०२४ च्या आकडेवारीनुसार तेलाच्या एकूण आयातीपैकी ३६ टक्के तेल आयात रशियामधून, १३ टक्के आयात सौदी अरेबियाकडून तर २१ टक्के आयात इराकमधून होत होती. रशियाकडून स्वस्त दरात खरेदी केलेले तेल व ते साठवण्याच्या क्षमतेत केलेली वाढ यामुळे नजीकच्या काळात देशात तेल टंचाई निर्माण होणार नाही. तसेच रिझर्व्ह बँकेच्या अंदाजांनुसार तेलाची प्रति पिंप किंमत ९० डॉलर वरून ११० डॉलरपर्यंत गेली तरी त्याचा देशातील किंमत पातळीवर होणार परिणाम ०.३% एवढाच मर्यादित असेल. अर्थात ही युद्धकालीन परिस्थिती दीर्घ काळ चालू राहिली तर चलन विनिमय दरातील अस्थिरता, अनियमित पुरवठा, जागतिक बाजारातील मागणीतील चढ-उतार अशा सर्व बदलांच्या एकत्रित परिणामामुळे महागाई वाढू शकते.

या घडामोडींच्या पार्श्वभूमीवर ऊर्जा सुरक्षा हा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला असून तेलासारख्या पर्यावरणास धोका निर्माण करणाऱ्या संसाधनांवर अवलंबून न राहता सौर ऊर्जेसारख्या नवीकरणक्षम ऊर्जा स्रोतांवर भर देऊन स्वावलंबित्व मिळवले पाहिजे हा विचार पुन्हा एकदा अधोरेखित होतो आहे. या संदर्भात जपान, जर्मनी या देशांचे उदाहरण अनुकरणीय आहे. भू- राजकीय गुंतागुंत, आर्थिक आणि सामरिक हितसंबंधातील बदलते आयाम आणि अनिश्चितता येत्या काळात मोठी भूमिका बजावणार असून आखाती देशांत पेटलेले तेल आणि युद्धाची ठिणगी आपल्या उंबरठ्यावर पोहोचण्याआधी सुरक्षेचे उपाय योजून 'सावध ऐका पुढल्या हाका' हा कानमंत्र लक्षात घेऊन धोरण आखणे अधिक समंजसपणाचे ठरेल.

**अपर्णा कुळकर्णी**

# सारस्वतांच्या संस्थेतील निवडणुकीचा तमाशा

**खलबत्ता**
**विनोद देशमुख**

**वि**दर्भ साहित्य संघाची गाजलेली निवडणूक संपली.निकाल लागला. डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी यांच्या नेतृत्वाखालील आमचे पॅनल, विद्यमान अध्यक्ष प्रदीप दाते यांचे पॅनल आणि डॉ. रवीन्द्र शोभणे यांचे अर्ध पॅनल हे तिघेही पराभूत झाले.डॉ.गिरीश गांधी यांचे सृजन सेतू पॅनल ९५ टक्के यशासह विजयी झाले.त्यांच्यासह सर्व विजेत्यांचे हार्दिक अभिनंदन.आतातरी वि.सा.संघ सुधारेल,अशी अपेक्षा आहे.

कारण साहित्यिक म्हणून समाजात स्वत:चा वेगळेपणा जपत मिरवणारे आणि सतत अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा जप करणारे लोक स्वत:च्या संस्थेत किती एकतर्फी, लोकशाहीविरोधी आणि मगरूरपणे वावरतात, याचा विदारक अनुभव या पंचवार्षिक निवडणुकीत मी गेला महिनाभर घेतला.त्याचा हा 'आंखो देखा हाल' किंवा रिपोर्ट कार्डच म्हणा ना! या निवडणुकीत कार्यकारी मंडळाच्या २२ सदस्यपदांसाठी मीही एक उमेदवार होतो. परंतु, या लिखाणाचा त्या उमेदवारीशी संबंध नाही. फक्त पत्रकार म्हणून जे दिसले-पाहिले-अनुभवले, तेच इथे मांडले आहे.

गेले अर्धशतक मराठी पत्रकारिता करताना, एकदाही संधी न मिळाल्यामुळे, यावेळी उतारवयात तरी विदर्भ साहित्य संघाच्या कार्यकारिणीत जाऊन पाहावे म्हणून मी या निवडणुकीत उतरलो. माझे वैचारिक विरोधक, पण घनिष्ठ मित्र, वि. सा. संघ वाचवा पॅनलचे प्रमुख आणि अध्यक्षीय उमेदवार डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी यांनी त्यांच्या उमेदवारीचे सूचक बनवून आणि कार्यकारिणी सदस्यत्वाची उमेदवारी देऊन मला ही संधी दिली. त्या दिवसापासून निकाल लागेपर्यंत (मतदान २० दिवसपर्यंत हनुमानाच्या शेपटीप्रमाणे लांबच लांब चालले अन् निकालाला दोन दिवस लागले !) या संपूर्ण निवडणुकीत केवळ उबग आणणारेच अनुभव चढत्या भाजणीने येत गेले, हे मला स्पष्टपणे सांगितले पाहिजे. म्हणूनच वि.सा.संघाला आणि संबंधितांना खलबत्त्यात कुटण्याचा हा उपद्व्याप.

या निवडणुकीची एकूणच प्रक्रिया ढिसाळ. घोळच घोळ असलेली फक्त साडेसात हजारांची मतदारयादी, postal ballet प्रणालीतील सावळागोंधळ, पोस्टमनला फितवणे, प्रतिनिधीमार्फत मतदान करण्याच्या तरतुदीचा सर्रास गैरवापर, मतदारांच्या घरी जाऊन मतपत्रिकांची पाकिटे गोळा करणे, मतपत्रिका पळवणे/चोरणे, मृत मतदारांच्या नावांनी मतदान करणे हे सारे पाहून असा प्रश्न पडला की, साहित्य क्षेत्राला लोकशाही लागू नाही का? धर्मादाय आयुक्ताकडे ट्रस्ट म्हणून नोंदल्या गेलेल्या संस्थेच्या निवडणुकीत इतका बाजारूपणा असेल तर अशा संस्था हव्यातच कशाला कारण, साहित्यिकांच्या नावाने या निवडणुकीत एखाद्या राजकीय निवडणुकीसारखे पूर्ण राजकारण उघडपणे झाले. एकंदरीत, या निवडणुकीला 'तमाशा' हा एकच शब्द शोभून दिसतो बघा.

**(क्रमशः)**

# संवाद

## अन्नाची नासाडी

एकीकडे काही लोकांना एक वेळचे अन्नही मिळत नाही, तर दुसरीकडे अन्नाची अशी नासाडी ही परस्परविरोधी दृश्ये काय दर्शवतात?आणि ही नासाडी केवळ श्रीमंतांकडूनच होते असे नाही तर मध्यमवर्गीय परिवारातील लोक देखील यात सहभागी आहेत. 'महागाईने कंबरडे मोडले' अशा बातम्या ऐकताना, मॉल्स आणि हॉटेल्समधील गर्दी आणि अन्ननासाडीचे दृश्य मनाला विचार करायला भाग पाडते.बाहेरगावी शिक्षण घेणारे विद्यार्थी मेस अथवा डबा लावतात. मात्र अनेकदा आठवड्यातून एक-दोन वेळा तरी डब्यातील अन्न जसच्या तसं कचऱ्यात टाकले जाते. असे करतांना आपले काही चुकत आहे याची जाणीव देखील त्यांना नसते. महिन्यातले अर्धे दिवस मेसचा डबा कचऱ्यात टाकणारी मुले आणि मुलांच्या हट्टापायी खूप सारे पदार्थ मागवून त्यातील निम्म्याहून जास्त अन्न वाया घालवणारे सुशिक्षित पालक समाजाचे दोषी नाहीत का? पूर्वी घरातले मोठे सांगायचे 'अन्न म्हणजे देवाचा प्रसाद आहे, त्याची नासाडी करू नये.'त्या काळी पैशाची किंमत कळत होती आणि अन्नाचा आदरही होता.आज मात्र सुविधा वाढल्या, पैसा सहज उपलब्ध झाला, पण संवेदनशीलता कमी होत चालली आहे.खरी महागाई केवळ पैशांची नसते; ती आपल्या विचारांचीही असते. जेव्हा आपण अन्न वाया घालवतो, अनावश्यक खर्च करतो, तेव्हा आपण पैशाचे, श्रमाचे महत्त्व कमी करत असतो.अन्नाची कदर करणे, गरजेपुरताच खर्च करणे आणि साधेपणाने जगणे या छोट्या पण महत्त्वाच्या गोष्टी पुन्हा आत्मसात करणे आजची गरज आहे.

**प्रिया बागडदेव**

## बेरोजगारीचे प्रमाण वाढले

अझीम प्रेमजी विद्यापीठाने बेरोजगारीचा एक अहवाल तयार केला आहे. देशात मुला -मुलींमध्ये शिक्षणाचे प्रमाण वाढले आहे. पण त्यामानाने नोकऱ्या मिळण्याचे प्रमाण कमी आहे. त्या विद्यापीठाच्या स्टेट ऑफ वर्किंग अहवालानुसार देशातील २० ते २९ वयोगटातील तब्बल १. १ कोटी पदवीधर बेकार आहेत ही संख्या जवळपास ४० टक्के एवढी आहे. या वयोगटात एकूण पदवीधारकांची संख्या ६. ३ कोटी एवढी आहे. एक अंदाजानुसार २००४-२००५ पासून दरवर्षी ५० लाख पदवीधारकांची भर पडते त्यापैकी केवळ २८ लाख पदवीधारकच नोकरी मिळविण्यात पात्र ठरतात. पदवी पूर्ण झाल्यानंतर एका वर्षात सुमारे ७ टक्के पदवीधारकांना नोकरी प्राप्त होते. अलीकडच्या काही वर्षात पदवीधारकांना सुद्धा अनेक ठिकाणी कमी पगारावर काम करावे लागते असे चित्र आहे. एकूणच पदवीधारकांची बेकारी हा मोठा प्रश्न आपल्या देशासमोर आहे. काही तरुण स्वतःचा व्यवसाय किंवा उधोग सुरु करतात. पण हे सर्वानाच जमते असे नाही. एका बातमीनुसार परदेशात अनेक नोकरीच्या संधी उपलब्ध आहेत. जर्मनी रशिया आदी देशात अनेक ठिकाणी नोकरीच्या संधी आहेत. पण बऱ्याच पदवीधरांना याची पूर्ण माहिती असत नाही. सरकारी पातळीवर प्रत्येक जिल्ह्यात असे नोकरीचे माहितीचे केंद्र उघडावे जेथे परदेशी नोकरीसंबंधी पूर्ण माहिती उपलब्ध करावी. याचा फायदा बेरोजगार पदवीधरांना होईल सरकार कडून सुद्धा राज्यातील तरुण तरुणीना अधिक रोजगार संधी देण्याचा प्रयत्न करत आहे.

**शांताराम वाघ**

## राजकारणाचे वाभाडे

एका खाजगी टीव्ही वाहिनीवरील लोकप्रिय कार्यक्रमात भारतीय जनता पक्षाचे धडाडीचे झारखंडचे खासदार निशिकांत दुबे यांनी काँग्रेस नेते राहुल गांधी आणि संपूर्ण गांधी-नेहरू घराण्याची पोल खोलली. निशिकांत दुबे यांनी ऐतिहासिक संदर्भांचा आधार घेत गांधी-नेहरू घराण्याच्या आजवरच्या राजकीय प्रवासावर कडक शब्दांत प्रहार केला. त्यांच्या मते, या घराण्याच्या धोरणांनी देशाचे मोठे नुकसान केले असून, त्यांनी या घराण्याच्या राजकारणाचा खरा चेहरा जनतेसमोर आणला. त्यांनी राहुल गांधी यांची संसदेतील वागणूक ही गांभीर्याची नसून ती संसदीय लोकशाहीच्या मर्यादांचे उल्लंघन करणारी आहे, असा दावा दुबे यांनी केला. संसदेत बोलतानाचे त्यांचे हावभाव आणि अध्यक्षांच्या आसनाप्रती दाखवलेला अनादर यावर त्यांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केले. निशिकांत दुबे यांनी या कार्यक्रमाच्या माध्यमातून राहुल गांधी आणि काँग्रेसच्या धोरणांचा जो 'आरसा' जनतेसमोर धरला आहे, तो विचार करायला लावणारा आहे.

**अविनाश देशपांडे**

## गुढीपाडवा मांगल्याचा सण

गुढीपाडव्याच्या दिवशी सकाळी लवकर उठून अभ्यंगस्नान करण्याची प्रथा आहे. या दिवशी कडुनिंबाची पाने, ओवा, मीठ आणि गूळ यांचे मिश्रण प्रसाद म्हणून खाल्ले जाते, जे शरीरातील रक्त शुद्ध करण्यास आणि रोगप्रतिकारशक्ती वाढवण्यास मदत करते. घराघरांत पुरणपोळी किंवा श्रीखंड-पुरीचा बेत आखला जातो. लोक नवीन कपडे परिधान करतात आणि एकमेकांना नववर्षाच्या शुभेच्छा देतात. हा सण वसंत ऋतूच्या आगमनाचे आणि जीवनातील नवीन उमेदीचे स्वागत करणारा आहे.गुढीपाडवा हा सण भारतात उत्साहाचे वातावरण निर्माण करतो. ठिकठिकाणी निघणाऱ्या 'स्वागत यात्रा', पारंपारिक वेशभूषा, लेझीम पथके आणि ढोल-ताशांचा गजर यामुळे सामाजिक सलोखा वाढण्यास मदत होते. नवीन संकल्पांचा दिवस म्हणून संपूर्ण भारत या दिवसाकडे सकारात्मकतेने पाहतो. विविध राज्य आणि त्यांची विविध गुढीपाडवा यांची नावे भारताची विविधेत एकता दर्शविते.

**आल्हाद माळगांवकर**

## पाकिस्तानातील वाढती अराजकता

शेजारील राष्ट्र पाकिस्तानमध्ये कायम अशांतता नांदत असल्याचे दिसते. अलीकडेच घडलेल्या एका घटनेत इस्लामाबादमधील शिया पंथीयांच्या मशिदीला लक्ष्य करण्यात आले होते. त्यापूर्वी बलुचिस्तानमध्ये दहशतवादी हल्ले सुरु होते. एकूणच पाकिस्तानमधील सत्ताधारी कट्टरतावाद जोपासत आले आहेत. आज त्याचीच कटू फळे पाकिस्तानला मिळत असल्याचे दिसते. इस्लामी कट्टरतावाद पोसणारा पाकिस्तान भारतातही अनेकदा हिंसाचारास प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष प्रोत्साहन देत आला आहे. देशाची प्रगती व्हावी, असे तेथील सत्ताधारी नेत्यांना वाटत नसावे. म्हणून ते कायम कट्टरतावाद्यांना वापरत असतात. इस्लामी राष्ट्र म्हणवणाऱ्या पाकिस्तानात आता शिया, सुन्नी असा वाद भडकला आहे. त्यामुळेच मशिदीत प्रार्थना करणाऱ्या लोकांना संपवण्यात आले. पाकिस्तानमधील लष्करी अधिकारी कायम तेथील राजकारण्यांवर सत्ता गाजवत आले आहेत. अमेरिका किंवा चीन अशा बड्या राष्ट्रांकडून कायम मदत घेण्यात सार्थकता मानणाऱ्या पाकिस्तानला अजूनही अद्दल घडावयास तयार नाही. देशांतर्गत हिंसाचारास अधिक प्रोत्साहन देणाऱ्या प्रवृत्तींना पोसल्यामुळेच ही वेळ त्यांच्यावर आली आहे.

**प्रा. मधुकर चुटे**

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सखा

### बुकिंगनंतर ८ दिवसात ग्राहकाला सिलेंडर उपलब्ध करण्याचे जिल्हाधिका*यांचे निर्देश

# एलपीजी गॅस सिलेंडरची प्रतिक्षा संपणार !

**जनमाध्यम प्रतिनिधी**

यवतमाळ : मध्यपूर्व आशिया, अमेरिका व युरोपियन खंडात सध्या सुरू असलेल्या युद्ध परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर यवतमाळ जिल्ह्यातील इंधन पुरवठ्याबाबत खबरदारीचा उपाय म्हणून जिल्ह्यात कार्यरत असलेल्या भारत पेट्रोलियम (बीपीसीएल), हिंदूस्थान पेट्रोलियम (एचपीसीएल) व इंडियन ऑईल (आयओसीएल) या तीनही कंपन्यांच्या एलपीजी गॅस सिलेंडरच्या वितरकांची जिल्हाधिकारी विकास मीना यांनी मंगळवारी बैठक घेऊन आढावा घेतला. जिल्ह्यामध्ये एलपीजी गॅस सिलेंडर साठा पुरेसा उपलब्ध असून नागरिकांना बुकिंगनंतर लवकरात लवकर फर्स्ट इन फर्स्ट आऊट ऑर्डरनुसार सिलेंडर उपलब्ध होईल. तसेच गॅस एजन्सीवर गर्दी होऊ नये यासाठी टोकन सिस्टीम लागू करावी तसेच बुकिंगनंतर ८ दिवसाच्या आत ग्राहकाला सिलेंडर उपलब्ध होईल, असे नियोजन करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी विकास मीना यांनी संबंधितांना सूचना दिल्या आहेत. जिल्ह्यात पुरेसा साठा उपलब्ध असून त्याचा नियमित व सुरळीत पुरवठा करण्यात येईल. जिल्हा प्रशासन, पोलीस प्रशासन तसेच ऑईल कंपनी मिळून जिल्ह्यातील एलपीजी गॅस सिलेंडर साठा पुरेसा उपलब्ध



राहील याबाबत कटीबध्द आहे. त्यामुळे गॅस एजन्सीवर अनावश्यक गर्दी टाळावी तसेच अफवा वर विश्वासू ठेवू नये. सिलेंडरच्या वितरणात अडचणी उद्भवल्यास तात्काळ संबंधित तालुक्यातील अधिकारी यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा प्रशासनाकडून करण्यात आले आहे. त्यानुसार जिल्हा प्रशासनाने अधिकाऱ्यांचे तालुकानुहाय संपर्क क्रमांक जारी केले आहे. यवतमाळ तालुक्यासाठी मिथुन ठाकरे 9763050795 व सीमा दोंदल 8459142150, दारव्हा तालुक्यासाठी सत्यवान बांते 8806863394 व तुषार राठोड 9767254228, दिग्रस तालुक्यासाठी आतिफ हक 9604476734 व सत्यवान बांते 8806863394, वणी तालुक्यासाठी विवेक पांडे 9823449044 व विशाल कांबळे 8104968576, आर्णी तालुक्यासाठी जिवन राठोड 9096661506, बाभुळगाव तालुक्यासाठी मंगेश गाढवे 9890950991, घाटंजी तालुक्यासाठी किरण मस्के 9405163924, कळंब तालुक्यासाठी संध्या मनवर 9689722625, केळापुर तालुक्यासाठी कांचन कामडे 9765907892, महागाव तालुक्यासाठी मोहन कोल्हे 7678822670, मारेगाव तालुक्यासाठी विजय मत्ते 8605752141, नेर तालुक्यासाठी पूनम खांडेकर 9322014314, पुसद तालुक्यासाठी अमोल महाजन 9096860487, राळेगाव तालुक्यासाठी चंद्रकांत पाटील 9730632566, उमरखेड तालुक्यासाठी अमोल महाजन 9096860487, झरी जामणी तालुक्यासाठी नम्रता पारतकर 7722080847 यांना संपर्क करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. दरम्यान जिल्हाधिकारी विकास मीना यांनी एलपीजी गॅस पुरवठ्यासंदर्भात क्षेत्रीय अधिकाऱ्यांना दक्षतेच्या सूचना दिल्या आहेत. "जिल्ह्यात एलपीजी गॅस सिलेंडर तुटवड्याची कोणतीही समस्या उद्भवू नये यासाठी सर्व संबंधित यंत्रणांनी सतत दक्ष राहावे. प्रत्येक अधिकाऱ्याने आपल्या कार्यक्षेत्रात गॅस सिलेंडर पुरवठ्याच्या स्थितीवर बारकाईने आणि सातत्याने लक्ष ठेवावे. गॅस वितरकांशी नियमित समन्वय साधून मागणी व पुरवठ्याचे निरीक्षण करावे, तसेच आवश्यकतेनुसार तात्काळ दुरुस्तीात्मक उपाययोजना कराव्यात. तसेच गॅस पुरवठ्यात कोणतीही अडचण निर्माण झाल्यास किंवा नागरिकांच्या तक्रारी प्राप्त झाल्यास त्या तातडीने सोडवाव्यात", असे निर्देश जिल्हाधिकारी विकास मीना यांनी दिले आहेत.

## दिवसाढवळ्या डिक्की फोडून दीड लाखांची चोरी!

( पुसद रोडवरील एसबीआय समोरिल घटना , सीसीटीव्हीत दोन संशयित कैद ; उमरखेडमध्ये खळबळ )

उमरखेड : एसबीआय बँकेसमोर दिवसाढवळ्या स्कुटीच्या डिक्कीमधून तब्बल १ लाख ५० हजार रुपये चोरट्यांनी लंपास केल्याची धक्कादायक घटना मंगळवारी १७ मार्च, दुपारी शहरातील पुसद रोडवरील एसबीआय बँकेसमोर, उघडकीस आली असून शहरात खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, बांधकाम व्यवसायिक अनिल टाक यांनी महाराष्ट्र बँकेतून १ लाख ५० हजार रुपये काढले होते. हे पैसे स्कुटीच्या डिक्कीमध्ये ठेवून ते एसबीआय बँकेत खात्यात जमा करण्यासाठी गेले.

बँकेसमोर गाडी उभी करून ते आत काउंटरवर गेले असता, पैसे डिक्कीतच राहिल्याचे त्यांच्या लक्षात आले. तात्काळ बाहेर येऊन त्यांनी गाडी तपासली असता डिक्की उघडून अज्ञात चोरट्यांनी पैशांवर डल्ला मारल्याचे समोर आले. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली. घटनेची माहिती मिळताच अनिल टाक यांनी पोलीस स्टेशन गाठून तक्रार दिली. पोलिसांनी घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन तत्काळ तपास सुरू केला आहे. परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासले असता दोन संशयित व्यक्ती चोरी करताना दिसून आल्या असून त्यांचे चित्रफीत पोलिसांच्या हाती लागले आहे. वृत्त लिहीपर्यंत या प्रकरणी गुन्हा नोंदविण्याची प्रक्रिया सुरू होती. पुढील तपास उमरखेड पोलीस करत आहेत.

### साहेबराव करपे स्मृतिदिनानिमित्त यवतमाळात अन्नत्याग आंदोलनं

# "वेदनांची ज्वाला अजूनही धगधगते"

जनमाध्यम प्रतिनिधी



यवतमाळ : देशातील सरकारी दप्तरी नोंद झालेल्या पहिल्या शेतकरी आत्महत्येचे प्रतीक ठरलेले स्व. साहेबराव पाटील करपे (रा. चिलगव्हाण, ता. महागाव) यांच्या स्मृतिदिनानिमित्त १९ मार्च रोजी यवतमाळ येथे 'शेतकरी स्मृतीदिन' पाळण्यात येणार असून, यानिमित्ताने सामूहिक अन्नत्याग आंदोलनाचे आयोजन करण्यात आले आहे. गुरुवार, १९ मार्च रोजी सकाळी ११ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत येथील आझाद मैदानावर हे आंदोलन होणार आहे. शेतकऱ्यांच्या वाढत्या आत्महत्या, आर्थिक अडचणी, पिकांना न मिळणारा योग्य भाव आणि शासनाच्या उदासीन धोरणांविरोधात संताप व्यक्त करण्यासाठी हा उपक्रम राबविण्यात येत आहे. यवतमाळ जिल्हा युवक काँग्रेस व शेतकरी चळवळ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या आंदोलनातून शासनाने शेतकरी प्रश्नांकडे संवेदनशीलतेने पाहावे, तसेच ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणी करण्यात येणार आहे. केवळ घोषणां पुरते न राहता प्रत्यक्षात मदत पोहोचविण्याची वेळ आता आली असल्याची ठाम भूमिका आयोजकांनी मांडली आहे. जिल्हाध्यक्ष प्रमोद बगाडे, कृष्णा पुसनाके, कॉम्रेड सचिन मनवर, प्रा. पंढरी पाठे, अब्दुल भाई घोडेवाले आदींसह विविध कार्यकर्त्यांनी नागरिकांना मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन केले आहे. स्व. करपे यांच्या स्मृतीला अभिवादन करताना, शेतकऱ्यांच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नांवर शासनाने तातडीने निर्णय घ्यावा, अन्यथा अशा आंदोलनांची तीव्रता वाढेल, असा इशाराही आयोजकांनी दिला आहे.


## • वेचक

### महागाव तहसील कार्यालयात जागतिक ग्राहक दिन साजरा



महागाव : येथील तहसील कार्यालय, महागाव येथे जागतिक ग्राहक दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे आयोजन ग्राहक संरक्षण व जनजागृतीच्या उद्देशाने करण्यात आले होते. या कार्यक्रमाला नायब तहसीलदार रोहित शिंदे, पवार साहेब, पराते साहेब, मोहन कोल्हे निरीक्षण अधिकारी,तसेच प्रमुख अतिथी म्हणून सौ. सुनिता विभुते मॅडम,पत्रकार रवी वाघमारे, व विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. यावेळी ग्राहक हक्क, कर्तव्ये तसेच फसवणूक टाळण्यासाठी आवश्यक उपाययोजना याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. ग्राहकांनी वस्तू खरेदी करताना बिल घेणे, दर्जेदार वस्तूंची निवड करणे आणि कोणतीही तक्रार असल्यास संबंधित विभागाकडे नोंद करणे आवश्यक असल्याचे सांगण्यात आले. यावेळी जागरूक ग्राहक ही काळाची गरज आहे. आधुनिक बाजारपेठेत ग्राहकांची फसवणूक होण्याचे प्रमाण वाढले आहे. ग्राहक हा अर्थव्यवस्थेचा केंद्रबिंदू असला तरी निकृष्ट दर्जाच्या वस्तू, दिशाभूल करणाऱ्या जाहिराती, लपविलेले नियम, ऑनलाइन व्यवहारातील फसवणूक यामुळे ग्राहकांना आपल्या हक्काबद्दल जागरूक राहणे अनिवार्य झाले आहे. फसवणुकीपासून संरक्षण ग्राहक हक्काची माहिती ऑनलाइन व्यवहारातील धोके कायदेशीर संरक्षण करणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन सौ. सुनिता विभुते मॅडम यांनी केले आहे. कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थितांनी ग्राहक हक्कांचे संरक्षण करण्याची शपथ घेतली. या उपक्रमामुळे नागरिकांमध्ये ग्राहक हक्कांविषयी जागरूकता वाढण्यास मदत होईल असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

### यवतमाळात 20-21 मार्चला 'समता महोत्सव'..!



यवतमाळ : महाड येथील ऐतिहासिक चवदार तळे सत्याग्रहाच्या 99 व्या वर्षानिमित्त यवतमाळ येथे 20 व 21 मार्च रोजी 'समता महोत्सव'चे भव्य आयोजन करण्यात आले आहे. शहरातील छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्याजवळील शिवतीर्थ येथे हा दोन दिवसीय महोत्सव पार पडणार असून सामाजिक समतेचा संदेश देणारे विविध कार्यक्रम यावेळी आयोजित करण्यात आले आहेत. महोत्सवाच्या अध्यक्षस्थानी फुले-शाहू-आंबेडकरी विचारवंत डॉ. लीला भेले राहणार आहेत, तर महाड आंदोलनात दीर्घकाळ सक्रिय असलेल्या ज्येष्ठ कार्यकर्त्या प्रमिला संपत या प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित राहतील. जिल्ह्यातील सामाजिक कार्यकर्ते, लोकप्रतिनिधी व प्रशासकीय अधिकारी मोठ्या संख्येने सहभागी होणार आहेत. यावेळी सामाजिक न्याय विभागाच्या विविध योजनांची माहिती नागरिकांना देण्यात येणार असून विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक मार्गदर्शनही होणार आहे. उद्घाटनानंतर आंबेडकरी रॅपर विपिन तातड यांचा विशेष 'रॅप शो' हे आकर्षण ठरणार आहे.तसेच 'अरहंत अंगुलीमाल' व 'मी रमाई बोलते' या एकपात्री नाटकांसह गीतगायनाचे कार्यक्रम सादर होणार आहेत. समता पर्व प्रतिष्ठान व सामाजिक न्याय विभागाच्या संयुक्त विद्यमाने होत असलेल्या या महोत्सवाला नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन अध्यक्ष नारायण थूल यांनी केले आहे.

## मतदारांनी SIR-२००२ मधील पुनरिक्षणाच्या अंतिम यादीतील मॅपिंग करण्यासाठी माहिती गोळा करावी

**जनमाध्यम प्रतिनिधी**

पुसद : ८१- पुसद विधानसभा मतदार संघातील मतदारांना आवाहन करण्यात येते की, मा भारत निवडणूक आयोग याच्या निर्देशानुसार महाराष्ट्र राज्यात आगामी विशेष सखोल पुनरिक्षणाच्या अनुषंगाने सद्याच्या मतदार यादीतील मतदारांचे यापूर्वी झालेल्या SIR-२००२ विशेष संक्षिप्त पुनरिक्षणाच्या अंतिम यादीतील मतदारांशी Mapping करण्याची कार्यवाही मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (BLO) यांच्या मार्फत सुरू आहे. करीता ८१ - पुसद विधानसभा मतदार संघातील २००२ नंतर लग्न करून आलेल्या महिला मतदार यांचे Mapping करणे कामी त्यांचे कुटूंबांतील आई-वडील, आजी आजोबा यांचे मतदार संघाचे नाव क्रमांक, मतदार बादीचा भाग क्रमांक, मतदार यादीतील अनुक्रमांक, अशी माहिती स्वतः आपण जागरूक मतदार म्हणून गोळा करून घ्यावी तसेच मतदार इतर तालुका इतर जिल्हा व



इतर राज्यातुन स्थलातरण होवुन आलेले मतदारांनी त्याचे सन SIR- २००२ च्या मतदार यादीतील असलेले विधानसभा मतदारसंघ क्रमांक यादी भाग क्रमांक / यादीतील अनु. क्रमांक आणून आपल्या कार्यक्षेत्रातील संबंधीत (BLO) मतदान केंद्रस्तरीय अधिकारी यांचे कडे देण्यात यावे ज्या मतदाराचे सन-2002 च्या मतदार यादीमध्ये नाव नाहीत. त्यांनी सन 2002 चे मतदार यादीमधून आई-वडाल, आजी-आजोबा याचे नावे शोधून सदर मतदार यादीमधील मतदार संघाचा नाव/यादी भाग क्रमांक । अनुक्रमांक बाबतचा तपशिल आपल्या कार्यक्षेत्रातील संबधीत (BLO) मतदान केंद्रस्तरीय अधिकारी वाचे कडे देण्यात यावे. स्वतःचे किंवा Aआई वडील किंवा आजी आजोबा यांचे नाव आपणास शोधण्यासाठी मा. निवडणूक आयोगाने सन २००२ ची यादी खालील लिंक वर उपलब्ध करून दिलेली आहे. सर्व मतदार यांनी खालील लिंक चा वापर करून आपले नावे शोधून (BLO) मतदान केंद्रस्तरीय अधिकारी यांचे कडे द्यावे.

## जगदंबा अभियांत्रिकी महाविद्यालयात रक्तदान शिबिर संपन्न

**जनमाध्यम प्रतिनिधी**

यवतमाळ : स्थानिक जगदंबा अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना (रा.से.यो.) पथकातर्फे आयोजित रक्तदान शिबिरास विद्यार्थ्यांचा व प्राध्यापकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रा.से.यो. पथक यांच्या संयुक्त विद्यमाने हे शिबिर पार पडले. कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी संस्थेचे सचिव डॉ. शितल वातीले, रक्त संकलन अधिकारी डॉ. ऋषीकेश जिरापुरे, समाजसेवा अधीक्षक आशीष दहापुते, विभागप्रमुख डॉ. विजय नेवे, डॉ. पराग ठाकरे, प्रा. धनश्री पोहरे, रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी प्रा. प्रविण वानखडे, सहकार्यक्रम अधिकारी डॉ. सुमित



राऊत यांच्यासह प्राध्यापक व कर्मचारी उपस्थित होते. डॉ. ऋषीकेश जिरापुरे यांनी रक्तदानाचे महत्त्व स्पष्ट करत उन्हाळ्यात रक्तसाठ्याची कमतरता भासते, त्यामुळे अधिकाधिक विद्यार्थ्यांनी रक्तदान करावे, असे आवाहन केले. डॉ. शितल वातीले यांनी रक्ताला पर्याय नसून रक्तदान हाच जीवन वाचविण्याचा सर्वोत्तम मार्ग असल्याचे सांगितले. डॉ. पराग ठाकरे यांनी "सर्वश्रेष्ठ दान म्हणजे रक्तदान" असे प्रतिपादन केले. या शिबिरात सुमारे ५८ विद्यार्थी व प्राध्यापकांनी रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जपली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन स्वयंसेविका तन्वी पडोळे हिने केले. शिबिराच्या यशस्वीतेसाठी प्रणव धाये व रा.से.यो. स्वयंसेवकांनी परिश्रम घेतले.

## बोलेरो कॅम्पर व दुचाकीच्या अपघातात दोन युवकाचा मृत्यू

घाटंजी : मानोली- घाटंजी राज्य मार्गावर पुन्हा एकदा बेफाम वेग आणि निष्काळजीपणाने दोन निष्पाप तरुणांचा जीव घेतला आहे. दि. १८ मार्च रोजी सायंकाळच्या सुमारास बोलेरो कॅम्पर आणि दुचाकी यांच्यात झालेल्या समोरासमोर भीषण धडकेत दोन युवकांचा दुर्दैवी मृत्यू झाला. या घटनेने परिसरात संतापाची लाट उसळली आहे. प्राप्त माहितीनुसार, घाटंजी ते मानोली मार्गावरील धोकादायक वळणावर हा भीषण अपघात घडला. बोलेरो कॅम्पर क्र. एम.एच २९ सीएम ०२७१ शिरोली वरून येत असताना, घाटंजी वरून जाणारी पल्सर दुचाकी क्र. एम.एच २९ सी.डी १७८८ यांच्यात जोरदार धडक झाली. या धडकेची तीव्रता इतकी भीषण होती की दुचाकीस्वार गजानन आडे वय २६, रा. आकपुरी व प्रज्वल चतारे वय २०, रा. आकपुरी हे दोघेही गंभीर जखमी झाले. घटनेची माहिती मिळताच स्थानिक प्रवासी व सामाजिक कार्यकर्ते मुज्जु पटेल व त्यांच्या सहकाऱ्यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी त्वरित घाटंजी पोलिसांना पाचारण करत मदतकार्य सुरू केले. पोलिसांनीही विलंब न लावता जखमींना घाटंजी ग्रामीण रुग्णालयात हलविले. मात्र, जखमांची तीव्रता पाहता दोघांनाही पुढील उपचारासाठी यवतमाळ येथे पाठविण्यात आले. दुर्दैवाने, गजानन आडे यांचा उपचारासाठी नेत असतानाच वाटेत मृत्यू झाला. तर प्रज्वल चतारे याला पुढील उपचारासाठी नागपूर येथे हलविण्यात आले. मात्र त्यानेही मृत्यूशी झुंज देताना अखेर प्राण सोडले. या हृदयद्रावक घटनेमुळे संपूर्ण परिसरात हळहळ व्यक्त होत असून, नागरिकांकडून प्रशासनाच्या ढिसाळ वाहतूक नियंत्रणावर तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. वारंवार अपघात होणाऱ्या या धोकादायक वळणावर तात्काळ उपाययोजना करण्याची जोरदार मागणी होत आहे.

## गॅस टंचाईच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाचा धडाका..!

**जिल्ह्यात 73 अवैंध सिलेंडर जप्त**

यवतमाळ – आखाती देशांमध्ये सुरू असलेल्या युद्धजन्य परिस्थितीचे पडसाद आता देशांतर्गत इंधन पुरवठ्यावर उमटू लागले असून यवतमाळ जिल्ह्यात घरगुती गॅस सिलेंडरचा तुटवडा जाणवू लागला आहे. या पार्श्वभूमीवर काही ठिकाणी घरगुती सिलेंडरचा अवैधरित्या व्यावसायिक वापर वाढल्याचे निदर्शनास आले असून प्रशासनाने यावर कडक कारवाईचा बडगा उगारला आहे. जिल्हाभर राबविण्यात आलेल्या धाडसत्रात एकूण ७३ घरगुती गॅस सिलेंडर जप्त करण्यात आले आहेत. पुरवठा विभागाच्या मार्गदर्शनाखाली तहसील स्तरावर गोपनीय पथके स्थापन करून शहरी तसेच ग्रामीण भागात एकाचवेळी छापेमारी करण्यात आली. दारव्हा तालुक्यात १२ सिलेंडर जप्त करण्यात आले, तर पुसद येथे ४० आणि यवतमाळ शहर व उमरसरा परिसरात २१ सिलेंडर जप्त करण्यात आले. या कारवाईत नायब तहसीलदार, ग्राम महसूल अधिकारी, कोतवाल व पुरवठा विभागातील कर्मचाऱ्यांचा सहभाग होता. अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाच्या सूचनांनुसार घरगुती गॅसचा अवैध वापर रोखण्यासाठी अशा धाडी अधिक तीव्र करण्यात येणार असल्याचे पुरवठा अधिकारी संघपाल मेश्राम यांनी स्पष्ट केले. "इंधन तुटवड्याच्या पार्श्वभूमीवर घरगुती गॅसचा सुरळीत पुरवठा राखणे अत्यावश्यक आहे. त्यामुळे अवैध साठा व वापर सहन केला जाणार नाही," असा इशाराही त्यांनी दिला.दरम्यान, नागरिकांनी घाबरून जाऊन अनावश्यक साठा करू नये, ऑनलाईन बुकिंगनंतर आठ दिवसांत सिलेंडर उपलब्ध होत असल्याने संयम बाळगावा, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

### जिल्हाधिकाऱ्यांनी मदतीचा हात द्यावा
### जगदीश नरवाडे यांची आर्त हाक

## गॅस टंचाईचा लहान व्यावसायिकांना मोठा फटका

महागाव : सध्याच्या जागतिक युद्धजन्य परिस्थितीमुळे निर्माण झालेल्या गॅस टंचाईचे सावट आता स्थानिक बाजारपेठेवर दिसू लागले आहे. याचा सर्वाधिक फटका जिल्ह्यातील लहान हॉटेल व्यावसायिक, खानावळ चालक आणि नाश्ता विक्रेत्यांना बसत आहे. या गंभीर प्रश्नाकडे लक्ष वेधत, 'जन आंदोलन आधार संघर्ष समिती'चे संस्थापक अध्यक्ष जगदीश नरवाडे यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे या व्यावसायिकांना विशेष सवलत व सुरळीत गॅस पुरवठा करण्याची मागणी केली आहे. फुटपाथवर किंवा छोट्या गाळ्यांमध्ये अल्प दरात सर्वसामान्यांना भोजन आणि नाश्ता उपलब्ध करून देणारे व्यावसायिक सध्या मोठ्या संकटात आहेत. गॅस सिलिंडर वेळेवर उपलब्ध होत नसल्याने अनेकांचे व्यवसाय ठप्प होण्याच्या मार्गावर आहेत. हे व्यावसायिक केवळ स्वतःच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करत नाहीत, तर मजूर आणि रोजंदारीवर काम करणाऱ्या हजारो नागरिकांना परवडणाऱ्या दरात अन्न पुरवण्याचे महत्त्वाचे काम करतात. जगदीश नरवाडे यांनी जिल्हाधिकाऱ्यांना सादर केलेल्या निवेदनात स्पष्ट केले की, हे छोटे व्यावसायिक अत्यंत कष्टाने आपला प्रपंच चालवत आहेत. अशा कठीण काळात प्रशासनाने त्यांच्यावर कोणतीही दंडात्मक कारवाई न करता, त्यांना 'विशेष बाब' म्हणून प्राधान्याने गॅस पुरवठा करावा.गॅस टंचाईमुळे निर्माण झालेल्या या संकटामुळे सामान्य नागरिकांमध्येही चिंतेचे वातावरण आहे. जर हे छोटे व्यवसाय बंद पडले, तर रोज बाहेर जेवण करणाऱ्या कामगार वर्गाचे हाल होतील.हे टाळण्यासाठी प्रशासनाने लहान खाद्य व्यावसायिकांना प्राधान्याने गॅस सिलिंडर उपलब्ध करून द्यावेत. टंचाईच्या काळात व्यावसायिकांवर होणारी जाचक दंडात्मक कारवाई थांबवावी.गॅस पुरवठा साखळीतील अडथळे दूर करून वितरण व्यवस्था सुरळीत करावी. अशी मागणी जगदीश नरवाडे यांनी केली आहे.

## नगरपरिषदेत कंत्राटी कामगारांवर अन्याय..
### आंदोलन तीव्र होण्याचा इशारा

**यवतमाळ** : नगरपरिषद यवतमाळ येथे कंत्राटी कामगारांवर अन्याय होत असल्याचा आरोप करत कामगार संघटनेने आंदोलन छेडले आहे. आरोग्य विभागातील सफाई, कचरा संकलन व इतर कामे करणाऱ्या कामगारांना केवळ ७ ते ८ हजार रुपये मानधन दिले जात असल्याचे सांगितले जाते, तर किमान वेतनानुसार बिल काढले जात असल्याने कोट्यवधींचा भ्रष्टाचार होत असल्याचा आरोप आहे. अधिकारी व कंत्राटदार संगनमताने हा प्रकार सुरू असल्याचा दावा करण्यात आला. ११ मार्चपासून सुरू आंदोलनाकडे प्रशासनाने दुर्लक्ष केल्याचा आरोप असून, २० मार्चपर्यंत मागण्या मान्य न झाल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा कार्याध्यक्ष संजय मिश्रा यांनी दिला आहे.

# माकड पकडतांना वनविभागाचा निशाणा चुकला ..

### नागरिकाला बेशुद्धीचे इंजेक्शन

यवतमाळ — उष्णतेच्या तीव्र लाटेमुळे जंगलातील प्राणी नागरी वस्तीकडे वळत असल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. उमरखेड तालुक्यातील भवानी येथे पिसाळलेल्या माकडाचा बंदोबस्त करताना वनविभागाच्या पथकाकडून मोठी चूक घडल्याची घटना समोर आली आहे.गेल्या काही दिवसांपासून गावात एका माकडाने उच्छाद मांडल्याने नागरिक त्रस्त झाले होते. या पार्श्वभूमीवर वनविभागाच्या रेस्क्यू पथकाला पाचारण करण्यात आले. माकडाला बेशुद्ध करण्यासाठी डार्ट गनद्वारे इंजेक्शन डागण्यात आले. मात्र, माकडाच्या अचानक हालचालीमुळे



निशाणा चुकून डार्ट गर्दीत उभ्या असलेल्या सदानंद खराटे (वय 45, रा. डोंगरगाव) यांच्या पायाला लागला. घटनेनंतर परिसरात एकच गोंधळ उडाला.

नागरिकांनी वनविभागाच्या कर्मचाऱ्यांवर संताप व्यक्त करत काही काळ तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले. जखमी खराटे यांना तातडीने कोरटा येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल करण्यात आले असून त्यांची प्रकृती स्थिर असल्याची माहिती वैद्यकीय सूत्रांनी दिली. दरम्यान, अशा रेस्क्यू मोहिमेदरम्यान नागरिकांची अनियंत्रित गर्दी होणे ही मोठी अडचण ठरत असल्याचे वनविभागाकडून सांगण्यात आले. गर्दीमुळे अचूक कारवाई करण्यात अडथळे निर्माण होतात, असेही स्पष्ट करण्यात आले. या घटनेमुळे वनविभागाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत असून, भविष्यात अशा मोहिमांदरम्यान अधिक खबरदारी घेण्याची गरज व्यक्त केली जात आहे.

## सामाजिक आपुलकी जोपासून समाजात सलोखा राखा

बाभुळगाव - समाजात सलोखा कायम राहण्याकरिता समाजात कुठेही अनुसूचित प्रकार घडू नये याची दक्षता सर्वांनी घ्यावी. छोटीशी ठिणगी ही मोठी होऊ शकते त्यासाठी छोटी मोठया घटना घडल्यास तात्काळ पोलीस स्टेशन व तहसीलदार यांच्याशी संपर्क करा व समाजात कुठेही तेढ निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी असे आवाहन तहसीलदार मीरा पागोरे यांनी केले.

ईद-ए-मिलाद व गुडीपाडवाच्या संबंधाने येथील पोलिस स्टेशनच्या प्रांगणात दि17 रोजी आयोजित तालुका शांतता समितीच्या सभेत ते अध्यक्षपदावरून बोलत होत्या . यावेळी मंचकावर येथील पोलिस निरीक्षक दिपमाला भेंडे ह्या प्रामुख्याने उपस्थित होत्या. सामाजिक शांतता बिघडणार नाही, दोन समाजात तेढ निर्माण होणार नाही असा चुकीचा मेसेज फॉरवर्ड करण्यापूर्वी त्याची सत्यता पडताळून घ्यावी.त्यामुळे समाजात समाजात तेड निर्माण होणार नाही .कायदा हातात न घेता शांतता समितीचे सदस्य व पोलिस पाटील यांनी तत्काळ पोलिस स्टेशनला माहिती द्यावी असे आवाहनही येथील पोलिस निरीक्षक दीपमाला भेंडे यांनी केले. या सभेला जामा मस्जिद ट्रस्टचे अध्यक्ष अरिफ अली, नगर सेवक कादर भाई, शहेजाद शेख, मिलींद नवाडे, पोलीस पाटील संघटनेचे तालुका अध्यक्ष मुकुंद काशेट्टीवार ,राजू नवाडे, तालुक्यातील पोलीस पाटील व तसेच शांतता कमिटीचे सदस्य उपस्थित होते.

# कापूस खरेदी बंद झाल्याने ४० हजार शेतकरी संकटात

## कापूस खरेदीसाठी आवश्यक केंद्रे उपलब्ध करा- आ.सुलभा खोडके

**अमरावती/का.प्र.**
केंद्र शासनाच्या सीसीआय केंद्रामार्फत राज्यात कापूस खरेदी जाहीर करण्यात आली. राज्यशासनाच्या संबंधित यंत्रणांमधील अडथळ्यामुळे अजूनही हजारो शेतकऱ्यांच्या कापूस मालाची खरेदी होण्यास मोठा विलंब लागत आहे. दरम्यान कापूस खरेदीला १५ दिवसाची मुदतवाढ दिल्यानंतर आता मुदत संपल्यावरही स्लॉट बुकिंग सुरु न करता सीसीआय केंद्रामार्फत कापूस खरेदी थांबविण्यात आली आहे. राज्यातील कापूस उत्पादक शेतकऱ्यांना याचा प्रचंड प्रमाणात फटका बसत असून त्यांना खाजगी व्यापाऱ्याकडे पडक्या दरात कापूस विकावा लागत असल्याने त्यांची मोठी आर्थिक लूट होत आहे. कापूस खरेदी केंद्र बंद झाल्याने अमरावती विभागात जवळपास ४० हजार शेतकरी संकटात अडकले आहेत. या गंभीर प्रकरणाची शासनाने दखल घेऊन सीसीआय मार्फत शासकीय कापूस खरेदीस ३० एप्रिल २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्याची मागणी अमरावतीच्या आ.सुलभा खोडके यांनी राज्याविधिमंडळात औचित्याच्या मुद्याद्वारे केली आहे.

अमरावती मध्ये कापूस उत्पादन मोठ्या प्रमाणात होत असले तरी कापूस उत्पादक शेतकऱ्यांच्या मालाला योग्य बाजारपेठ मिळत नसल्याने ते आर्थिक विवंचनेत अडकले आहे. केंद्रशासनाने सीसीआय मार्फत कापूस खरेदी जाहीर केली. राज्यशासनाच्या वतीने कापूस खरेदीला सुरुवात झाली



आहे.त्यामुळे शेतकऱ्यांनी आपला कापूस माल बाजारात आणण्यास सुरुवात केली. मात्र सीसीआय केंद्र कमी असणे, तसेच नोंदणी प्रक्रिया, खरेदी केंद्रावरील विलंब, मनुष्यबळाचा अभाव, साठवणुकीसाठी गोदामांची व्यवस्था नसणे अशा कारणांनी शेतकऱ्यांच्या कापूस खरेदी करण्यास विलंब झाला आहे. सुरुवातीला सीसीआय मार्फत कापूस खरेदीची मुदत २७ फेब्रुवारी पर्यंत देण्यात आली होती.१५ मार्च पर्यंत दिलेली मुदतवाढ संपूनही स्लॉट बुकिंग सुरु न करता आता शासनाने कापूस खरेदी बंद केल्याने अमरावती विभागात जवळपास ४० हजार शेतकऱ्यांचा कापूसमाल त्यांच्या घरात पडून असल्याने आर्थिक नुकसान होत असल्याची बाब सुद्धा आ.खोडके यांनी औचित्याच्या मुद्याद्वारे शासनाच्या निदर्शनास आणून दिली. तसेच कापूस उत्पादक शेतकऱ्यांकडे साठवणुकीसाठी गोदामे नसल्याने, घरातील ओलावा व संभाव्य पावसामुळे सुद्धा कापूस माल खराब होण्याच्या भीतीपोटी शेतकऱ्यांना नाईलाजास्तव आपला माल खाजगी व्यापाऱ्याला पडक्या दरात विकावा लागत आहे. शेतकऱ्यांना हमीभावापेक्षा ५०० ते ७०० रुपये कमी दराने कापूस विकावा लागत असल्याने खाजगी व्यापाऱ्यांकडून त्यांची आर्थिक लूट होतांना दिसत आहे. या कारणास्तव कापूस उत्पादक शेतकरी संकटात अडकला असून त्यांच्यावर अत्यंत हलाखीची व उपासमारीची वेळ आली आहे.शासनाने गांभीर्याने विचार करून कापूस खरेदीसाठी आवश्यक केंद्रे व इतर पायाभूत व्यवस्था तातडीने उपलब्ध करून देण्याची नितांत गरज आहे. त्यासाठी सीसीआय मार्फत शासकीय कापूस खरेदीस ३० एप्रिल २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्याची मागणी अमरावतीच्या आ.सुलभा खोडके यांनी विधानसभेत औचित्याच्या मुद्याद्वारे केली आहे.

## महावितरणची धडक कारवाई

# २७ हजार थकबाकीदारांचा वीजपुरवठा खंडित

**अमरावती/वार्ताहर**
वीजबिलाची थकबाकी शून्य करण्यासाठी सुरू करण्यात आलेल्या वसूली मोहिमेला महावितरणने अधिक गती दिली असून, प्रतिसाद न देणाऱ्या तब्बल २७ हजार थकबाकीदार ग्राहकांचा वीजपुरवठा खंडित करण्यात आला आहे. त्यामुळे ग्राहकांनी तात्काळ थकबाकीसह चालू बिल भरून सहकार्य करावे, अन्यथा वीजपुरवठा खंडित करण्याची कारवाई टाळता येणार नाही, असे आवाहन मुख्य अभियंता अशोक साळुंके यांनी केले आहे. अमरावती परिमंडळात घरगुती, व्यावसायिक, औद्योगिक व इतर लघुदाब वर्गवारीतील एकूण ३ लाख १७ हजार ९२१ ग्राहकांकडे तब्बल ७१४ कोटी ५ लाख रुपयांची थकबाकी आहे. यामध्ये अमरावती जिल्ह्यातील १ लाख ५२ हजार ११५ ग्राहकांकडे २६६ कोटी ७९ लाख, तर यवतमाळ जिल्ह्यातील १ लाख ६५ हजार ८०६ ग्राहकांकडे ४४७ कोटी २६ लाख रुपये थकीत आहेत. मुख्य अभियंता अशोक साळुंके यांच्या मार्गदर्शनाखाली अधीक्षक अभियंते, कार्यकारी अभियंते, उपविभागीय व शाखा अभियंते तसेच तांत्रिक कर्मचारी प्रत्यक्ष ग्राहकांशी संपर्क साधून वसूलीसाठी प्रयत्न करत आहेत. महावितरणच्या धडक कारवाईत ३४ कोटी ४९ लाख रुपयांच्या थकबाकीसाठी २६



हजार ९९१ ग्राहकांचा वीज पुरवठा खंडित करण्यात आला आहे. यामध्ये अमरावती जिल्ह्यातील १० हजार ३५० ग्राहकांकडे ११ कोटी ७१ लाख, तर यवतमाळ जिल्ह्यातील १६ हजार ६४१ ग्राहकांकडे २३ कोटी ७८ लाख रुपये थकीत आहेत.आर्थिक वर्ष संपण्यास अवघे काही दिवस उरले असल्याने प्रतिसाद न देणाऱ्या भागात सामूहिक कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. आवश्यकतेनुसार पोलिसांची मदतही घेतली जाणार आहे. कारवाईदरम्यान थकबाकीदारांचे मीटर काढण्यात येत असून, मीटर काढल्यानंतर अनधिकृत वीज वापर आढळल्यास संबंधितांवर कायदेशीर गुन्हे दाखल करण्यात येणार आहेत.ग्राहकांच्या सोयीसाठी सुट्टीच्या दिवशीही वसूली मोहीम सुरू ठेवण्यात आली आहे. तसेच महावितरणची बिल भरणा केंद्रे आणि ऑनलाईन भरणा सुविधा उपलब्ध ठेवण्यात आली आहे.

## संक्षिप्त

### कौशल्य विकास केंद्राचा रोजगार मेळावा

**अमरावती-** जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्रामार्फत युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी 'पंडित दिनदयाल उपाध्याय रोजगार मेळाव्या'चे आयोजन सोमवार २३ मार्च २०२६ रोजी सिपना महाविद्यालय, चिखलदरा, ता. चिखलदरा जि. अमरावती येथे करण्यात आले आहे. मेळाव्यामध्ये सहभागी होण्यासाठी mahaswayam.gov.in या वेबसाईटवर जाऊन ऑनलाईन नोंदणी करावी. यात ऑनलाईन सहभाग नोंदवून आपली रजिट्रेशनची प्रत काढून मेळाव्याच्या दिनांकास उपस्थित राहावे. याबाबत अडचणी असल्यास जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, दुरध्वनी क्रमांक ०७२१-२५६६०६६/८९८३२८८९८२/८६०५६५४०२५ किंवा amravatirojgar@gmail.com या मेलवर संपर्क साधावा. मेळाव्यासाठी बायोडाटा, पासपोर्ट साईज फोटो आणि आवश्यक कागदपत्रांसह प्रत्यक्ष उपस्थित रहावे. या मेळाव्यात ३६५ पेक्षा अधिक रिक्त पदांची भरती करण्यात येणार असल्याचे जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राच्या सहायक आयुक्त प्रांजली बारस्कर यांनी कळविले आहे.

### सम्राट अशोक जीवन चरित्र परीक्षेला उत्स्फूर्त प्रतिसाद

**अमरावती-**संडे मिशन विहार आणि बुध्द जयंती उत्सव समिती, अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने सम्राट अशोक जयंतीचे औचित्य साधून महाराष्ट्रात पहिल्यांदाच अमरावती जिल्ह्यात सम्राट अशोक यांच्या जीवनावर आधारित वस्तुनिष्ठ परीक्षा घेण्यात आली.या परीक्षेचे आयोजन सिध्दार्थ बुध्द विहार, फ्रेजरपुरा; लुंबिनी बुध्द विहार तपोवन व करुणा बुध्द विहार माहुली जहांगीर येथे करण्यात आले होते. अ गटातून ४९ आणि ब गटातून ९२ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली, त्यात १० वर्षाच्या मुलापासून ते ८० वर्षाच्या वृद्धांपर्यंत परीक्षार्थी होते.परीक्षेचे संयोजक, नियंत्रक प्रा. डॉ. कमलाकर गोवर्धन व आयोजक अवधूतराव मकेश्वर हे होते. परीक्षेच्या यशस्वितेसाठी संडे मिशनचे अशोक मेश्राम, बुध्द जयंती उत्सव समितीचे सुनील रामटेके तसेच सुधाकर बेलसरे, अशोकराव गडलिंग, दिलीप मसाने, प्रा. एस. कुमार मेश्राम, नंदकुमार घोडेस्वार, नाट्यकर्मी रत्नाकर सिरसाट, निरंजन शेंडे, सुरेश मोहोड, राहुल गजभिये, सुकुमार खंडारे, भंते सिलवंसालंकार, पूजा वानखडे, अजय रामटेके, सीमाताई कांबळे, अनिता मेश्राम, मीना डोंगरे, आर्या केसकुंडलिका यांनी अथक परिश्रम घेतले. शेवटी परीक्षा नियंत्रक प्रा. डॉ. कमलाकर गोवर्धन व अवधूतराव मकेश्वर यांनी परीक्षेला बसलेल्या सर्वांचे आभार मानले.

### 'मिशन लक्षवेध' अंतर्गत निवड चाचणी

**अमरावती-**ऑलिम्पिक स्तरावरील खेळांमध्ये महाराष्ट्राचे स्थान निर्माण करण्यासाठी राज्य शासनाच्या वतीने 'मिशन लक्षवेध' योजना राबवण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत अमरावती जिल्ह्यातील उदयोन्मुख खेळाडूंना प्रगत प्रशिक्षण देण्याच्या उद्देशाने 'जिल्हा क्रीडा प्रतिभा विकास केंद्रा'साठी कुस्ती, मैदानी (ॲथलेटिक्स) आणि शूटिंग या तीन क्रीडा प्रकारांमध्ये खेळाडूंची निवड चाचणी आयोजित करण्यात आली आहे. या चाचणीद्वारे प्रत्येक खेळातून २० अशा एकूण ६० खेळाडूंची निवड केली जाणार असून, निवड झालेल्या खेळाडूंचा सराव, आहार, गणवेश, क्रीडा साहित्य आणि स्पर्धांचा प्रवास खर्च शासन उचलणार आहे.

`या निवड प्रक्रियेसाठी ३१ डिसेंबर २०२६ रोजी २१ वर्षांखालील वय असलेले आणि गेल्या दोन वर्षात किमान राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेत सहभाग किंवा पदक मिळवलेले खेळाडू पात्र असतील.

इच्छुक खेळाडूंनी आपले अर्ज जन्म दाखला, शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र, वैद्यकीय फिटनेस प्रमाणपत्र, अधिवास प्रमाणपत्र, आधार कार्ड, क्रीडा कामगिरीची प्रमाणपत्रे, बोनाफाईड आणि पालकांचे संमतीपत्र यांसह ३० मार्च २०२६ पर्यंत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, तपोवन चौक, अमरावती येथे कार्यालयीन वेळेत सादर करणे आवश्यक आहे. निवड चाचणीचे वेळापत्रक पुढीलप्रमाणे निश्चित करण्यात आले आहे: दि. ८ एप्रिल रोजी संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ येथे मैदानी खेळांची चाचणी होईल, ९ एप्रिल रोजी जिल्हा क्रीडा संकुल, तपोवन चौक येथे कुस्तीची चाचणी, तर दि. १० एप्रिल रोजी विभागीय क्रीडा संकुल, मोर्शी रोड येथे शूटिंगची चाचणी पार पडेल. सर्व चाचण्या सकाळी ८ वाजता सुरू होतील. या प्रक्रियेसाठी श्रीमती ममता कोळमकर (९८२३७०४३४७) यांची निवड चाचणी समिती प्रमुख म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. जिल्ह्यातील जास्तीत जास्त पात्र खेळाडूंनी या संधीचा लाभ घेऊन आपले अर्ज वेळेत सादर करावेत, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी यांनी केले आहे.

# गोडंबी प्रक्रिया उद्योग संशोधन प्रकलपाची राज्यस्तरावर दखल

## प्रा.प्रमोद पंडीत यांचा प्रकल्प टॉप १० मध्ये

**अमरावती/का.प्र.**
उच्च शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांच्या संशोधनाला प्रोत्साहन मिळावे, यासाठी २००८ मध्ये महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल एस. एम. कृष्णा यांनी 'आविष्कार' स्पर्धेची सुरुवात केली. ही स्पर्धा पदवी, पदव्युत्तर आणि पी.पी.जी. (पीएच.डी) या गटांमध्ये जिल्हास्तर, विद्यापीठ स्तर आणि आंतर विद्यापीठ (महाराष्ट्र राज्य) स्तरावर घेण्यात येते. यावर्षी १८ वी आविष्कार स्पर्धा महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल श्री आचार्य देवव्रत यांच्या आदेशान्वये आयोजित करण्यात आली. या स्पर्धेत संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठद्वारा संचालित मॉडेल डिग्री कॉलेज बुलडाणा येथील अर्थशास्त्र विभागाचे प्रा. प्रमोद विश्वनाथ पंडीत यांनी पी.पी.जी. (पीएच.डी) गटामध्ये आपला संशोधन प्रकल्प बुलडाणा जिल्हा स्तरावर सादर केला. त्यांच्या गोडंबी (बिब्बा) प्रक्रिया उद्योग या संशोधन प्रकल्पाला प्रथम क्रमांक मिळून त्यांची विद्यापीठ स्तरासाठी निवड करण्यात आली.

विद्यापीठस्तरीय आविष्कार स्पर्धेत संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ येथे त्यांनी आपला संशोधन प्रकल्प सादर केला व प्रकल्पाला द्वितीय क्रमांक मिळाला. याबद्दल त्यांना विद्यापीठ स्तरावर अत्यंत



मानाच्या समजला जाणारा 'कलरकोट' ने सन्मानित करण्यात आले व आंतर विद्यापीठ (राज्य) स्तरावर त्यांची निवड झाली. राज्यस्तरावरील ही स्पर्धा २८ ते ३१ जानेवारी, २०२६ दरम्यान वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी येथे पार पडली. या स्पर्धेत संपूर्ण महाराष्ट्रातील २६ विद्यापीठांनी सहभाग घेऊन पदवी, पदव्युत्तर आणि पी.पी.जी. (पीएच.डी) गटात संपूर्ण महाराष्ट्रातील ९१० संशोधक विद्यार्थ्यांनी आपले संशोधन प्रकल्प सादर केले. यामध्ये पी.पी.जी. (पीएच.डी) गटामधून प्रा. प्रमोद विश्वनाथ पंडीत यांच्या संशोधन प्रकल्पाची राज्यस्तरावरील पहिल्या दहा प्रकल्पामध्ये निवड करण्यात आली.

प्रा. प्रमोद विश्वनाथ पंडीत हे मॉडेल डिग्री कॉलेज बुलडाणा येथे कार्यरत आहेत. त्यांचे श्री शिवाजी विज्ञान व कला महाविद्यालय, चिखली येथील संशोधन केंद्रात डॉ. सुनिता कलाखे यांच्या मार्गदर्शनाखाली अर्थशास्त्र विषयांमध्ये संशोधन (पीएच.डी.) सुरू असून त्यांनी चिखली तालुक्यातील भानखेडे येथील महादेव कोळी या जमातीतील आदिवासी महिला करीत असलेल्या बिब्ब्यापासून गोडंबी प्रक्रिया उद्योग डोळ्यासमोर ठेवून पश्चिम विदर्भाच्या संदर्भात संशोधन प्रकल्प राज्यस्तरीय आविष्कार स्पर्धेत सादर केला. या प्रकल्पासाठी त्यांना आचार्य पदवीच्या मार्गदर्शिका डॉ. सुनिता कलाखे, डॉ. अण्णासाहेब म्हळसणे आणि भानखेडे येथील पोलीस पाटील मिलींद इंगळे यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

# समाजकार्य महाविद्यालयात वार्षिक स्नेहसंमेलन

**अमरावती/का.प्र.**
विदर्भ युथ वेलफेअर सोसायटी, अमरावती द्वारा संचालित समाजकार्य महाविद्यालय, अमरावती येथे संस्थेचे अध्यक्ष डॉ. नितीन धांडे, उपाध्यक्ष ॲड. उदय देशमुख, कोषाध्यक्ष प्रा. (डॉ.) हेमंत देशमुख, सचिव युवराजसिंग चौधरी तसेच कार्यकारी सदस्य नितीन हिवसे, डॉ. पूनम चौधरी,प्रा. विनय गोहाड, पंकज देशमुख व प्रा. गजानन काळे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते याचाच भाग म्हणून महाविद्यालयात स्नेह संभेलनाचे आयोजन करण्यात आले होते



येथील वार्षिक स्नेह संमेलनामध्ये समाजकार्य महाविद्यालयातील महिला प्राध्यापकांचे रोपटे देऊन सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमाचे तथा विदर्भ युथ वेलफेअर सोसायटी, अमरावतीचे अध्यक्ष डॉ. नितीन धांडे हे होते तर अमरावती शहर पोलीस उपायुक्त गणेश शिंदे यांची विशेष उपस्थिती होती.

वि.यु.वे.सो. अमरावतीचे कार्यकारिणी सदस्य पंकज देशमुख, प्रमुख व प्रसिद्ध वक्ते डॉ. राजेश मिरगे, सकामचे प्राचार्य डॉ. राजकुमार दासरवाड, रिलस्टार श्रीमती प्रज्ञा राऊत, सत्कारमुर्ती जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित श्री. राजू बसवनाथे,

ज्योती राठोड,विनोद गोळे, एन.एक्स.टी. संस्थेचे संचालक सुरेंद्र गेडाम, वार्षिक स्नेह संमेलनाचे समन्वयक डॉ. तुळशीराम राठोड, महिला समन्वयक डॉ. रंजना इंगोले, इत्यादी मान्यवरासह महाविद्यालयातील प्राध्यापक वृंद आणि संशोधक तसेंच बी.एस.डब्ल्यू, एम.एस.डब्ल्यू. एम.ए. समाजशास्त्राचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## महिला दिनाला साकारल्या लक्ष्मीबाई, मॉ जिजाऊ सावित्रीबाई फुले

**धामणगाव रेल्वे**-नगरपरिषद महिला बालकल्याण विभाग व नगराध्यक्षा डॉ. अर्चना अडसड-रोठे यांच्या पुढाकाराने प्रथमच स्व. दादाराव अडसड क्रीडांगण, येथे जागतिक महिला दिनानिमित्त परिसंवाद, वादविवाद स्पर्धा, फॅशन शो तसेच आनंद मेळावा आयोजित केला होता.

यावेळी प्रमुख अतिथी म्हणून मुख्याधिकारी पुनम कळंबे. न.प. सदस्य मंजिरी भोगे, प्रतिभा खोब्रागडे, मनिषा शिरभाते, रीना साहू, रंजना शेलोकार, सीमा बागडे प्रियंका जवंजाळ, काजल उपरीकर,सीमा पेंदाम, अंजली मार्वे, यांची उपस्थिती होती. प्रसारमाध्यमांचा यात ७० महिलांनी सहभाग घेतला होता. तर पारंपारिक वेशभूषेत मॉ जिजाऊ सावित्रीबाई फुले, झाशीची राणी लक्ष्मीबाई, रमाबाई आंबेडकर, सिंधुताई सपकाळ, आनंदी जोशी, ग्रामीण भागातील कष्टकरी महिलांचे वास्तव्य मांडणारी शेतकऱ्यांची बायको, आदिवासी महिलांचे जीवनमान यांचे १४३ महिलांनी वेशभूषा सादर केली होती. प्रोत्साहन बक्षीस रिता बोरगावकर रमल साकोरे यांना देण्यात आले. स्त्री कुटुंबाची नव्हे तर जगाची आधारस्तंभ- अर्चना अडसड - रोठे तंत्रज्ञानाच्या युगात किती बदल झाला हे जग अधिक पुढे गेले तरी ही जगाच्या इतिहासात स्त्री ही केवळ कुटुंबाची नव्हे,तर संपूर्ण समाजाची आधारस्तंभ आहे. तिच्या कर्तृत्वाची, संघर्षाची आणि योगदानाची दखल पुरुषांनी व आपणं सर्वांनी घेतली पाहिजे या मेळाव्याच्या उद्घाटन प्रसंगी असे मत नगराध्यक्ष अर्चना अडसड - रोठे यांनी व्यक्त केले. या महिला दिनाच्या कार्यक्रमाला धामणगाव शहरासह तालुक्यातील पंचक्रोशीतील महिलांची उपस्थिती होती.



## पी. आर. पोटे पाटील कॉलेज येथे 'लॅंडस्केप आर्किटेक्चर' विषयावर संवाद

**अमरावती-**पी. आर. पोटे पाटील कॉलेज ऑफ आर्किटेक्चर येथे 'लॅंडस्केप आर्किटेक्चर' या विषयावर एक सखोल व ज्ञानवर्धक संवाद कार्यक्रम उत्साहात पार पडला. या कार्यक्रमासाठी प्रमुख वक्ते म्हणून PIADS कॉलेज नागपूर येथील प्रख्यात तज्ञ डॉ. सारंग गुर्जर यांनी संवाद साधला या कार्यक्रमाला महाविद्यालयाचे प्राचार्य संजय देशमूख अध्यक्ष म्हणून लाभले होते.

लॅंडस्केप आर्किटेक्चरचे महाविद्यालयात नेहमी उत्कृष्ट रित्या आयोजीत करण्यात येते. landscape architecture चे आधुनिक वास्तुकलेतील वाढते महत्त्व अधोरेखित केले. शहरांच्या वाढत्या नागरीकरणामुळे हरित क्षेत्रांचे जतन आणि नियोजन कसे आवश्यक आहे, यावर त्यांनी भर दिला. तसेच विद्यार्थ्यांनी केवळ इमारतींच्या रचनेपुरते मर्यादित न राहता, पर्यावरणपूरक व शाश्वत विकासाकडे लक्ष देणे गरजेचे असल्याचे कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. राम विघे यांनी केली त्यांनी आपल्या मनोगतात सांगितले.यानंतर प्रमुख वक्ते डॉ. सारंग गुर्जर यांनी अत्यंत सविस्तर व प्रभावी मार्गदर्शन केले. त्यांनी लॅंडस्केप आर्किटेक्चर म्हणजे काय, त्याची व्याप्ती, तसेच यामधील करिअरच्या संधी याबाबत माहिती दिली. त्यांनी शहरी नियोजन, उद्याने, सार्वजनिक स्थळे, जलसंधारण, जैवविविधता यांचा समतोल राखत डिझाइन करण्याचे महत्त्व स्पष्ट केले.`

# पिंगळादेवी गडावर चैत्र मासानिमित्त नवरात्र महोत्सवाला प्रारंभ

**लेहेगाव/वार्ताहर**
महाराष्ट्रातील साडेतीन शक्तीपीठापैकी अर्धशक्ती पीठ असलेल्या पिंगळाई गडावर पिंगळा देवीच्या दर्शनासाठी यावर्षी चैत्र मासानिमित्त नऊ दिवसीय नवरात्र महोत्सवाचे आयोजन केले असून येथे १९ मार्च २०२६ रामनवमी पासून देवीच्या दर्शनाकरिता भक्ताची अलोट गर्दी होणार असून यावर्षी विश्वस्त मंडळाकडून विविध कार्यक्रमाचे आयोजन दिनांक १९ व २६ मार्च या दरम्यान आयोजित केले आहे. चैत्र मासानिमित्त नवरात्र उत्सवात देवीची पूजा च्या होम हवन करण्याकरिता पुजारी मारुडकर परिवार पिंगळादेवीच्या गडावर दाखल झाले आहेत.

कोल्हापूरची महालक्ष्मी, तुळजापूरची तुळजाभवानी, वनीची सप्तश्रृंगी या साडेतीन पिठापैकी पिंगळा देवी ही एक अर्धशक्तीपीठ आहे. पिंगळा देवी गडावर चैत्र मासानिमित्त नवरात्र उत्सवाला सुरुवात झालेली असून विविध धार्मिक कार्यक्रम घेतल्या जातात. दररोज मंदिरामध्ये हरिपाठ, प्रार्थना, प्रवचने होम हवन आणि महायज्ञा इत्यादी कार्यक्रमाचे आयोजन केले आहे . परिसरातील अनेक गावातील सदभक्तांनी दररोज भजनी मंडळांनी भजनाचा कार्यक्रम मंदिरामध्ये ठेवण्यात आला आहे.सोबतच दररोज महाप्रसाद सुद्धा येणाऱ्या भक्तांना वितरित करण्यात येत आहे.पिंगळादेवी ही जागृत देवी



असून तिचे दर्शनीय रूप दिवसातून तीनदा बदलत असते. सकाळी बाल्यावस्था, दुपारी तरुणावस्था व संध्याकाळी वृद्धावस्थेत दिसत असल्याचा अनेक भाविकांचा भास होतो. या देवीची एक आख्यायीका असून त्यामुळे परिसरातील भाविकांमध्ये देवी बद्दलचे महत्त्व अधिकच रूढ झाले आहे. गेल्या अनेक वर्षांपूर्वी मंदिरासमोर सभामंडप होता. तो मंडप निजामाने तोडून टाकला होता तेव्हा देवीने त्याच्या स्वप्नात येऊन दृष्टांत दिला त्यामुळे प्रभावित होऊन त्याने सभामंडप पुन्हा बांधून दिला.

ती मुस्लिम वस्तू आजही कायम आहे हैदराबादच्या निजामाला ही घटना माहीत होतास त्याच्या मनातही देवी बद्दल श्रद्धा निर्माण झाली.

नवरात्रात मोठ्या प्रमाणात भाविक भक्तांची गर्दी असते परंतु यावर्षी सुद्धा चैत्र मासानिमित्त मंदिरावर मारुडकर परिवार दाखल झाले असून ते १९ मार्च २०२६ पासून मंदिरामध्ये नवरात्र उत्सवाची स्थापना करून दररोज देवीची पूजा करतील.विश्वस्त मंडळाने यावर्षी पिंगळा देवीच्या दर्शनाकरिता येणाऱ्या भाविक भक्ताची व्यवस्था केली असून मंदिरासमोर भव्य असा सभामंडप उभारण्यात आला आहे.

गेल्या एक वर्षापासून पिंगळा देवीच्या मंदिराचे भव्य असे मंदिराचे काम चालू असून या कामाकरिता सदभक्तांनी सदर हाताने मदत करावी आणि देवीच्या दर्शनाचा चैत्र मासानिमित्त नवरात्र उत्सवात दर्शनाचा लाभ घ्यावा असे आव्हान विश्वस्त मंडळाचे अध्यक्ष विनीत पाखोडे, सचिव आशिष मारुडकर,विश्वस्त पद्माकरराव पाखोडे पिंगळादेवी मंदिराचे मुख्य पुजारी संदीप महाराज मारूडकर,महेश महाराज मारूडकर यांनी केले आहे.

# गुढीपाडवा-ज्ञान,विज्ञान,संस्कृती आणि संस्कार दिन!!

गुढीपाडवा म्हटला की, भारतीय नववर्षाचा प्रथम दिन. आता हिंदुत्व जनजागरणामुळे या दिवसाला विशेष महत्व प्राप्त झाले आहे.गावखेड्यापासून तर महानगरापर्यंत या दिवसाचे प्रचंड उत्साहात स्वागत केले जाते.पारंपारिक मंगलवेष,जरीपटके आणि फेटे घालून भव्य शोभायात्रांनी नववर्षाचे स्वागत केले जाते.घराघरावर गुढ्या आणि भगव्या पताकांनी आसमंत शोभायमान होतो.भारतीय नववर्ष सर्वांच्या मनामनात आणि घराघरात इतके स्थापित झाले की काहीच वर्षात इंग्रजी नववर्षाचा विसर पडेल एव्हढा उत्साह सर्वत्र दिसतो.

**काय आहे गुढीपाडवा?**

गुढीपाडवा ज्ञान,विज्ञान,संस्कार आणि संस्कृती रक्षणाचा दिवस आहे.चैत्र महिन्यातील पहिला दिवस म्हणजे चैत्र शुध्द प्रतिपदा.चैत्र हा भारतीय बारा महिन्यातील पहिला महिना.या महिन्यातील पौर्णिमेला चित्रा नक्षत्र असते म्हणून या पौर्णिमेला चैत्री पौर्णिमा म्हणतात.चित्रा नक्षत्रावरून या महिन्याला चैत्र महिना असे नामाभिदान झाले.या दिवसाचे वैदिक,पौराणिक, अध्यात्मिक ,ज्योतिष,नैसर्गिक आणि आयुर्वेदिक महत्व आहे.

ब्रह्मदेवाने विश्वाची निर्मिती केली तो हा दिवस.सत्ययुगाचा प्रथम दिवस म्हणून हा दिवस मंगलमयी आहे.साडेतीन मुहूर्तापैकी सर्वाधिक पवित्र आणि गोड दिवस म्हणून सर्वजण त्यापद्धतीने हा दिवस उत्साहात साजरा करतात.याच दिवशी भगवान श्रीरामचंद्र रावण वध करुन आपला चौदा वर्षाचा वनवास पुर्ण करुन अयोध्येत आगमन करते झाले.वनवासात असतांना याच दिवशी श्रीरामचंद्रप्रभुंनी वाली निर्दालन करुन प्रजेला वालीच्या जाचातून मुक्त केले तो हा दिवस.या महिन्यात वसंताचे आधीपासूनच वास्तव्य,त्यामुळे नटवर होणारी सृष्टी आणि वसंत गारव्यामुळे आल्हाददायक वातावरणाचा सर्वत्र संचार तो हा दिवस.

भगवान शंकर आणि पार्वती आईसाहेबांचा विवाह निश्चीतीचा (वाग्निश्चय) हा दिवस .शिवशक्ती ऐक्य निर्माणाचा हा दिवस.या दिवसाच्या काही विशेष घटना इतिहास म्हणून सांगितल्या जातात.चेदीनरेश 'वसूराजे' यांनी कठोर तपश्चर्या केल्यानंतर भगवंताने



प्रसन्न होऊन त्यांना दिव्य,सदा कुर्वंतू मंगलम अशी एक वेळूची काठी दिली.चेदीनरेशांनी ती काठी वस्त्रअलंकारे सजवून तिची पूजा केली. त्या दिव्यकाठीला ब्रह्मध्वज म्हणून अर्चन केले.हा ब्रह्मध्वज म्हणजे गुढी.हा दिवस प्रतिपदा म्हणजे पाडवा.म्हणून हा दिवस गुढीपाडवा म्हणून प्रसीद्ध झाला.

पुराणकथेनुसार सागरउदरातून निर्माण झालेल्या 'शंखासुर'नावाच्या राक्षसाने वेदहरण केले आणि तो समुद्रतळात दडून बसला. वेदमुक्तीसाठी भगवान विष्णूंनी मत्स्यरुप धारण करुन शंखासुर नावाच्या राक्षसाचा वध केला तो हा चैत्र शुध्द प्रतिपदा म्हणजे गुढीपाडवा. प्रतिष्ठान नगरी म्हणजे हल्लीचे पैठण.याक्षेत्री 'शालिवाहन'नावाचे राजे राज्यकारभार करीत होते.या राज्यावर शक नेहमीच आक्रमण करीत.समाज मृतवत आणि सैन्य मातीसारखे निपचित पडून शकांचा अत्याचार सहन करीत असे.अशावेळी शालिवाहनाने मातीसमान सैनिकांमध्ये स्फुलिंग जागवले आणि मातीसमान सैन्य पेटून उठले आणि शकांचा पराभव झाला.तेंव्हापासून नवीन कालगणना सुरु झाली.गुढ्या तोरणे लावून शालिवाहनाचे स्वागत झाले.ह्या दिवशी शालिवाहन शकाचा प्रारंभ झाला.

छत्रपती शिवाजी महाराजांनी जुलमी सत्तेला नष्ट करुन स्वराज्य स्थापन केल्यामुळे छत्रपतींना मानवंदनेसाठी रयतेने गुढ्या उभारून स्वागत केले.तो दिवसही वर्षप्रतिपदा.प्रत्येक वेळी राज्यात दृष्टशक्तीवर सज्जनशक्तीने विजय मिळवला आणि प्रजेला सुजलाम सुफलाम केले म्हणूनच गुढीला विजयचिन्ह आणि समृद्धीचे प्रतीक म्हणतात.कलियुगात एकूण सहा शककर्ते आहेत.त्यातले तीन होऊन गेले आणि उर्वरित तीन पुढे होतील.

कलियुग एकूण ४,३२,००० वर्षाचे आहे.हे सहा शके खालीलप्रमाणे आहेत.पहिले धर्मराज युधिष्ठिर.इंद्रप्रस्थात धर्मराज्याची मुहूर्तमेढ रोवली.त्यांचा शक एकूण ३०४४ वर्ष राहिला.त्यानंतर अवंतिका म्हणजे उज्जयिनी मध्ये विक्रमादित्य झालेत.त्यांचा शक एकूण १३५ वर्ष राहिला.तिसरा प्रतिष्ठान म्हणजे पैठण मध्ये शालिवाहन तो अठरा हजार वर्षापासून सुरूच आहे.पुढे चौथा वैतरणी तीरावर विजयाभिनंदन नावाचे शककर्ते दहाहजार वर्ष होतील.पुढे गौड प्रदेशात धारातीर्थ क्षेत्री नागार्जुन नावाचे शककर्ते चार लक्ष वर्ष असतील.सहावे कर्नाटकात कल्की नावाचे शककर्ते होतील.ते आठशे एकवीस वर्ष असतील.या सर्व शकाकर्त्यांच्या राज्यवर्षांची एकूण बेरीज चार लाख बत्तीस हजार होते.युगाब्ध ५१२५ म्हणजे कलियुगाचे ५१२५ वर्ष संपली आहेत.प्रत्येक शकाचा प्रथम दिवस हा चैत्र शुद्घ प्रतिपदा म्हणजे गुढीपाडवा आहे.

गुढीपाडव्यालाच संवत्सर प्रारंभ होते.संवत्सर वार्षिक कालगणनेचे एकूण साठ वर्षाचे कालचक्र. पुराणकाळापासून एकूण साठ संवत्सरे आहेत म्हणून साठ वर्षाचे कालचक्र.जसे या गुढीपाडव्याला क्रोधी नाम संवत्सर प्रारंभ होणार आहे.थोडक्यात प्रत्येक गुढीपाडव्याला म्हणजे एक वर्षानंतर एक संवत्सर संपून नवीन संवत्सर प्रारंभ होते.भगवान बुद्धनिर्वाणानंतर बुद्धनिर्वाण संवत्सर आणि छत्रपती शिवरायांच्या राज्याभिषेकानंतर शिवराज्याभिषेक संवत्सर मानल्या जाते.भारतीय संस्कृतीत गुढीपाडव्याचे आयुर्वेदिक महत्त्वही आहे.

या दिवशी गुळ,कडुनिंबाची कोवळी पाने आणि मोहर,हिंग,धने,जिरे आणि ओवा याची ठेचून गोळी केली जाते.ती गोळी सर्वांना आवर्जून खायची असते.रोगप्रतिकारक क्षमतावाढ,रक्तशुद्धी सारख्या अनेक आजारांवर ही गोळी उपयोगी आहे.याच दिवशी करसडा नावाची रान वनस्पती आंघोळीच्या वेळी स्नानगृहात पाटाखाली ठेवली जाते.डास ,चिलूट किंवा तत्सम कीटकनाशक ही रानवनस्पती आहे.गुढीपाडव्याला गुढीला साखरेची गाठी लावण्याचा प्रघात आहे.साखरेची गाठी पाण्यात घालून ते पाणी पिल्यास उष्मा कमी होतो.गुढीपाडव्याचे आयुर्वेदिक महत्व अनन्यसाधारण आहे.

गुढी उभारताना पाटावर तांदुळ म्हणजे अक्षदांचे स्वस्तिक, वेळूची स्वच्छ आणि सरळ काठी,काठीला शक्ती वस्त्र, कडूलिंबाची फांदी,आंब्याची डहाळी,गाठी आणि त्यावर कलश असा सुशोभायमान ब्रह्मध्वज पाहता रुप आनंद साठवे अशीच अनुभूती येते.हा दिवस पवित्र असल्यामुळे देवघरातील देवांचे वस्त्र,देवांची आयुधे बदलली जातात.देवाला अभिसिंचन,ऋतुकाळोद्भव फळे आणि फुले वाहिली जातात.महिला पुरुष मंगलवस्त्र,परंपरागत वेषभूषा करुन एकमेकांना शुभेच्छा देतात.सामाजिक समरसतेचा सहज संस्कार म्हणजे गुढीपाडवा.

संपूर्ण भारतवर्षात वर्षप्रतिपदेचे सर्वांगसुंदर महत्व आहे.ब्रह्मध्वजासमोर नतमस्तक होऊन नवीन वर्षाचा शुभसंकल्प करूया.देव,देश आणि धर्मकार्यात वर्षभर सहभागी होऊन हे राष्ट्र परमवैभवास नेऊया!!सर्वांना नूतनवर्षाभिनंदन !!

**ब्रह्मध्वज नमस्तेस्तु,सर्वाभिष्ट फलप्रद।**
**प्राप्तेस्मिन्वत्सरे नित्यं,मदगृहे मंगलं कुरू।।**

**विद्यावाचस्पती प्रा.दिलीप जोशी**
वाशिम. मो.९८२२२६२७३५

# गुढीपाडवा:सांस्कृतिक ओळखीचा उत्सव

गुढीपाडवा हा महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनातील महत्त्वपूर्ण सण. तो केवळ नववर्षाचा प्रारंभ दर्शवत नाही, तर माणूस, निसर्ग आणि समाज यांच्यातील नात्याची आठवण करून देतो. गुढीपाडव्याच्या सांस्कृतिक परंपरेचे पाच महत्वाचे संदर्भ आहेत. पहिला संदर्भ म्हणजे ब्रम्हदेवाने या दिवशी विश्वाची निर्मिती केली असे सांगितले जाते.पृथ्वीवरील कालगणतीची सुरवात या दिवशी झाली, असे भारतीय परंपरेत मानले आहे. दुसरे महत्व असे की, मर्यादा प्रभू श्रीरामचंद्र आपला १४ वर्षाचा वनवास संपवून आणि लंकाधिपती रावणाचा पराभव करून याच दिवशी अयोध्येला परत आले. त्यांच्या स्वागतासाठीअयोध्यानगरीत सर्वत्र गुढ्या उभारण्यात आल्या. तिसरा संदर्भ म्हणजे शालिवाहन या सातवाहनांच्या प्रमुख सम्राटाने शकांचा पराभव करण्यासाठी ६००० मातीच्या सैनिकांचे पुतळे तयार केले आणि त्यांची प्राणप्रतिष्ठा करून त्यांना संजीवन करून त्यांच्या सामर्थ्याच्या सहाय्याने या दिवशी त्याने शक आक्रमकांचा पराभव केला, अशी आख्यायिका आहे.

गुढीपाडवा म्हणजे चैत्र महिन्याच्या शुद्ध प्रतिपदेचा दिवस म्हणजेनव्या वर्षाची पहाट.या दिवशीपहाटेलाकेवळ कॅलेंडरचे पान बदलत नाही, तर माणसाच्या मनात नव्या आशा, नव्या अपेक्षा आणि नव्या संकल्पांची बीजे रोवल्या जातात.पूर्वीच्या काळी,जेव्हा जीवनाचा वेग संथ होता,निसर्गाशी नाते अधिक जवळचे होते, तेव्हा गुढीपाडवा हा सण जीवनाच्या लयीत सहज मिसळलेला होता. आज मात्र या सणाकडे पाहण्याची दृष्टी बदलत चालली आहे.



बदलत्या संस्कृतीत आणि आधुनिक पिढीच्या विश्वात गुढीपाडव्याचे स्थान काय, हा प्रश्न गांभीर्याने विचारात घ्यावा लागतो.

गुढी उभारण्याची परंपरा ही विजय, समृद्धी आणि शुभारंभाचे प्रतीक मानली जाते.परंतु काळ जसजसा पुढे गेला, तसतसे या प्रतीकांचा अर्थ अनेकांसाठी धूसर होत गेला. आधुनिक जीवनशैलीत वेळेचा अभाव, स्पर्धेचे दडपण आणि भौतिक यशाचे आकर्षण वाढले.सण साजरे होतात,पण त्यामागील भावार्थ हरवत चालल्याची जाणीव अनेकदा होते.गुढीपाडवा हा अनेकांसाठी आता एक औपचारिक दिवस ठरतो कामाला सुटी असलेला,शुभेच्छांचे संदेश मोबाईलवरून पाठवण्याचा आणि सोशल मीडियावर फोटो टाकण्याचा.परंपरेचा आत्मा जपण्याऐवजी तिचे केवळ बाह्यरूप उरतांना दिसत आहे.

गुढीपाडव्याचे मूळ तत्त्व नव्या सुरुवातीचा उत्सव, निसर्गाशी सुसंवाद, सकारात्मक मानसिकता हे आजच्या काळातही तितकेच उपयुक्त आहे.उलट, तणाव, नैराश्य आणि अस्थिरतेच्या युगात अशा सणांची गरज अधिक आहे.आजच्या बाजारपेठी युगात आणि त्यातूनही डिजिटल युगात सणांचे स्वरूपही बदलले आहे. गुढीपाडवा म्हणजे सवलती, जाहिराती आणि खरेदीचा हंगाम असा अर्थ अनेकदा घेतला जात आहे. सणांचा उत्साह टिकवण्यासाठी बाजारपेठेची भूमिका नाकारता येणार नाही, पण सण जर केवळ उपभोगाचा उत्सव ठरला, तर त्याची सांस्कृतिक ओळख धोक्यात येते. पूर्वी साधेपणा हा सणांचा गाभा होता. आज मात्र दिखावा, भपकेबाजी आणि कृत्रिमतेने तो गाभा झाकोळला जातो आहे.

पर्यावरणीय दृष्टिकोनातून पाहिले, तर गुढीपाडवा हा अत्यंत सुसंगत सण आहे. नैसर्गिक घटकांचा वापर, ऋतुबदलाचे स्वागत आणि आरोग्याची काळजी हे सारे या सणात अंतर्भूत आहे. आज, जेव्हा पर्यावरणीय संकटे डोळ्यांसमोर उभी आहेत, तेव्हा अशा परंपरांचे नव्याने आकलन करणे आवश्यक आहे.

बदलती संस्कृती आणि आधुनिक पिढी या परंपरेच्या विरोधात उभ्या नसून, त्या परंपरेला नव्या अर्थाने पुढे नेण्याची संधी आहेत.गुढी उभारणे म्हणजे केवळ दाराशी एक प्रतीक उभे करणे नव्हे, तर मनात सकारात्मकतेची, आत्मभानाची आणि सांस्कृतिक ओळखीची गुढी उभारणे होय. जर ही गुढी मनात उभी राहिली, तर काळ कितीही बदलला तरी गुढीपाडव्याचे महात्म्य अबाधित राहील. आणि तेव्हाच हा सण केवळ साजरा केला जाणार नाही, तर जगला जाईल पिढ्यान्‌पिढ्या, नव्या अर्थाने, नव्या प्रकाशात....

**श्रीपाद टेंबे,**
मो.९१५८०८८०४२

## शास्त्रानुसार गुढीचे आध्यात्मिक अर्थ



चैत्र शुक्ल प्रतिपदेला हिंदू नववर्षाची सुरुवात होते.नवचैतन्य, आनंद आणि समृद्धीचे प्रतीक असलेली गुढी उभारून हा दिवस गुढीपाडवा म्हणून साजरा केला जातो. या दिवशी गुढी उभारण्यामागे केवळ परंपरा नसून त्यामागे आध्यात्मिक शास्त्रही दडलेले आहे. म्हणून गुढी कशी उभारावी,हे जाणून घेणे आवश्यक आहे.या दिवशी सकाळी सूर्योदयानंतर लगेच गुढी उभारावी. घरात उभे राहून बाहेर पाहिल्यास गुढीदाराच्या उजव्या बाजूस उभारावी. गुढी उभारण्यासाठी वेळूची काठी,साखरेच्या गाठींची माळ, रेशमी वस्त्र, आंब्याच्या पानांची डहाळी, कडुनिंबाची पाने आणि तांब्याचा कलश यांचा उपयोग केला जातो. या प्रत्येक घटकाचे वेगळे आध्यात्मिक महत्त्व आहे.गुढीवरील तांब्याच्या कलशावर कुंकवाचे स्वस्तिक काढले जाते आणि तो कलश गुढीवर उलटा ठेवला जातो. आजकाल काही ठिकाणी स्टील किंवा मडक्याच्या आकाराची भांडी ठेवली जातात; मात्र शास्त्रानुसार गुढीवर तांब्याचाच कलश ठेवावा, असे सांगितले आहे. तसेच कलश उपडा ठेवणे अशुभ आहे, असा चुकीचा समज आजकाल पसरलेला दिसतो. प्रत्यक्षात कलश उलटा ठेवण्यामागेही शास्त्रीय कारण आहे. गुढीपाडव्याच्या दिवशी वातावरणात प्रजापती लहरींचे प्रमाण अधिक असते.गुढीवर उलटा ठेवलेल्या कलशाच्या निमुळत्या भागातून या लहरी आकृष्ट होतात आणि त्या कलशात सामावून राहतात.त्यामुळे गुढीची पूजा करणाऱ्याला त्याचा आध्यात्मिक लाभ मिळतो. तसेच या लहरींमुळे भूमीची उपजाऊ शक्ती वाढण्यासही मदत होते.म्हणूनच परंपरेचा खरा अर्थ समजून घेत, कोणत्याही चुकीच्या समजुतींना बळी न पडता शास्त्रानुसार गुढी उभारणे महत्त्वाचे आहे.

**डॉ.स्वाती देशमुख**

## धर्मासाठी प्राणाचे बलिदान देणारे छत्रपती संभाजी

छत्रपती संभाजी राजांचा जन्म पुरंदर किल्ल्यावर झाला.लहानपणीच मातृछत्र गेल्यामुळे माँसाहेब जिजाऊंच्या वात्सल्याच्या छायेत ते वाढले. शंभूराजांची कुशाग्र बुद्धिमत्ता,भाषा चातुर्य,साहित्य,राजनीती आणि युद्धकौशल्य निपुणता वादातीत होते. शिवाजी महाराजांच्या पराक्रमाच्या गोष्टी ऐकायला त्यांना आवडत असे.



अगदी वयाच्या नवव्या वर्षी पुरंदरचा तह आणि त्याचे परिणाम,नंतर आग्र्याहून सुटका अशा प्रसंगांना ते सामोरे गेले.औरंगजेबाविषयी कटू भावना तेव्हापासूनच त्यांच्या मनात निर्माण झाली होती.औरंगजेब किती निष्ठुर, दुष्ट आणि कपटी स्वभावाचा आहे हे त्यांनी,त्याला जवळून बघितल्यामुळे चांगले माहीत होते. संभाजी राजे औरंगजेबासोबत लढत असताना कौटुंबिक पातळीवर घरभेद्यांसोबतही लढत होते. त्यांच्यासोबतच्या लोकांनी स्वतःच्या स्वार्थासाठी त्यांच्याविषयी गैरसमज पसरवले.

प्रत्यक्षात शंभूराजांच्या अंगी शौर्य,धर्य,कल्पकता,गनिमी कावा,धर्मनिष्ठा,आचार शुद्धता हे सर्व गुण होते.युद्धकलेतही ते शिवाजी महाराजांप्रमाणेच निपुण होते.शिवाजी महाराजांच्या निधनानंतर अनेक कटकारस्थाने संभाजी राजांच्या विरुद्ध करण्यात आली.स्वतःच्या वडिलांना अग्नी द्यायचा अधिकार सुद्धा त्यांचा कडून हिरावून घेतला.याप्रसंगाने शंभुराजे मनाने रक्तबंबाळ झाले.परंतु सगळ्या कावेबाजांना पुरून उरून त्यांनी स्वराज्य हाती घेतले. आणि औरंगजेबावर संपूर्ण लक्ष केंद्रित केले. कारण औरंगजेब स्वराज्यात तळ ठोकून बसला होता.त्याला मारण्यासाठी बऱ्याच क्लुप्त्या शंभूराजांनी केल्या पण प्रत्येक वेळी तो औरंगजेब वाचला.नियतीच्या मनात काही वेगळेच होते.एकाच वेळी शंभूराजांना अंतर्गत आणि बाह्य अशा दोन्ही प्रकारच्या शत्रूंना तोंड द्यावे लागले.स्वराज्याशी फितुरी करणाऱ्यांना त्यांनी कठोर शासन केले.

सतत युद्धजन्य परिस्थितीमुळे शंभुराजे रायगडावर कमी राहत.एकदा ते सैन्याची टेहाळणी करत असताना संगमेश्वराजवळ फितुरीमुळे पकडले गेले.त्यांच्यासोबत त्यांचा मित्र-सेवक कलश सुद्धा होता.औरंगजेबाने शंभूराजांना धर्मांतर कर मी तुला जीवदान देतो असे वारंवार म्हटले, पण धर्मवीर संभाजी महाराजांनी त्याला निर्भीडपणे नाही म्हटले त्यामुळे औरंगजेबाने त्यांना अतिशय क्रूरपणे मारले.त्याने आधी शंभूराजांचे हातपाय तोडले, नंतर गरम सळाकी डोळ्यात घालून डोळे फोडले.हे ऐकून सुद्धा अंगावर शहारे येतात.असे अतोनात हाल हाल त्या क्रूरकर्म्याने राजांचे केले. परंतु तो शंभूराजांचे धर्म परिवर्तन करू शकला नाही.शेवटी हिंदू नववर्ष,गुढीपाडव्याच्या आदल्या दिवशी म्हणजे फाल्गुन अमावस्येच्या दिवशी शंभुराजांची अमानुष हत्या केली.असा क्रूरकर्मा,निर्दयी औरंगजेब पुन्हा या धर्तीवर जन्म घेऊ नये.शंभूराजांचे धडावेगळे मस्तक मोगली छावणीतून फिरवण्यात आले. स्वधर्मासाठी, स्वराज्यासाठी शंभूराजांनी केलेले बलिदान शतकानूशतके आपल्या कायम स्मरणात राहील.या शंभूराजांच्या बलिदानाने महाराष्ट्र पेटून उठला. औरंगजेब कधीही स्वराज्य जिंकू शकला नाही. शेवटी याच मातीत मेला. शंभुराजां सारखा धर्माभिमान प्रत्येक हिंदुत जागृत रहावा ही काळाची गरज आहे.

**माधवी पत्की**

# 'सखी ग सखी...'

**एक टक नाटक**
**समीक्षण**




महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ अंतर्गत स्व.भाऊसाहेब लिमये सभागृह अमरावती येथे श्री. पराग घोंगे लिखित 'सखी ग सखी' हे नाटक दोन भिन्न दिग्दर्शकाचे दोन दिवस सादर झाले. शेखर पाचकवडे यांच्या डायरेक्शनमध्ये पडदा उघडून काही क्षणकाळ नेपथ्याचा परिचय केल्यासारखे स्तब्ध म्युझिकमध्ये नाटकाचा आरंभ झाला.कदाचित काळासावळा वर्ण असलेली सेलिब्रिटीच्या तोऱ्यात तरुणी मुलाखतीच्या निमित्ताने मेकअपची पेटी घेऊन एक मुलगी येते तिच्यावर सूत्रधार रागावते. मुलाखत घेण्यासाठीची तयारी.प्रतिमा ताईची मुलाकत घेण्यासाठी प्रतिमाताई येते. आम्ही साऱ्याजणी वाहिनीला मुलाखतीला आलेल्या प्रीतम ताईचे स्वागत करण्यासाठी संवादातून शब्द सुमने.सूत्रधार करणारी पण प्रतिमाच सखी ग सखी मध्ये सुरू होतात दोन मैत्रिणींचे नाट्य जीवनावर आधारित दोन पात्र. आई मुलगीचे निमित्ताने संसार जगलेले कुटुंब.दुसरा अंक सासू सुन यांच्या कौटुंबिक टोमण्यांचा बाजार.सासूबद्दल सुनेची असलेल्या समज गैरसमजेची कहानी.तिसऱ्या अंकात शेजारीण मैत्रीण आपल्या व्यवसायाचे भेदाभेद दाखवल्या गेले बँकेत नोकरी व गृहिणी यांच्या व्यावसायिक भूमिकेची मांडणी केलेला प्रयोग आणि शेवटी वृद्धाश्रमात मिळून सऱ्याजनी आपापली गाऱ्हाणे मिरवीत नाटकाची थीम ही स्त्रियांची परंपरा सृष्टीच्या बदलत्या काळानुसार उमटलेल्या भूमिकेचा परिचय देणारी आहे.

सदर नाटक पराग घोंगे लिखित असून दोन वेगवेगळ्या डायरेक्टर ने महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाच्या स्टेजवर पेश करताना १४ वे नाटकात शेखर पचकवडे यांचे डायरेक्शनमध्ये झाले ज्यात नेपथ्य बिंदचित्राच्या भिंतीवरील प्रतिमा चौकटी व लांब लचक घर, स्टुडिओ आणि लास्ट तक दोन चेहऱ्यात तीन प्रसंगाच्या भूमिका निभावणाऱ्या गोरी सावळ्यानी खेळ रंगवला. उत्तम पाठांतर मात्र मंद गतीने संवाद फेकत दोन अंकी नाटकाचा दीर्घ अंक झाला.त्यामुळे चौथ्या भिंती पलीकडील दर्शक, तंत्रसहाय्यक ओसाळले होतें.नाटकाची थीम सखी ग सखी अंत तक समजली तर नाहीच परंतु नाटकात कृतिम म्हातारपण तरुणींनी केल्याची तसेच संगीत व प्रकाशयोजनेची तारांबळ डेरेक्टरच्या धावपळीतून दिसत होती. ब्लॅकआउट मध्ये सुद्धा बाह्यमंचकर्ते ऐन वेळेवर चॅट देऊन पळाले असावे अशा स्थितीत अंक मेहनतीने पूर्ण झाला. लेखकाने तयार केलेल्या विनोद वियोगाच्या जागा कुठेच फारशा दिसल्या नाही. पात्र परिचय देताना वापरण्यात आलेल्या लाऊड स्पीकरवर 'कांदा वीस रुपये किलो'असा बाजारातील आठवण करून देणारा आवाज तर कुठे बासरी, कुठे पियानो, कुठे गाणे,कुठे दीर्घ साउंड बंद अशा रिधमचे संगीत शेवटच्या अंकात म्हातारीच्या भूमिकेत आलेल्या कल्पना पुरोहित या कलावंतीचे सौंदर्य व परिधान केलेल्या वेशभूषेतून प्रतिमा कुठल्या देशाची महिला राजदूत की राजघराण्यातील महाराणी दिसत होती.त्यामुळे रंगमंचावरील रंग संगत जुळवत आचल गजभिये व अलकेशा खालोकर यांनी पूर्ण नाटक पाठांतराच्या जोरावर पटांगण सांभाळत दिग्दर्शक ने दिलेल्या तंतोतंत सूचना पाळल्या गेल्याने नाटक दीर्घकाळ चालले जे ललित कला भवन अमरावती यांच्या मंचाचे होते.१५ वे दिवशी कामगार कल्याण केंद्र पारस,यांनी सादर करताना नेपथ्य दूरदर्शनचा स्टुडिओ रचला.त्यात माईक गहाळ. अशा दृष्यात टीन एज मधील सर्व टीम कामगार कल्याणचे कामगार म्हणून नाटक सादर करीत होते. हौशी स्पर्धेतील कलावंत हे कामगाराचे पाल्य असल्याचा भास.

कालची व आजची एकच स्टोरी (सखी ग सखी)दोन दिग्दर्शकाची जुगलबंदीची संधी दर्शकांना होती.पार्श्वसंगीत व प्रकाश योजना त्यात कलावंताचे संवाद फेक यापेक्षा नाटकाचे सादरीकरण संहीतेतील कमालीची काटछाट करून नाटकाचे अंक तंतोतंत वेळेत करून दिग्दर्शकाने कमालच केली. समलिंगी लग्नाची मनोभूमिका एकत्र असणाऱ्या,मैत्रिणीच्या घट्ट प्रेमाची कहाणी, वेगवेगळ्या भूमिका सादर करून काल्पनिक चौकटीतील स्त्रीची प्रतिमा कथानकातील मायलेकी,सासु-सून,शेजारणी तर महिला वृद्धाश्रमातील दृष्य रंगमंचावर उमटले.त्यात प्रकाश संगीत यांच्या झोतात दीपिका भुंबर यांनी डायरेक्शन करून त्यानुसार ॲक्शन करणाऱ्या मुलींचे सादरीकरण खरोखर हौशी नाटकाच्या मंचावर 'सापडून'जाते.ग्रामीण भाषेतील दर्शक किंवा हलके फुलके नाट्य समजणारेशेरा देत होते. दोन दिन(दीन निर्देशन)चे एकत्र एक टक नाटक बघताना जे टिपले ते छापले.याचे टीकाकरण करताना टीका खूप झाली ती कामगार कल्याण मंचाची.मात्र कलावंताना संधी देऊन उभे करणे म्हणजे कुपोषणाला सुदृढ पोषणकडे नेण्याची श्रमपूर्वक जबाबदारी कामगारांचे कल्याण करण्यासारखे आहे.

**कबीर फादर.**
७७९८६४५५६५


# नप क्षेत्रातील थकीत टॅक्स धारकांना दिलासा

## शास्ती करामध्ये मिळणार ५० टक्के सूट, पालकमंत्र्यांचा पुढाकार

**वर्धा/जनमाध्यम**

शहरातील थकीत टॅक्स धारकांना पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांच्या प्रयत्नामुळे मोठा दिलासा मिळणार आहे. थकीत करावर आकारण्यात आलेल्या शास्ती मध्ये आता मध्ये ५० टक्के सुट मिळणार आहे. ही सूट तब्बल २ कोटी ४६ लक्ष ७१ हजार २५४ रूपयांची आहे.

वर्धा नगर परिषद क्षेत्रातील मालमत्ता धारकांवर नप दरवर्षी कर आकारणी करते. मात्र अनेक मालमत्ता धारक वेळेत कर भरणा करीत नसल्याने त्यांच्यावर प्रतिमाह दोन टक्के प्रमाणे शास्ती आकारण्यात येते. ही आकरणी अधिक असल्याने त्यामधून सुट देण्यात यावी, अशी मागणी



थकीत मालमत्ता धारकांनी केली होती. शास्ती कराची रक्कम अधिक असल्याने त्याचा बोजा मालमत्ता धारकांवर पडत असल्याने कर वसुली वर देखील त्याचा परिणाम झाला होता. परिणामी नप ला कर वसुलीचे उद्दिष्ट पुर्ण करताना अनेक अडचणी येत होत्या. पालिकेच्या कर वसुलीवर याचा परिणाम होत असल्याने शासनाने या शास्ती मध्ये सुट दयावी, अशी मागणी करण्यात येत होती. तथापि, शासनाने थकीत कर्ज धारकांसाठी अभय योजना राबविण्याचा निर्णय घेतला आहे. वर्धा नप क्षेत्रातील २८४७६ मालमत्ता धारकांवर ७ कोटी १ लक्ष ९ हजार ७४६ रूपये कर थकीत होता. दिनांक १९ मे २०२५ अखेर पर्यंत शास्ती कराची ४ कोटी ९३ लक्ष ४२ हजार ५०८ रूपये थकबाकी होती.मालमत्ता धारकांवर प्रचंड थकबाकी असल्याने त्याचा परिणाम पालिकेच्या उत्पन्नावर देखील झाला आहे. तसेच मालमत्ता धारकांवर देखील आर्थिक भुर्दंड पडला होता. त्यामुळे शासनाच्या अभय योजनेतंर्गत प्रस्ताव पाठविण्याची सूचना पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी मुख्याधिकारी यांनी केली होती.

त्यानुसार नप ने दिनांक १९ मे २०२५ पर्यंत थकबाकी असलेल्या मालमत्ता धारकांवरील ५० टक्के शास्ती ला माफी देण्यासंदर्भात जिल्हाधिकारी यांच्याकडे प्रस्ताव पाठविला होता. त्यानुसार जिल्हाधिकारी वान्मथी सी यांनी अभय योजनेस मान्यता दिली आहे.

या निर्णयामुळे मालमत्ता कराच्या थकबाकीवरील असलेल्या शास्तीवर ५० टक्के सुट मिळणार आहे. या निर्णयामुळे मालमत्ता धारकांना दिलासा मिळणार असून पालिकेची थकीत कराची देखील वसुली होणार आहे. ही योजना १८ मार्च ते ३१ मार्च २०२६ पर्यंत राबविण्यात येणार आहे.

### शौर्याला वर्धोचा सलाम!

# म्हाडा कॉलनी मार्ग आता 'शहीद तुकारामजी ओंबळे मार्ग'

## देशासाठी प्राण अर्पण करणाऱ्या वीराला मानाचा मुजरा

**वर्धा/जनमाध्यम**

२६/११ मुंबई हल्ला दरम्यान निःशस्त्र अवस्थेत दहशतवाद्याला जिवंत पकडताना स्वतःचा जीव देशासाठी अर्पण करणारे शूरवीर तुकाराम ओंबळे यांच्या पराक्रमाला वर्धा शहराने अभिमानाने नतमस्तक होत मोठा सन्मान दिला आहे. शहरातील आर्वी नाका ते जुनी म्हाडा कॉलनी चौकापर्यंतचा मार्ग आता शहीद तुकारामजी ओंबळे मार्ग या नावाने ओळखला जाणार आहे.

नगराध्यक्ष सुधिर पांगुळ यांनी या निर्णयाचा अधिकृत आदेश अशोक फरताडे यांच्याकडे सुपूर्द केला असून, मार्गावर भव्य नामफलक उभारण्यासाठी जागेची पाहणीही करण्यात आली. प्रशासनाने यासाठी प्रशासकीय व आर्थिक मंजुरी देत हिरवा



कंदील दाखवला आहे.या नामकरणामागे शारदा अ. फरताडे यांनी केलेली मागणी महत्त्वाची ठरली. देशासाठी प्राणार्पण करणाऱ्या वीराची स्मृती कायम जिवंत राहावी आणि पुढील पिढ्यांना प्रेरणा मिळावी, या भावनेतून त्यांनी अर्ज सादर केला होता. सभेत सर्वानुमते हा प्रस्ताव मंजूर करण्यात आला.दरम्यान, सध्याच्या छत्रपती शिवाजी महाराज चौक या नावात बदल करून छत्रपती चौक असे नाव देण्याचाही निर्णय घेण्यात आला. प्रस्तावाचे सूचक नगरसेविका सोनल संदीप त्रिवेदी तर अनुमोदक नगरसेवक नदीम अतर अब्दुल सत्तर होते.शहीदाच्या स्मृती जपण्यासाठी उचललेले हे पाऊल म्हणजे केवळ नामकरण नाही, तर देशभक्तीची ज्योत कायम पेटती ठेवण्याचा निर्धार असल्याची भावना नागरिक व्यक्त करीत आहेत. पाहणीवेळी परिक्षीत येंडे, पंकज इंगोले व अनेक नागरिक उपस्थित होते.

## संक्षिप्त

### शेळया विकण्यावरून मुलाने वडिलांना मारहाण

**सेलू -** शेळ्या विकण्याच्या वादातून मुलानेच वयोवृद्ध वडिलांना मारहाण केल्याची धक्कादायक घटना सेलू परिसरात उघडकीस आली. याप्रकरणी पोलिसांनी मुलाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.मिळालेल्या माहितीनुसार, योगेश उर्फ गोकुल शंभरकर याने 'मला शेळ्या विकायच्या आहेत' असे सांगत वडील भुजंग शंभरकर यांच्याशी वाद घातला. मात्र वडिलांनी त्या शेळ्या माझ्या असून विकू देणार नाही, असे सांगितल्याने मुलगा संतापला. रागाच्या भरात त्याने धारदार लोखंडी पट्टी तसेच काठीने वडिलांवर हल्ला करून त्यांना जखमी केले. यावेळी घरातील साहित्यांचीही तोडफोड करण्यात आली.घटनेनंतर जखमी वडिलांनी पोलिसांत तक्रार दिली. तक्रारीच्या आधारे सेलू पोलिसांनी योगेश शंभरकर याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करून पुढील तपास सुरू केला आहे.

### अज्ञात वाहनाच्या धडकेत दुचाकीस्वाराचा मृत्यू

**हिंगणघाट -** अज्ञात वाहनाच्या धडकेत दुचाकीस्वाराचा मृत्यू झाल्याची घटना शहराजवळील नंदोरी उड्डाणपुलावर घडली. या प्रकरणी हिंगणघाट पोलिसांनी अज्ञात वाहनचालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, अरविंद पानतावणे (४३) रा. संत तुकडोजी वार्ड, हिंगणघाट हे एमएच ४० के ००८६ क्रमांकाच्या दुचाकीने प्रवास करीत होते. यावेळी जाम ते हिंगणघाट मार्गाने भरधाव वेगाने येणाऱ्या अज्ञात वाहनाने त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. या भीषण अपघातात अरविंद पानतावणे गंभीर जखमी झाले.अपघातानंतर त्यांना तातडीने उपचारासाठी नेण्यात आले; मात्र उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. पोलिसांनी अज्ञात वाहनाचा शोध सुरू केला असून पुढील तपास सुरू आहे.

# कडक उन्हामुळे विजेची मागणी वाढली; साहूर परिसरात वारंवार वीज खंडित

## नागरिकांनी काटकसरीने वापर करावा : अभियंता विनोद नरड

**साहूर/जनमाध्यम**

उन्हाळ्याच्या सुरुवातीलाच कडक उन्हामुळे साहूर व परिसरात विजेच्या मागणीत लक्षणीय वाढ झाली असून वाढत्या लोडमुळे वारंवार लाईट ट्रिप होणे आणि तात्पुरत्या वीज खंडितीच्या घटना घडत आहेत. त्यामुळे नागरिकांनी विजेचा वापर आवश्यक तेवढाच व काटकसरीने करावा, असे आवाहन महावितरणचे कनिष्ठ अभियंता विनोद नरड यांनी केले आहे.

परिसरात सुमारे ४२०० घरगुती, २०० वाणिज्य, ५० औद्योगिक तसेच १९०० शेतीपंप ग्राहक आहेत. तापमानात वाढ झाल्याने कुलर, पंखे, फ्रिज, पाण्याच्या मोटारी, वॉशिंग मशीन आदी उपकरणांचा वापर मोठ्या प्रमाणात वाढला आहे. परिणामी वीज वितरण यंत्रणेवर ताण येऊन ओव्हरलोड, तांत्रिक बिघाड व दुरुस्तीमुळे वीजपुरवठा खंडित होण्याचे प्रकार वाढले आहेत.अधिकृत भारनियमन जाहीर नसले तरी काही भागांत अघोषित वीजखंडितीचा अनुभव नागरिकांना येत असल्याच्या तक्रारी आहेत.

दिवसभर उपकरणे सुरू राहत असल्याने विजेची मागणी आणखी वाढत आहे.दरम्यान, परिसरात सौरऊर्जेचा वापर वाढत असल्याने काही प्रमाणात दिलासा मिळत आहे.

अनेक घरांमध्ये व शेतीत सौर प्रकल्प उभारण्यात आले असून भविष्यात त्याचा वापर वाढल्यास वीज टंचाईची समस्या कमी



होण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे.

# अवैध वाळू वाहतुकीवर पोलिसांची कारवाई

**समुद्रपूर -** वाळूच्या अवैध वाहतुकीवर समुद्रपूर पोलिसांनी कारवाई करत टिप्परसह चालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला.मिळालेल्या




माहितीनुसार, शेडगाव येथील कॅनलकडून टिप्परद्वारे वाळूची अवैध वाहतूक होत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार गस्तीवर असलेल्या पोलिसांनी शेडगाव चौरस्त्यावर संशयित टिप्पर थांबवून तपासणी केली. तपासणीदरम्यान वाहनात वाळू आढळून आली.वाहतुकीचा परवाना विचारला असता चालकाकडे कोणताही परवाना नसल्याचे स्पष्ट झाले. चौकशीत ही वाळू मांडगाव शिवारातील वणा नदीतून चोरी करून नेत असल्याचे समोर आले.या प्रकरणी अशोक सिडाम (३४) रा. रेणकापूर व दिनेश तडस रा. चौरस्ता शेडगाव यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलिस करीत आहेत.



# जांगोणा जि.प. शाळेचा 'नवोदय' पराक्रम : ९ विद्यार्थी पात्र

**हिंगणघाट/जनमाध्यम**

ग्रामीण भागातील जिल्हा परिषद शाळा गुणवत्तेत कमी नाहीत, याचा प्रत्यय तालुक्यातील पोहणा केंद्रातील जांगोणा येथील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेने पुन्हा एकदा दिला आहे. यंदाच्या जवाहर नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षेत या शाळेतील तब्बल नऊ विद्यार्थी पात्र ठरले असून, ही कामगिरी जिल्ह्यासाठी अभिमानाची ठरली आहे. एका ग्रामीण शाळेतून एवढ्या मोठ्या संख्येने विद्यार्थ्यांची निवड होणे ही दुर्मिळ बाब मानली जात आहे.

मर्यादित साधनसामग्री आणि ग्रामीण पार्श्वभूमी असूनही विद्यार्थ्यांनी जिद्द, चिकाटी आणि सातत्यपूर्ण अभ्यासाच्या जोरावर हे यश मिळवले. तृप्ती गजबे, संस्कृती आत्राम, अवनी वाघ, गायत्री कावडे, मृणाल धाडवे, मौर्या गुरनुले, निकुंज धाडवे, सुहानी राऊत आणि महेश्वरी भेंडारे या विद्यार्थ्यांनी नवोदयसाठी पात्रता मिळवली.या यशामागे सहाय्यक शिक्षक गणेश नवघरे यांचे नियोजनबद्ध मार्गदर्शन लाभले. ते स्वतः नवोदय विद्यालयाचे माजी विद्यार्थी असल्याने त्यांनी विद्यार्थ्यांना अभ्यासाची योग्य दिशा दिली. मुख्याध्यापक नरेश चौधरी, शिक्षक प्रदीप ताटेवार व नितीन खोडे यांचेही मोलाचे योगदान राहिले. मागील वर्षीही या शाळेतील तीन विद्यार्थी पात्र ठरले होते, तर आतापर्यंत सुमारे ३० विद्यार्थ्यांनी नवोदयमध्ये प्रवेश मिळवला आहे.या उल्लेखनीय यशाबद्दल ग्रामस्थ, पालक व शाळा व्यवस्थापन समितीने विद्यार्थ्यांचे व शिक्षकांचे कौतुक केले. ग्रामीण मातीतून उमललेली ही यशोगाथा इतर विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

# नवोदय यशाची अल्लीपूरमध्ये दणदणीत एन्ट्री

## दोन विद्यार्थ्यांनी पात्रता मिळवत शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा

**हिंगणघाट/अल्लीपूर/जनमाध्यम**

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या जिद्दीला पुन्हा एकदा सुवर्णकिरण लाभला आहे. अल्लीपूर येथील इंदिरा गांधी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी जवाहर नवोदय विद्यालय प्रवेश पात्रता परीक्षा २०२६ मध्ये उल्लेखनीय यश संपादन करत शाळेचा आणि परिसराचा मान उंचावला आहे.

पाचवीतील ५० विद्यार्थ्यांनी परीक्षेत सहभाग नोंदवला होता. यापैकी ईशान गोपाल शिवणकर यांनी ९० गुण तर देवांशू श्रीकृष्णराव दरणे यांनी ८८.७५ गुण मिळवत प्रवेशासाठी पात्रता मिळवली. तसेच आणखी दहा



विद्यार्थ्यांनी ७५ ते ७८ गुण मिळवत प्रतीक्षा यादीत स्थान मिळवले आहे.या उज्ज्वल यशाचे श्रेय विद्यार्थ्यांनी आपल्या पालकांसह प्राचार्य अर्चना मुडे, पर्यवेक्षक नरेश येडे, विज्ञान शाखाप्रमुख डॉ. नीलम खोडे, वर्गशिक्षक किशोर शेंद्रे तसेच सर्व शिक्षकवृंद यांना दिले. यशस्वी विद्यार्थ्यांचा शाळेत पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.या कामगिरीबद्दल अल्लीपूर परिसरात आनंदाचे वातावरण पसरले असून योगेश मानव विकास प्रतिष्ठानचे अध्यक्ष वामनराव खोडे आणि सचिव योगेशभाऊ खोडे यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.ग्रामीण मातीतून उमललेली ही यशफुले भविष्यात मोठ्या स्वप्नांना पंख देतील, असा विश्वास व्यक्त होत आहे.

# शून्य संच शाळा बंद करण्याचा निर्णय मागे घ्या; अन्यथा आंदोलन

## समता सैनिक दलाचा शासनाला इशारा



**वर्धा/जनमाध्यम**

शून्य संच मान्यता असलेल्या आणि केवळ एकच शिक्षक कार्यरत असलेल्या शाळांतील शिक्षकांचे समायोजन केल्यास अशा शाळा बंद पडून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचे मोठे शैक्षणिक नुकसान होईल. शासनाने हा निर्णय तातडीने मागे घ्यावा, अन्यथा राज्यव्यापी आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा ऑल इंडिया समता सैनिक दलाने दिला आहे.

सत्र २०२५-२६ च्या संच मान्यतेनुसार शून्य संच मान्यता असलेल्या शाळांमधील अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन करण्याची प्रक्रिया सुरू आहे. मात्र एकच शिक्षक असलेल्या शाळेतून शिक्षक काढून घेतल्यास त्या शाळा प्रत्यक्षात बंद पडतील, अशी भीती व्यक्त करण्यात आली आहे. ग्रामीण भागातील गरीब पालकांना मुलांना दूरच्या गावात शिक्षणासाठी पाठवणे शक्य नसल्याने अनेक विद्यार्थ्यांचे शिक्षण अर्धवट राहण्याचा धोका आहे.

यासंदर्भात ऑल इंडिया समता सैनिक दलाचे विदर्भ सचिव रमेश निमसडकर व रिपाईचे विदर्भ अध्यक्ष महेंद्र मुनेश्वर यांनी मुख्यमंत्री व शिक्षणमंत्री नामदार दादाजी घुसे यांना जिल्हा परिषद वर्धा येथील माध्यमिक शिक्षणाधिकाऱ्यांमार्फत निवेदन दिले.भारतीय राज्यघटनेनुसार १४ वर्षाखालील मुलांना मोफत व सक्तीचे शिक्षण देणे बंधनकारक असताना १५ मार्च २०२४ चा शासन निर्णय विद्यार्थ्यांच्या हिताविरुद्ध असल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. शून्य संच मान्यता असलेल्या शाळांबाबत पर्यायी उपाययोजना करावी व शिक्षकांचे समायोजन थांबवावे, अशी मागणी करण्यात आली.ग्रामीण भागातील शाळा बंद झाल्यास विद्यार्थी व पालकांच्या अडचणी वाढतील. विद्यार्थ्यांचे नुकसान झाल्यास राज्यभर तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा इशाराही देण्यात आला.निवेदन देताना पद्माकर कांबळे, दिलीप वैद्य आदी पदाधिकारी उपस्थित होते.

# विहिरीवरील मोटर चोरी; शेतकऱ्याचे नुकसान

**वडनेर -** शेतातील विहिरीवर बसविलेली मोटर अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना वडनेर परिसरात उघडकीस आली. या प्रकरणी पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.मिळालेल्या माहितीनुसार, शेतकरी आकाश गुडे यांची कृषी उत्पन्न बाजार समितीला लागून शेती आहे. त्यांच्या शेतातील विहिरीवर सिंचनासाठी मोटर बसविण्यात आली होती. रात्रीच्या सुमारास अज्ञात चोरट्याने ही मोटर चोरून नेली.सकाळी शेतावर गेल्यानंतर मोटर गायब असल्याचे लक्षात आल्यानंतर गुडे यांनी पोलिसांत तक्रार दिली. चोरट्याने सुमारे सात हजार रुपये किमतीची मोटर चोरी केल्याचे सांगितले जात आहे.तक्रारीच्या आधारे वडनेर पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

# किरकोळ वादातून बाप-लेकावर गुन्हा

**समुद्रपूर-** किरकोळ वादातून एका व्यक्तीवर धारदार शस्त्राने हल्ला करून गंभीर जखमी केल्याची घटना कुर्ला येथे उघडकीस आली. या प्रकरणी समुद्रपूर पोलिसांनी बाप-लेकाला अटक करून त्यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, अशोक धोटे (२९) रा. कुर्ला यांच्याशी काही कारणावरून मयूर कांबळे (३३) आणि त्याचे वडील बाबाराव कांबळे (६०) यांचा वाद झाला. वाद वाढत गेल्यानंतर दोघांनीही संतापाच्या भरात अशोक धोटे यांच्यावर धारदार शस्त्राने वार केले.

यात धोटे गंभीर जखमी झाले.जखमी व्यक्तीला उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले. दरम्यान, तक्रारीच्या आधारे समुद्रपूर पोलिसांनी मयूर कांबळे व बाबाराव कांबळे यांना अटक करून गुन्हा नोंदविला असून पुढील तपास सुरू आहे.

# सेलूत आजपासून भव्य राज्यस्तरीय शंकरपट व कृषी महोत्सव

**सेलू/जनमाध्यम**

स्व. नरहरीपंत कोटंबकार पाटील यांच्या स्मृतिप्रित्यर्थ साहसिक जनशक्ती संघटना व मित्र परिवाराच्या वतीने भव्य राज्यस्तरीय शंकरपट व कृषी महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. गुढीपाडव्याच्या शुभमुहूर्तावर गुरुवार, दि. १९ मार्च रोजी या महोत्सवाचे थाटात उद्घाटन होणार असून परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. हा भव्य सोहळा झडशी-वडगाव मार्गावरील संताजी सभागृहासमोर प्रकाश खडसे, धनराज खडसे व बालू सोनटक्के यांच्या शेतात आयोजित करण्यात आला आहे. सेलू येथे आयोजित होणारा हा शंकरपट महोत्सव सलग



तिसऱ्या वर्षी भरत असून यंदा तब्बल १२ लाख ५० हजार रुपयांच्या आकर्षक बक्षिसांची जंगी लूट स्पर्धकांसाठी ठेवण्यात आली आहे.या महोत्सवात ३५० फूट सेकंदाचा पट 'अ' व 'ब' गटात, तसेच १३०० फूट सेकंद व जोडदाणीचा पट अशी विविध थरारक स्पर्धा होणार आहेत. विशेष आकर्षण म्हणून धामणगाव रेल्वे येथील महिला धुरकरी श्रुती मिलिंद वाळके उपस्थित राहणार असल्याने प्रेक्षकांची उत्सुकता वाढली आहे.शंकरपट उद्घाटन सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी खासदार अमर काळे राहणार असून महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते महोत्सवाचे उद्घाटन होणार आहे. यावेळी आमदार दादाराव केचे, आमदार समीर कुणावार, आमदार सुमित वानखेडे, आमदार राजेश बकाणे तसेच माजी आमदार ओमप्रकाश उर्फ बच्चू कडू प्रमुख अतिथी म्हणून याप्रसंगी उपस्थित राहणार आहेत.दरम्यान, या महोत्सवाचा समारोपीय कार्यक्रम २७ मार्च रोजी आयोजित करण्यात आला असून वडसा येथील एकता नाट्य रंगभूमीच्या 'थैमान' या नाटकाच्या दमदार सादरीकरणाने महोत्सवाची सांगता होणार आहे. या राज्यस्तरीय शंकरपट व कृषी महोत्सवाला परिसरातील शेतकरी, बैलगाडा प्रेमी व नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजक रविंद्र कोटंबकार व शंकरपट आयोजन समिती अध्यक्ष भूषण उर्फ बंटी वाघमारे यांनी केले आहे.

# घरगुती वादातून पत्नीवर हल्ला

**वर्धा-** घरगुती वादातून पतीने पत्नीवर काचेच्या तुकड्याने हल्ला केल्याची घटना सेवाग्राम परिसरात उघडकीस आली. याप्रकरणी सेवाग्राम पोलिसांनी पतीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.मिळालेल्या माहितीनुसार, बेबी यादव आणि तिचे पती राजकुमार रा. आदर्शनगर, सेवाग्राम यांच्यात घरगुती कारणावरून नेहमीच वाद होत होते. त्यामुळे पत्नी गेल्या काही महिन्यांपासून पतीपासून वेगळी राहत होती. दरम्यान, एका ठिकाणी बोलत असताना दोघांची पुन्हा भेट झाली.यावेळी राजकुमारने पत्नीशी वाद घालत टेबलावरील काच उचलून तिच्यावर वार केला.

जनमाध्यम जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

संपादक-प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

वर्धा आवृत्ती वर्ष-१४ अंक १११
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३

**मुख्य कार्यालय**– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

### दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,
### वि.श्री.एस.एस.भिंगारदेव, ८ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.३२९/२०२६
**श्रीमती कुसूम अधिक चार -वि- निरंक**
पुढील ता.०८.०४.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. Smt.Kusum Ganeshrao Kadu, Age 65 Yrs. Occu.: Homemaker R/o W/o Ganeshrao Kadu, Kalarupura Shirala, Tq.Dist.Amt.
2. Sau.Nalini Sudhakar Lande, @ Ku.Nalini Ganeshrao Kadu Age 75 Yrs. Occu.: Home maker R/o W/o Sudhakar Lande, Indira Awas, Shirala, Tq.Dist.Amt.
3. Shri Sunil Ganeshrao Kadu, Age 57 Yrs. Occu.: Farmet R/o S/o Ganeshrao Kadu, Kalar Pura, Shirala, Tq.Dist.Amt.
4. Sau.Aruna Yogesh Kale, @ Ku.Aruna Ganeshrao Kadu Age 43 Yrs. Occu.: Homemaker R/o W/o Yogesh Kale, Shirala, Tq. Dist. Amravati.
5. Shri Anil Ganeshrao Kadu, Age 41 Yrs. Occu.: Farmer R/o S/o Ganeshrao Kadu, Kalar Pura, Shirala, Tq.Dist.Amravati

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **गणेशराव शामराव कडू** हे दिनांक 20.10.2013 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **कुसूम अधिक चार विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **कुसूम अधिक चार विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **०९.०३.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

### दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,
### वि.श्रीमती एन.सी.सोरटे, ७ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.५२५/२०२६
**श्रीमती श्रीकृष्णराव अधिक सहा -वि- निरंक**
पुढील ता.१८.०४.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. Shrikrushnarao Shankarrao Bilbile, Age 64 Yrs. Occu.:Labour R/o Behind Masjid, Nalsabpura, Amravati.
2. Kiran Pravinrao Alaspure, Age 43 Yrs. Occu.: Household R/o Ward No.9, Hanuman Nagar, Pardi Road, Ring Road, Warud, Tq.Warud, Dist.Amravati
3. Uma Murlidharpant Lande, Age 58 Yrs. Occu.: Household R/o Ward No.5, Ram Nagar, Khel Mhali Karajgaon, Tq.Chandur Bazar, Dist. Amravati
4. Smt.Lata Ramkrushna Bilbile, Age 57 Yrs. Occu.: Household
5. Akash Ramkrushna Bilbile, Age 34 Yrs. Occu.: Labour
6. Suraj Ramkrushna Bilbile, Age 36 Yrs. Occu.: Service No.4 to 6 R/o Near Someshwar Mandir, Nalsabpura, Bhaji Bazar Chowk, Amravati
7. Nutan Umeshrao Shrikhande, Age 38 Yrs. Occu.: Household R/o Ward No.4, Opp.Khamgaon Bank, Digital World, Warud, Tq. Warud, Dist.Amravati

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **तुळसाबाई शंकरराव बिलबिले** हे दिनांक 29.09.2023 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **श्रीकृष्णराव अधिक सहा विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **श्रीकृष्णराव अधिक सहा विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **१६.०३.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

### (Cj.Court) दिवाणी न्यायालय, (कनिष्ठ स्तर) नांदगाव खंडेश्वर,यांचे न्यायालयातील

R.M.J.C.क्र.९०/२०२६ ने.ता. /०४/२०२६

**अर्जदार :**
१. निखील पुरुषोत्तमराव देशमुख (मुलगा), वय ४२ वर्षे, व्यवसाय - वकिली रा.१२-बी, शिवप्रस्थ, वृंदावन कॉलनी, स्कूल ऑफ स्कॉलर शाळेमागे, निंभोरा, अमरावती
२. शांता पुरुषोत्तमराव देशमुख (पत्नी), वय ८० वर्षे, व्यवसाय - गृहिणी रा.नांदसावंगी, ता.ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती
३. निलीमा प्रमोदराव देशमुख (मुलगी), वय ६० वर्षे, व्यवसाय - गृहिणी रा.सराफ लेआऊट, कलोती नगर, अमरावती

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** निरंक

ज्याअर्थी मयत **पुरुषोत्तम शेषराव देशमुख** यांचा मृत्यू दि.**२५.०९.२०२५** रोजी अमरावती येथे मरण पावले. त्यांचा कायमचा पत्ता हा नांदसावंगी, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती येथील आहे. त्यांना अर्जदार यांच्या व्यतिरिक्त कोणीही वारस नहीत. मयतांचे अर्जदार हेच कायदेशीर वारस आहेत. करीता कायदेशीर वारसदार म्हणून प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्जदाराने विद्यमान न्यायालयात **मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ परि.२** अंतर्गत अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदारांविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी दिनांक **२१.०४.२०२६** रोजी **सकाळी १०.३०** वाजता दिवाणी न्यायालय, क.स्तर, नांदगाव खंडेश्वर येथील न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर रहावे. तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

आज दिनांक १४ मार्च सन २०२५ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या सही व शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय
नांदगाव खंडेश्वर

---

### तहसिलदार मोर्शी यांचे कार्यालय

क्र. रामाक्र/३१/एमआरसी-८१/अंबाडा/२०२५-२०२६

## जाहीरनामा

या कार्यालयाचे ज्ञापनाद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार **उमेश कुरवाडे**, रा.अंबाडा, ता.मोर्शी, जि.अमरावती यांनी त्यांचे आई नामे **पंचफुला रमेश कुरवाडे** मृत्यूची नोंद ग्रामपंचायत **अंबाडा** ला करण्याचा आदेश मिळण्याबाबत या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे. त्यांनी अर्जासोबत ग्रामपंचायत निबंधक, ग्रा.पं. **अंबाडा** येथील जन्म/मृत्यू नोंदवही अनुपलब्धता प्रमाणपत्र व इतर अनुषंगीक पुरावे दाखल केले आहेत.

त्याअर्थी प्रकरणात ज्या कोणास आक्षेव वा हरकती घ्यावयाच्या असेल त्यांनी सदर जाहीरनामा प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांचे आत लेखी स्वरुपात आक्षेप वा हरकती दाखल कराव्या. दिलेल्या मुदतीनंतर आलेल्या आक्षेपांचा वा हरकतीचा विचार करण्यात येणार नाही, याची नोंद घ्यावी.

दिनांक १२.०२.२०२६

शिक्का

**स्वा/-**
**तहसीलदार, मोर्शी**

---

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक १९०**
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
**ई-मेल** - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

---

## जाहीर सूचना

सर्व आम जनतेस सूचित करण्यात येते की माझे पक्षकार यांनी **मनीषा प्रवीण खडसे** वय-३८ वर्षे, व्यवसाय- शेती व गृहकार्य व **वच्छला @ वत्छला विष्णुपंत खडसे** वय- ७६ वर्ष व्यवसाय - नील दोन्ही रा. खल्लार बालाजी पोस्ट- उत्तमसरा ता. भातकुली जि. अमरावती, यांचे सामाईक मालकी व ताब्यातील खालील वर्णनाची शेत मालमत्तेची थेट खरेदी करीत आहेत.

**मालमत्तेचे वर्णन -** नोंदणी पोट तुकडी भातकुली ग्रामीण विभाग कचेरीचे कक्षेतील व जिल्हा परिषद अमरावतीचे हद्दीतील ग्रा.पं. असलेले **मौजे खल्लार बा.**, ता. भातकुली जि. अमरावती येथील शेत भूमापन व उपविभाग क्रमांक १७१ अंतर्गत एकूण क्षेत्र १ हे ६६ आर (पोटखराब ०.०७.००) लिहून देणार यांचे स्वतंत्र मालकी हक्क व ताब्यातील भोगवटदार वर्ग-१ व आ.रु.७.५०पै. असलेली शेतजमीन यातील झाडाझुडपासह व तसेच इतर तदंगभुतवस्तूसह,

**ज्याची चर्तुसिमा : पुर्वेस** -अनिल शिरभाते व राजेश मिश्रा यांचे शेत
**पश्चिमेस -**पियुष गजानन थोरात यांचे शेत
**उत्तरेस** -शासकीय इ क्लास जमीन
**दक्षिणेस -**खल्लार ते गणोरी रोड

माझे पक्षकार हे सदहू शेतमालमत्तेची लवकरच रीतसर थेट खरेदी करणार असून त्यावर कोणाचे कर्ज, गहाण, बोजा, वारसा, हक्क, कूळ, ताबा, दत्तक, दान, लीज, बक्षीस, करारमदार वा इतर हितसंबंध असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून खालील पत्यावर लेखी पुराव्यासह **१५ दिवसांचे आत** संपर्क करावा असे न झाल्यास संबधित शेत मालमत्तेचे संदर्भात कोणाचेही काही म्हणणे नाही असे समजून रीतसर थेट खरेदी प्रक्रिया केली जाईलव तसेच त्यानंतर कोणाचीही कोणतीही उजर अथवा हरकत चालणार नाही, सबब जाहीर नोटीस दिली आहे.

**ॲड. गजेंद्र एस. हिंगणकर**
२० अ, अनुप्रभा, विठ्ठलनगर शिवाजी मार्ग
(अकोली रोड) साईनगर, अमरावती
संपर्क - ९८२२२६३११०

---

### तहसिलदार मोर्शी यांचे कार्यालय

क्र. रामाक्र/१७७/एमआरसी-८१/अंबाडा/२०२५-२०२६

## जाहीरनामा

या कार्यालयाचे ज्ञापनाद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार **बाळकृष्ण लक्ष्मणराव हिवराळे** यांनी त्यांचे जन्माची नोंद ग्रामपंचायत **अंबाडा** ला करण्याचा आदेश मिळण्याबाबत या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे. त्यांनी अर्जासोबत ग्रामपंचायत निबंधक, ग्रा.पं. **अंबाडा** येथील जन्म/मृत्यू नोंदवही अनुपलब्धता प्रमाणपत्र व इतर अनुषंगीक पुरावे दाखल केले आहेत. तसेच ग्रामपंचायत कार्यालय **अंबाडा** येथे स्वतःचे जन्म दिनांक **१५.०६.१९६७** रोजीचे जन्माची नोंद घेण्याकरीता आदेश मिळण्याबाबत विनंती केली आहे.

त्याअर्थी प्रकरणात ज्या कोणास आक्षेव वा हरकती घ्यावयाच्या असेल त्यांनी सदर जाहीरनामा प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांचे आत लेखी स्वरुपात आक्षेप वा हरकती दाखल कराव्या. दिलेल्या मुदतीनंतर आलेल्या आक्षेपांचा वा हरकतीचा विचार करण्यात येणार नाही, याची नोंद घ्यावी.

शिक्का

**स्वा/-**
**तहसीलदार, मोर्शी**

---

सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती
२ रा मजला, मालटेकडी समोर, टोपेनगर, गृहनिर्माण भवन अमरावती, अमरावती

## चौकशीची जाहीर नोटीस

फेरफार अहवाल/अर्ज क्र. 907/2025/ कलम -22
सार्वजनिक न्यासाचे नांव व **विदर्भ लोकसेवा समिती, अचलपूर, जि. अमरावती,**
नोंदणी क्रमांक **एफ-५२०५**
बाबत अर्जदार - **श्री.प्रदीप विठ्ठलराव पांडे**
**गैरअर्जदार -** **१. श्री.रुपराव नारायणराव पारधी**
**२. श्री.रविंद्र उत्तमराव बनसोड**

सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सहायक धर्मादाय आयुक्त-०१, अमरावती विभाग, अमरावती हे वर नमुद केलेल्या फेरफार अहवाल/अर्जासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम २२ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत--

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व मा.सहायक धर्मादाय आयुक्त-०१, अमरावती यांचे कार्यालयाचे शिक्क्यानिशी आज दिनांक २३.०२.२०२६ रोजी दिली.

शिक्का

**अधीक्षक,**
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
अमरावती विभाग, अमरावती

---

### दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,
### वि.श्री.एस.एस.भिंगारदेव, ८ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.४४९/२०२६
**श्री.विक्रम अधिक तीन -वि- निरंक**
पुढील ता.२०.०४.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. Smt.Vikram Narendra Bokey, Age 69 Yrs. Occu.: Agriculturist R/o Flat No.601, Amar Ambience, B-Building, Empress Garden Nr.Sopan Baug, Ghorpadi, Pune-411001
2. Raginee Rajesh Shinde, Age 67 Yrs. Occu.: Business R/o Behind Krome Showroom, 42st Paticks Town, Solapur Road, Pune-411013
3. Rohani Ashok Patil, Age 62 Yrs. Occu.: Medical Practitioner R/o Flat No.602, Amar Ambience, B-Building, Empress Garden Nr.Sopan Baug, Ghorpadi, Pune-411001
4. Padmini Bharat Sundaram, Age 54 Yrs. Occu.: Business R/o Flat No.402, Building-G, Florentine Co-Op.Housing Society, S.No.60/A, Nr.Sopan Baug, Ghorpadi, Gaon, Pune-411001

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **मृतक चंद्रप्रभा नरेंद्र बोके** हे दिनांक 14.11.2023 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **विक्रम अधिक तीन विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **विक्रम अधिक तीन विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **१६.०३.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

## जाहीर नोटीस

**विद्यमान न्यायाधीश साहेब (क.स्तर), मोर्शी यांचे न्यायालयात**

आर.एम.जे.सी.क्र.१३०/२०२६ ने.ता.३०.०३.२०२६

**अर्जदार -** १. हकीमाबी नुरुल्लाह खान
२. झफरुल्लाह खान नुरुल्लाह खान

-- विरुध्द --

**गैरअर्जदार-निरंक**

वरील अर्जदारांनी विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात वारसाचे पमाणपत्र मिळण्याबाबत **सेक्शन-२, बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट-८, १८२७** प्रमाणे प्रकरण दाखल केलेले आहे. अर्जदाराप्रमाणे अर्जदार नं.१ व २ हे मयत **हकीनाबी नुरुल्लाह खान** यांचे वारस आहेत. मयत **हकीनाबी नुरुल्लाह खान** यांचे दि.**१२.०९.२०२५** रोजी रिध्दपूर, ता.मोर्शी, जि.अमरावती येथे मयत झाले. मयत **हकीनाबी नुरुल्लाह खान** यांच्या मृत्यूनंतर त्यांचे वारस हे वरीलप्रमाणे आहेत. तसेच मयताचे नावे असलेल्या शासकीय व निमशासकीय अभिलेखात नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदरचे प्रकरण दाखल केलेले आहे. मयताला वरील अर्जदाराशिवाय ईतर कोणीही वारस नाही. तेव्हा या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, जर कुणालाही सदर अर्जदारांचे प्रकरणावर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एका महिन्याचे आत विद्यमान न्यायालयात आपला लेखी आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणालाही आक्षेप नाही असे समजून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

दिनांक /०३/२०२६

शिक्का

आदेशानुसार,
**सहाय्यक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय, मोर्शी

---

प्रोसेस क. १४८२/२०२६

## जाहीर नोटीस
### अमरावती येचील विद्यमान जिल्हा व सत्र न्यायाधिश ६. यांचे न्यायालय

किरकोळ दिवाणी अर्ज क. ५२/२०२६ ने. ता. ०८/०४/२०२६

**Applicant :-1. SANOBAR KHAN MOHAMMAD SALMAN** Age 44 years, Occu. Household R/o. Sagar Nagar, Beside Saraswati Mill, Chaprasi Pura, Camp, Amravati

**- Versus - Respondent:-Nill**

**APPLICATION UNDER SECTION 7 AND 8 FOR APPONTING THE APPLICANT AS GUARDIAN OF MINOR AND UNDER SECTION 29 OF GUARDIANS AND WARDS ACT FOR GRANT OF PERMISSION TO SELL THE PROPERTY STANDING IN THE NAME OF MINOR.**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी अज्ञान पाल्याच्या नावे असलेली खालील वर्णनाची मालमत्ता ट्रान्सफर करण्याची परवानगी मिळण्याकरीता विः जिल्हा व सत्र न्यायाधिश ६. अमरावत्ती यांच्या न्यायालयात रितसर अर्ज सादर केला आहे.

**Property Description** -Within the jurisdiction of Amravati City Sub- registrar office and Amravati Municipal Corporation, field Gut No. 378 Upa-vibhag No. 123/2 at Mauje- Revsa, Pragane- Nandgaon Peth, To. And Dist. Amravati, admeasuring total area of 1 H 59 R., including the Pot Kharab land 0.H. 15 R., Out of which part of western side as per the divided/ partition of Northern and Southern having admeasuring total area of 0 H. 50R, including the Pot Kharab land 0 H. 05 R having boundaries as under:
Toward East: Abdul Rahim Mohammad Luqman Field
Roward West:- Mohd Noman Mohammad Luqman Field
Toward North :- Walgaon to Revsa Road
Toward South: Mauje Sultanpur, Shegaon Survey No.47

त्या अर्थी सदर अर्जाविरुध्द कारण दाखविण्यास अगर काही हरकती घ्यावयाची असल्यास अर्जदाराचे सर्व नातलग व हितसंबंधी यांना जाहिर नोटीस व्दारे कळविण्यात येते की, त्यांनी दिनांक ०८-०४-२०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता वि. जिल्हा व सत्र न्यायाधिश-६, अमरावती यांचे न्यायालयात स्वतः किंवा रितसर निर्दीष्टकेलेल्या वकीलांमार्फत हजर व्हावे, वर नमुद केलेल्या तारखेस जर कोणीही हजर न झाल्यास सदहू अर्जाची एकतर्फी सुनावणी होवून निकाल दिला जाईल.आज दिनांक /३/२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी प्रसिध्दीकरिता दिला आहे.

**आदेशानुसार,**

शिक्का

**(न्यायीक विभाग) जिल्हा व सत्र न्यायालय, अमरावती**

---

### दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,
### वि.श्री.आर.आर.खामतकर, ५ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.४१०/२०२६
**संध्या अधिक दोन -वि- निरंक**
पुढील ता.०६.०४.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. Sau.Sandhya Vilasrao Mathane, Age 59 Yrs. Occu.: Homemaker R/o W/o Vilasrao Mathane, Behind Krushna Krupa Building, Ganesh Colony, H.V.P.M. H.V.Nagar, Amravati
2. Ku.Payal Vilas Mathane @ Sau.Payal Aditya Pandhare, Age 32 Yrs. Occu.: Pvt. Job R/o D/o Vilasrao D.Mathane, Behind Krushnkrupa Building, Ganesh Colony, Main Road, Amravati
3. Ku.Trupti Vilasrao Mathane @ Sau.Trupti Sanket Vinchurkar, R/o Permanent Address : D/o Vilasrao D.Mathane, Ganesh Colony, Main Road, Amravati

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **मृतक विलास देविदासपंत माथने** हे दिनांक 04.12.2023 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **सौ.संध्या विलासराव माथने अधिक दोन** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **सौ.संध्या विलासराव माथने अधिक दोन** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **१२.०३.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

### तहसिलदार मोर्शी यांचे कार्यालय

क्र. रामाक्र/१८१/एमआरसी-८१/अंबाडा/२०२५-२०२६

## जाहीरनामा

या कार्यालयाचे ज्ञापनाद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार **शमा परवीन शेख शब्बीर** यांनी त्यांचे जन्माची नोंद ग्रामपंचायत **अंबाडा** ला करण्याचा आदेश मिळण्याबाबत या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे. त्यांनी अर्जासोबत ग्रामपंचायत निबंधक, ग्रा.पं. **अंबाडा** येथील जन्म/मृत्यू नोंदवही अनुपलब्धता प्रमाणपत्र व इतर अनुषंगीक पुरावे दाखल केले आहेत. तसेच ग्रामपंचायत कार्यालय **अंबाडा** येथे स्वतःचे जन्म दिनांक **२८.०६.१९७६** रोजीचे जन्माची नोंद घेण्याकरीता आदेश मिळण्याबाबत विनंती केली आहे.

त्याअर्थी प्रकरणात ज्या कोणास आक्षेव वा हरकती घ्यावयाच्या असेल त्यांनी सदर जाहीरनामा प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांचे आत लेखी स्वरुपात आक्षेप वा हरकती दाखल कराव्या. दिलेल्या मुदतीनंतर आलेल्या आक्षेपांचा वा हरकतीचा विचार करण्यात येणार नाही, याची नोंद घ्यावी.

शिक्का

**स्वा/-**
**तहसीलदार, मोर्शी**

---

### दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,
### वि.श्री.एस.बी.कळदाते, २ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.५०७/२०२६
**राहुल व ईतर -वि- निरंक**
पुढील ता.२३.०४.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. Rahul Ganesh Dahake, Age 39 Yrs. Occu.: Labour R/o Haridas Peth, New Town, Badnera Amdapur, Dist.Amravati
2. Durgesh Ganesh Dahake, Age 35 Yrs. Occu.: Labour R/o Haridas Peth, New Town, Badnera Amdapur, Dist.Amravati
3. Manjusha Mukesh Bhandari, Age 41 Yrs. Occu.: Household R/o Near Datta Temple, Sadiccha Nagar, Dhule Behind Govt.Dhud Dairy Dhule
4. Tanuja Ravi Kamalkar, Age 37 Yrs. Occu.: Household R/o Near Ganpati Mandir, Purna Parbhani Purna Maharashtra.

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **मृतक गणेश चंदुलाल डहाके आणि रजनी गणेश डहाके** हे अनुक्रमे दिनांक 28.08.2022 व 13.08.2020 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **राहुल व ईतर विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **राहुल व ईतर विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **१३.०३.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

### दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,
### वि.श्रीमती एन.सी.सोरटे, ७ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.५०५/२०२६
**श्रीमती संगीता अधिक तीन -वि- निरंक**
पुढील ता.१७.०४.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. Sangita Mandanrao Marodkar, Age 54 Yrs. Occu.: Household R/o Bhaji Bazar Road, Dahisath, Tq. Dist. Amravati
2. Sau.Manali Nileshrao Guhe, (@ Manali Mandanrao Marodkar) Age 32 Yrs. Occu.: Service R/o Devinagar, Wadali, Amravati.
3. Sau.Pooja Sagar Muratkar (@ Pooja Madan Marodkar) Age 31 Yrs. Occu.: Household R/o Malipura, Kholapurigate, Amravati
4. Sau.Radhika Suraj Bute (@ Radhika Mandan Marodkar) Age 28 Yrs. Occu.: Household R/o Tope Nagar, Tq. Dist. Amravati.

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **मृतक मदन कृष्णराव मरोडकर** हे दिनांक 27.05.2025 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **संगीता अधिक तीन विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **संगीता अधिक तीन विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **१६.०३.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

# वाहतूक नियम मोडणाऱ्यांवर कारवाई; ५४५ जणांना दंड

**अमरावती/प्रतिनिधीः-** सण-उत्सवांच्या पार्श्वभूमीवर अपघात टाळण्यासाठी अमरावती ग्रामीण पोलिसांनी वाहतूक नियम मोडणाऱ्या वाहनचालकांवर कारवाई केली. या मोहिमेत एकूण ५४५ जणांवर गुन्हे दाखल करण्यात आले.

१७ मार्च रोजी अचलपूर, परतवाडा आणि परिसरातील विविध ठिकाणी ही मोहीम राबविण्यात आली. यामध्ये अवैध प्रवासी वाहतूक करणाऱ्या १८ वाहनांवर कारवाई करण्यात आली. तसेच हेल्मेट न घालणे, ट्रिपल सीट प्रवास, सीट बेल्ट न लावणे, नो-पार्किंगमध्ये वाहन उभे करणे आणि मालवाहू वाहनांत मजूर वाहतूक करणे अशा प्रकारच्या नियमभंगांवर दंड करण्यात आला.

या कारवाईतून १ लाख ५८ हजार १०० रुपयांचा दंड वसूल करण्यात आला. काही प्रकरणांमध्ये अधिक दंड आकारण्याची प्रक्रिया सुरू आहे. पोलीस अधीक्षक विशाल आनंद यांच्या आदेशानुसार ही कारवाई करण्यात आली.

---

## पाहिजे

अमरावती, अचलपूर व वरूड येथे नामांकित लॉ फर्म मध्ये युवक व युवतींना पार्ट टाईम काम करण्याची संधी.
शिक्षण- १२ वी पास
पगार- १०,००० + टिए डिए + कमीशन (ट्रेनिंग झाल्यावर पगार वाढ व ईतर इन्क्रिमेंट्स)
**संपर्क -**
**९६०७५८२०९४**

---

### दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,
### वि.श्रीमती एन.सी.सोरटे, ७ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.३४८/२०२६
**श्रीमती वंदना अधिक दोन -वि- निरंक**
पुढील ता.०१.०४.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. Smt.Vandana Ravindra Ingale, Age 51 Yrs. Occu.: House work
2. Prashant Ravindra Ingale, Age 26 Yrs. Occu.: Agriculturist
3. Shri Anuj Ravindra Ingale, Age 21 Yrs. Occu.: Agriculturist
All R/o Pusda, Tq.Dist. Amravati.

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **मृतक रविंद्र रामराव इंगळे** हे दिनांक 07.07.2013 रोजी **पुसदा, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **वंदना अधिक दोन विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **वंदना अधिक दोन विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **२७.०२.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, अमरावती

---

### तहसिलदार मोर्शी यांचे कार्यालय

क्र. रामाक्र/४१/एमआरसी-८१/अंबाडा/२०२५-२०२६

## जाहीरनामा

या कार्यालयाचे ज्ञापनाद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार **साबीर खाँ इब्राहीम खाँ** यांनी त्यांचे जन्माची नोंद ग्रामपंचायत **अंबाडा** ला करण्याचा आदेश मिळण्याबाबत या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे. त्यांनी अर्जासोबत ग्रामपंचायत निबंधक, ग्रा.पं. **अंबाडा** येथील जन्म/मृत्यू नोंदवही अनुपलब्धता प्रमाणपत्र व इतर अनुषंगीक पुरावे दाखल केले आहेत. तसेच ग्रामपंचायत कार्यालय **अंबाडा** येथे स्वतःचे जन्म दिनांक **०४.०८.१९८१** रोजीचे जन्माची नोंद घेण्याकरीता आदेश मिळण्याबाबत विनंती केली आहे.

त्याअर्थी प्रकरणात ज्या कोणास आक्षेव वा हरकती घ्यावयाच्या असेल त्यांनी सदर जाहीरनामा प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांचे आत लेखी स्वरुपात आक्षेप वा हरकती दाखल कराव्या. दिलेल्या मुदतीनंतर आलेल्या आक्षेपांचा वा हरकतीचा विचार करण्यात येणार नाही, याची नोंद घ्यावी.

शिक्का

**स्वा/-**
**तहसीलदार, मोर्शी**

---

### दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,
### वि.श्री.एस.बी.कळदाते, २ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.५०८/२०२६
**लता व ईतर -वि- निरंक**
पुढील ता.२३.०४.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. Lata Lalchand Jaysinghani, Age 64 Yrs. Occu.: Household R/o Galli No.2, Krishna Nagar, Shivaji Nagar, Amravati
2. Lalchand Jetaram Jaysingani, Age 61 Yrs. Occu.: Pvt.Job R/o Bajaj Dharmshala ke pass, Prishna Nagar,Shivaji Nagar, Amt.
3. Roshan Lalchand Jaysinghani, Age 38 Yrs. Occu.: Pvt.Job R/o Galli No.2, Krishna Nagar, Shivaji Nagar, Amravati
4. Vakilsingh Lalchand Jaisinghani, Age 35 Yrs. Occu.: Pvt.Job R/o Infront of Bajaj Bekri Krishna Nagar, Galli No.2, Shivaji Nagar, Amravati
5. Kishan Lalchand Jaysinghani, Age 34 Yrs. Occu.: Pvt.Job R/o Galli No.2, Krishna Nagar, Shivaji Nagar, Amravati

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **मृतक राकेश लालचंद जयसिंगानी** हे दिनांक 31.08.2018 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **लता व ईतर विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **लता व ईतर विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **१३.०३.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

### दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,
### वि.श्री.एस.एस.भिंगारदेव, ८ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.३१४/२०२६
**श्रीमती रेखा अधिक दोन -वि- निरंक**
पुढील ता.०७.०४.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. Rekha Ramakant Nakade, Age 60 Yrs. Occu.: Household R/o Ram Mohan Nagar, V.M.V. Amravati.
2. Shrikant Ramakant Nakade, Age 38 Yrs. Occu.: Service R/o Near Mahakali Provision, RamMohan Nagar, VMV, Amravati
3. Sonali Pankaj Dhonde, Age 36 Yrs. Occu.: Household R/o Near Jawahar Nagar, Sanket Colony, V.M.V. Amravati

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **मृतक रमाकांत विठ्ठलराव नाकाडे** हे दिनांक 20.12.2025 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **रेखा अधिक दोन विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **रेखा अधिक दोन विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **२०.०२.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

# एक्सप्रेस हायवे 'ड्रंक अ‍ॅण्ड ड्राइव्ह' अपघात प्रकरणी कठोर कारवाईची मागणी

## विदर्भ खाटीक समासेवा समितीचे पोलीस आयुक्तांना निवेदन



**अमरावती/का.प्र.**
रविवार १५ मार्च रोजी सुपर हायवे वरील आनंद मार्बल येथे झालेल्या अपघातात वडील व मुलीचा मृत्यू झाला असून या सर्व प्रकरणी 'ड्रंक अ‍ॅण्ड ड्राइव्ह' आणि 'हिट अ‍ॅण्ड रन' अन्वये गुन्हा दाखल करण्यात यावा अशी मागणी विदर्भ खाटीक समासेवा समिती व मृतक गजानन माकोडे यांच्या पत्नी कविता माकोडे यांनी पोलीस आयुक्तांना सादर केलेल्या निवेदनात केली आहे. या अपघातात गजानन श्रीराम माकोडे (वय ५२, रा. जनता कॉलनी-१, अमरावती) आणि सपना गजानन माकोडे (वय २४) यांचा मृत्यू झाला. यासोबतच गजानन माकोडे यांची दुसरी मुलगी प्रियांका (वय २२) ही गंभीर जखमी असून तिच्या पायावर व डोक्यावर शस्त्रक्रिया करण्यात आलेली असून तिच्यावर खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहे.गजानन माकोडे हे कुटुंबातील कर्ता पुरूष होते. पत्नी, तीन मुली आणि एक मुलगा असे कुटुंब आहे.त्यांच्या दोन्ही मुली अनुक्रमे सपना आणि प्रियांका या जेमतेम शिक्षण घेऊन पुणे येथे खासगी कंपनीत काम करून कुटुंबाला आर्थिक आधार देत होत्या.

सपना ही पुणे येथे परतण्यासाठी रविवारी १५ मार्च रोजी रात्री ११.४५ ते १२ वाजताच्या सुमारास ट्रॅव्हल्स प्वाईंटवर (क्रिष्णा मार्बल) जात असताना व त्यासाठी एक्सप्रेस हायवे ओलांडत असताना अचानक वायुगतीने आलेल्या एसयूव्ही कारने (सीजे ०४ एनव्ही ७००५) त्यांना बेदरकारपणे धडक देऊन दूर अंतरापर्यंत फरफटत नेले. घटनेच्यावेळी कारमध्ये तीन ते चार युवक होते.

शिवाय गाडीत दारूच्या बॉटल होत्या.

ते सर्वच मद्यधुंद घटनास्थळावरून पसार झाले. या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करावी तसेच प्रकरणाशी संबंधित कायद्यासमोर उभे करावे अशी मागणी विदर्भ खाटीक समाजसेवा समितीने पोलीस आयुक्तांकडे केली आहे.

सदर प्रकरणी सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करावा, ड्रंक अ‍ॅण्ड ड्राईव्ह तसेच हिट अ‍ॅण्ड रन संदर्भातील कलमांचा गुन्ह्यात समावेश करावा, वाहन मालकाला सहआरोपी करावे, खऱ्या गुन्हेगारांचा शोध घेण्यासाठी वाहनमालकाच्या घरापासून तसेच नागपूर टी प्वाईंट ते बेलोरा टी प्वाईंट यादरम्यानचे सीसीटीव्ही फुटेज तपासण्यात यावेत, संबंधित प्रकरणात अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा नोंदविण्यात यावा, प्रकरणाचा तपास राजापेठ पोलिसांऐवजी सहायक पोलीस आयुक्तांकडे सोपविण्यात यावा, आपदग्रस्त कुटुंबातील एका सदस्याला शासकीय नोकरीत सामावून घेण्यात यावे, आपदग्रस्त कुटुंबाला शासनाकडून दोन कोटी रुपयांची आर्थिक मदत मिळवून देण्यात यावी आदी मागण्या निवेदनातून केल्या आहे.

## संक्षिप्त

### मालती चांदूरकर यांच्या आनंददायी प्रतिबिंब पुस्तकाचे प्रकाशन

**अमरावती** - नामांकित कवियत्री तथा संत साहित्यावर लिखाण करणाऱ्या सामाजिक कार्यकर्त्या मालती पंजाबराव चांदुरकर यांच्या आनंददायी प्रतिबिंब ह्या तिसऱ्या काव्यसंग्रहाचे प्रकाशन श्रीकृष्ण मंदिर माता खिडकी अमरावती येथील सभागृहात उत्साहात पार पडले. सूत्रपाठातील उद्धरण या प्रकरणावर प. पु. म. श्री महानुभाव पुजदेकर बाबा, घोटी जिल्हा नाशिक यांचे वाणीतून ब्रह्मविद्या निरूपण सोहळ्याच्या समारोपाचे कार्यक्रमात करण्यात आले.यावेळी प्रमुख अतिथी व मार्गदर्शक म्हणून ट्रस्टचे उपाध्यक्ष डॉ. अशोक राऊत, सचिव अ‍ॅड अरुण ठाकरे, कोषाध्यक्ष इंजी. एस. पी. देशमुख, सुशांत सर्जन, अनिल सहानी, रावसाहेब राऊत, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या व्यवस्थापन समितीचे सदस्य प्रा. डॉ. भैय्यासाहेब मेटकर, समाजसेवक प्रा श्रीकृष्ण बनसोड, नितीन देशमुख, शैलजा संजय चांदुरकर, स्वाभिमानी श्रमिक पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष संजय सरवटकर, ग्रामीण जिल्हा कार्याध्यक्ष वि.दा.पवार यांचे सह मोठ्या संख्येने महानुभव संप्रदायातील बंधू भगिनी उपस्थित होते. सदर कार्यक्रमाला श्रीकृष्ण मंदिर देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष सुभाष दादा पावडे, रिद्धपूरचे प.पू म श्री योगीराज बाबा दर्यापूरकर व मान्यवरांचे विशेष सहकार्य लाभले.

### रुद्र कुबडे तबलावादन परीक्षेत प्रथम

**तिवसा** - सुरवाडी येथील सदगुरू उर्फ रुद्र नितीन कुबडे याने तबलावादन परीक्षेमध्ये प्रथम क्रमांक घेऊन तालुक्यामध्ये बहुमान मिळविला.अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय मिरज मुंबई द्वारा आयोजित मध्यमा प्रथम परीक्षा घेण्यात आली होती.त्यामध्ये मनमोहक तबला वाजून रुद्र ने परीक्षकांचे लक्ष वेधून घेतले व प्रथम क्रमांक मिळविला. यासाठी त्यास



लग्गी नवाज सुप्रसिद्ध तबलावादक निलेश इंगळे यांचे अमूल्य मार्गदर्शन लाभले.आपल्या संपूर्ण यशाचे श्रेय तो गुरू निलेश इंगळे सर तसेच वडिल नितीन कुबडे, आई प्रीती नितीन कुबडे यांना देत आहे.

### आष्टी बसस्टँडवर चिंच-बोरांचा बाजार

**टाकरखेडा संभू** - भातकुली तालुक्यातील आष्टी व वायगाव बसस्टँड परिसरात सध्या चिंच व बोरांच्या विक्रीचा हंगाम सुरू झाला आहे. ग्रामीण भागातील कष्टकरी महिला-पुरुष भर उन्हात चिंचा व बोरं गोळा करून रस्त्यालगत स्टॉल लावून विक्री करताना दिसत आहेत. कुटुंबाचा उदरनिर्वाह चालविण्यासाठी



सुरू असलेली त्यांची ही धडपड लक्ष वेधून घेत आहे.आष्टी बसस्टँड परिसरात साधारण चार ते पाच तर वायगाव बसस्टँड परिसरात पाच ते दहा छोटे स्टॉल लावले जातात. ग्रामीण भागातील शेतांच्या धुऱ्यांवर तसेच रस्त्यालगत असलेल्या चिंचेच्या व बोरीच्या झाडांवरून फळे गोळा करून ती विक्रीसाठी आणली जातात. सध्या उन्हाचा कडाका वाढला असला तरी कष्टकरी महिला-पुरुष दिवसभर उन्हात बसून विक्री करताना दिसत आहेत.चिंचेच्या झाडातून हजारो रुपयांचे उत्पन्न शेतकऱ्यांकडून १० ते १५ हजार रुपयांत चिंचेचे झाड विकत घेतले जाते. दररोज सुमारे ३० ते ४० किलो चिंचा विक्रीसाठी आणल्या जात असून त्यांना ५० ते ६० रुपये किलो दर मिळतो. त्यातून दिवसाकाठी सुमारे एक ते दोन हजार रुपये उत्पन्न मिळते. तसेच वाळलेली बोरंही विक्रीसाठी आणली जात असून त्यांना ४० ते ६० रुपये दर मिळतो. या कामात कुटुंबातील सदस्यही मदत करतात, अशी माहिती विक्रेते सुनील देविदास खर्चान व देविदास महादेव खर्चान, सतीश आठवले यांनी दिली.

### आजपासून श्रीराम नवमी उत्सव

**टाकरखेडा संभू** -भातकुली तालुक्यातील टाकरखेडा संभू येथील श्रीराम मंदिर संस्थानतर्फे राम नवमी निमित्त भव्य उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. १९ ते २६ मार्च २०२६ या कालावधीत विविध धार्मिक, सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमांची रेलचेल पाहायला मिळणार आहे.उत्सवाची सुरुवात गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर श्रीराम अभिषेक, पूजन, काकडा आरती, तिर्थस्थापना व ध्वजारोहणाने होणार आहे. त्यानंतर दररोज श्रीरामचरितमानस पारायण, विविध भजन मंडळांचे सादरीकरण, आरती तसेच भारूड, कीर्तन यांसारखे कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. २६ मार्च रोजी राम जन्मोत्सव मोठ्या उत्साहात साजरा केला जाणार असून दुपारी १२ वाजता श्रीराम जन्म सोहळा, कीर्तन, गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार आणि त्यानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.तसेच या काळात सर्वरोग निदान व उपचार शिबिराचे आयोजन करून ग्रामस्थांना आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्यात येणार आहे.या सर्व कार्यक्रमांना परिसरातील नागरिकांनी उपस्थित राहावे.

## माध्यमिक व प्राथमिक विभागात शाळांच्या वेळेबाबत मतभेद

**अमरावती/का.प्र.**
अमरावती जिल्हातील माध्यमिक व प्राथमिक शाळा उन्हाचा पारा वाढल्यामुळे सकाळ पाळीत घेण्याची मागणी शिक्षक संघटनांनी शिक्षणाधिकारी यांना निवेदन देऊन केली होती.पण उन्हाचा पारा ४२च्यावर गेला तरी जिल्हातील शाळांच्या वेळेत बदल केला नव्हता.पण पालकांचा व लोकप्रतिनिधी आणि शिक्षक संघटना यांची रेटा वाढल्यामुळे अखेल प्रथम माध्यमिक शिक्षणाधिकारी यांनी पत्र काढून जिल्हातील माध्यमिक शाळा सकाळ पाळीत १६मार्च पासुन घेण्याचे आदेश शाळांना दिले होते आणि शाळेची वेळ सकाळी ७ते११अशी निर्धारीत केली होती.पण प्राथमिक विभागाचे पत्र न निघाल्यामुळे प्राथमिक शिक्षण विभागावर समाजातुन रोष व्यक्त होत होता.



अखेर आज प्राथमिक शिक्षण विभागाचे आदेश निर्गमित झाले असुन या आदेशात लहान मुलांची शाळा सकाळी ७.१५ते१२.१५ या वेळेत २०मार्च पासुन भरणार आहे.

हा प्राथमिक शाळेतील विद्यार्थावर अन्याय आहे.म्हणजे अमरावती जिल्हा परीषद मधिल माध्यमिक व प्राथमिक शाळा भरण्याच्या वेळेत तालमेळ दिसत नाही.

अतिशय भोगळ कारभार शिक्षण विभागाचा दिसत आहे.

जिल्हातील सर्व प्राथमिक, माध्यमिक शाळांची वेळ एकच असली पाहीजे.

जिल्हातील तापमानाचा विचार करता शाळांची वेळ सकाळी ७ते११अशीच असायला पाहीजे.या शाळांच्या वेळेबाबत शिक्षक संघटना यांनी तिव्र नापसंती व्यक्त केली आहे.

म्हणुन प्राथमिक शिक्षण विभागाने सुधारीत आदेश काढुन शाळांच्या वेळेत बदल करावा अशी मागणी जोर धरत आहे.

## आजपासून आदिमाता शक्ती प्रतिष्ठान चैत्र नवरात्र उत्सव

**धामणगाव रेल्वे / वार्ताहर**
चैत्र नवरात्र उत्सव १९ ते २८ मार्च २०२६ (गुरुवार, चैत्र शुद्ध प्रतिपदा ते शनिवार, चैत्र शुद्ध दशमी) स्त्रिपुरा त्रिशक्ती पीठ, आदिमाता शक्ती प्रतिष्ठान, विरुळ रोंघे, ता. धामणगाव रेल्वे, येथे चैत्र नवरात्र उत्सवाचे आयोजन करण्यात आलेले आहे.नवरात्र उत्सव गुरुवार प्रतिपदेला पहाटे ६.४५ ला आरती महाअभिषेक व सकाळी ८ ते दुपारी २ पर्यंत महाभिषेक तसेच सायंकाळी ५ ते ७ घटस्थापना व



आरती २० मार्च शुक्रवार ला पहाटे ६.४५ आरती सकाळी अभिषेक २१ मार्च शनिवार ला पहाटे आरती त्यानंतर दुपारी अकरा वाजता श्री आईची बैठक दुपारी तीन ते सहा भजन आणि सायंकाळी आरती २२ मार्च रविवारला शनिवार प्रमाणेच कार्यक्रम राहणार असून २३ मार्च सोमवारला सुद्धा आरती अभिषेक आईची बैठक सप्तशती पाठ सायंकाळची आरती आणि भजन आयोजित करण्यात आलेले आहे त्याचप्रमाणे २४ मार्च मंगळवार ला पहाटे ६.४५आरती, श्री आईची बैठक भजन व सायंकाळी ६.४५ ते ७.४५आरती व ध्यान साधना २५ मार्च बुधवारी पहाटे ६.४५, श्री आईची बैठक सायंकाळी ६.४५ आरती व महाअभिषेक होणार आहे.२६ मार्च गुरुवारी १००१ पानांचे तांबूल प्रसाद कांडन, सायंकाळी ७.३० ते ११.३० महायज्ञ व रात्री साडेअकरा वाजता महाआरती व अष्टमी विशेष सोहळा आणि श्री आईचे विविध रूप दर्शन सोहळा होणार आहे

## आर्थिकदृष्ट्या नूतन वर्ष, देशाला कसोटीचे

### पाऊस बेताचा, पण पिके चांगली येणार, पंचांग शास्त्राचा अंदाज

**चांदूरबाजार / प्रतिनिधी**
आज गुढीपाडव्या पासून, शके १९४८ पराभव नाम संवत्सराला सुरवात झाली आहे.या वर्षातील ग्रहांच्या स्थिती नुसार, पंचांग शास्त्राने वर्षभराचा अंदाज मांडला आहे.नूतन वर्ष गुरूवारी सुरू होत असल्याने, बुध्दीजीवी व धार्मिक प्रवृत्तीच्या वर्गास हे वर्ष अनुकूल आहे.मागिल वर्षी पेक्षा यावर्षी पाऊस बेताचा च असला तरी, शेतमालाचे उत्पादन अर्थात पिके चांगली येतील.तरी ही आंतरराष्ट्रीय परिस्थितीचा विचार करता, आर्थिकदृष्ट्या हे नूतन वर्ष देशाला कसोटीचे जाणार आहे.असा अंदाज पंचांग शास्त्राने वर्तविला आहे.

या नूतन वर्षात राष्ट्रीय स्तरावर आर्थिक अडवणूक, दावे प्रती दावे व आंतरराष्ट्रीय परिस्थितीचा अर्थव्यवस्थेवर थोडा परिणाम जाणवेल.वर्षभर हा त्रास जाणवणार आहे.त्यानंतर परिस्थिती निवळेल.नविन संवत्सरात परराष्ट्रांशी संबंध सुधारुन, देशाच्या आत्म सन्मानात वाढ होईल. आंतरराष्ट्रीय बाजार पेठेचे दृष्टीने, व्यापार वाढविण्याचे पूरेपूर प्रयत्न या वर्षात होतील.अवकाश क्षेत्रात ही शास्त्रज्ञांनकडून नेत्रदीपक प्रगती होईल.सामाजिक क्षेत्रात कुटुंबसंस्था टिकविण्याचे प्रयत्न केले जातील.में महिन्याचे शेवटी, बरेच भागात पावसाचे आगमन होण्याची शक्यता दिसून येते.पावसासाठी मृग व आद्रा नक्षत्रे बरीच आशादायक आहेत.त्यामुळे जून चे शेवटी, पेरण्या होण्याची शक्यता दिसून येते.

पुढे ऑगस्ट महिन्यात एक उघाड जाऊन, सप्टेंबर मध्ये पुन्हा मध्यम वृष्टीचे योग आहेत.यावर्षी सोयाबीन, सूर्यफूल व तंबाखू ही पिके ६० पैसे होण्याचा अंदाज आहे.बाकी ईतर सर्व पिके ६५ ते ७५ पैसे इतकी होण्याचा अंदाज दिसून येतो.तसेच फळे, भाजीपाला व इतर बागायती पिके ही, चांगली येण्याचा अंदाज वर्तविण्यात आला आहे हा सर्व ग्रह - तार्यांच्या स्थितीवर अवलंबून, पंचांग शास्त्राने वर्तविलेला अंदाज आहे.कधी काळी प्रत्यक्षात स्थिती, यापेक्षा वेगळी असण्याची शक्यता नाकारता येत नाही.

## पहिले शोधले सरपण, नंतर लग्नातील वऱ्हाडाचे भोजन

**सिलिंडरअभावी आचाऱ्यांनी पेटविल्या लाकडाच्या भट्टया**

**आसेगाव पूर्णा/ वार्ताहर**
परिसरात सुरू असलेल्या गॅस सिलिंडर टंचाईचा फटका आता थेट लग्नसमारंभांनाही बसला आहे. आसेगाव पूर्णा येथील एका मंगल कार्यालयात पार पडणाऱ्या एका लग्नसोहळ्यात स्वयंपाका साठी गॅस सिलिंडर उपलब्ध न झाल्याने वधूपक्षाची मोठी गैरसोय झाल्याचे दिसून आले.

नजीकच्या सावळी येथील वधूकडील मंडळींनी वराड व पाहुण्यांच्या जेवणाची व्यवस्था करण्यासाठी सर्व तयारी केली होती. मात्र, ऐनवेळी गॅस सिलिंडर उपलब्ध न झाल्याने स्वयंपाक व्यवस्थेत अडथळा निर्माण झाला. त्यामुळे आचारींना अखेर



लाकडांचे सरपण आणून भट्टी पेटवावी व स्वयंपाक करावा लागला.या कारणामुळे स्वयंपाक उशिरा सुरू झाला असून, काही काळ पाहुण्यांनाही प्रतीक्षा करावी लागली. वधूपक्षावर पाहुण्यांसमोर पर्यायी इंधनाची व्यवस्था करण्याची नामुष्की ओढवली. लग्नासारख्या आनंदाच्या प्रसंगीही गॅस टंचाईची झळ बसल्याने उपस्थितांमध्ये नाराजी व्यक्त करण्यात आली. परिसरात निर्माण झालेल्या गॅस सिलिंडर टंचाईमुळे नागरिक व व्यावसायिक त्रस्त झाले असून, प्रशासनाने तातडीने गॅस पुरवठा सुरळीत करावा, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. लग्नसमारंभात लाकडांच्या भट्टीवर स्वयंपाक करण्याची वेळ आल्याने गॅस टंचाईची तीव्रता पुन्हा एकदा अधोरेखित झाली आहे. त्यामुळे प्रशासनाने अशा प्रसंगात सिलिंडर उपलब्ध करण्याची मागणी होत आहे.

## आज आरव्हीसीसी इस्कॉन मंदिराच्या कार्यालयाचे उद्‌घाटन

**अमरावती/ का.प्र.**
बाळकृष्ण धाम मालू सिटी रोड रेवसा परिसरातील आर. व्ही. सी. सी. इस्कॉन मंदिराच्या नवीन कार्यालयाचा उद्‌घाटन समारंभ इस्कॉन संस्थापक आचार्य ए. सी. भक्तिवेदांत स्वामी प्रभुपाद यांचे वरिष्ठ शिष्य, इस्कॉन पदयात्रा मिनिस्टर, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाद्वारे जीवन गौरव सन्मानाने पुरस्कृत, विश्वविख्यात त्रीदंड संन्यासी परम पूज्य लोकनाथ स्वामी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली आणि प्रेरणेने १९ मार्च रोजी गुढीपाडव्याच्या शुभ मुहूर्तावर मोठ्या उत्साहात आयोजित करण्यात येणार आहे.



सदर कार्यक्रमाकरिता माजी राज्य मंत्री आणि पालकमंत्री प्रवीणजी पोटे यांच्या विशेष उपस्थितीमध्ये हा उद्‌घाटन सोहळा पार पडणार आहे. त्या सोबतच वरुणजी मालू, प्रज्वलजी मालू, इस्कॉन मंदिर अध्यक्ष अद्वैताचार्य प्रभुजी, अनंतशेष प्रभुजी यांची सुद्धा उपस्थिती राहणार आहे.हा उद्‌घाटन सोहळा सकाळी ०७:०० ते १०:०० या वेळेत संपन्न होणार आहे. या उद्‌घाटन सोहळ्याच्या निमित्ताने हरिनाम संकीर्तन, भगवद्गीतेवरील प्रवचन तसेच भक्तांसाठी आध्यात्मिक मार्गदर्शनाचा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहनवीन कार्याल याच्या माध्यमातून मंदिरातील धार्मिक कार्यक्रमांचे नियोजन, भक्तांसाठी सेवा उपक्रम, युवकांसाठी मार्गदर्शन कार्यक्रम, महिलांसाठी वैष्णवी संस्कार वर्ग तसेच समाजहिताचे विविध प्रकल्प अधिक व्यापक स्वरूपात राबविण्याचा मंदिर प्रशासनाचा मानस आहे.या पवित्र उद्‌घाटन सोहळ्यासाठी परिसरातील सर्व भक्त, नागरिक आणि श्रीकृष्ण भक्तांनी उपस्थित राहून कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## असाध्य रोगावर कृषी निसर्गोपचार रामबाण उपाय - डॉ. गणेश खारकर

**अमरावती/ का.प्र.**
समाजात असंख्य नागरिक हृदयरोग, कर्करोग ,मधुमेह, यकृत, किडनी विकार, स्थूलता, वंधत्व, पाचन विकार, मूळव्याध, श्वसनासंबंधी आजार, सांधेदुखी, लैंगिक समस्याने ग्रस्त आहेत. असे असले तरी वरील सर्व असाध्य आजारावर रामबाण उपाय म्हणून कृषी निसर्गोपचार पद्धती सर्वश्रुत आहे असे प्रतिपादन मनपाचे माजी उपमहापौर तथा राष्ट्रवादी किसान मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष डॉ. गणेश खारकर यांनी केले.



राष्ट्रवादी किसान सभेचे प्रदेशाध्यक्ष अ‍ॅड.वसंत मनकर यांच्या अध्यक्षतेखाली छत्रपती शिवाजी महाराज लोक विद्यापीठाचे महासंचालक डॉ. मंगेश देशमुख, तसेच प्रेमकुमार सिकची चारिटेबल ट्रस्ट तर्फे वलगाव येथील कृषी निसर्गोपचार थेरपी शिबीरात प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.मार्गदर्शन करण्यासाठा मुंबई येथील सुप्रसिद्ध डॉक्टर प्रशांत मुळीक व त्यांचे सहकारी उपस्थित होते. प्रमुख अतिथी प्रकल्प संचालक आत्मा अर्चना निस्ताने, प्रकल्प समन्वयक कृषी विज्ञान केंद्र दुर्गापुर डॉ के पी सिंग, कृषी विज्ञान केंद्र घातखेडाचे प्रकल्प समन्वयक डॉ.अतुल कळसकर यांना राष्ट्रीय एकात्मता पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. याप्रसंगी सिकची चॅरिटेबल ट्रस्टचे विश्वस्त गजानन कडू, वृक्षसंवर्धन संस्थेचे इंजि.हरिहर बोचरे, महाराष्ट्र ग्राम दर्पणच्या सोनल बदरके, नैसर्गिक शेती तज्ञ अ‍ॅड.नरेंद्र राऊत, विदर्भ प्रदेशाध्यक्ष प्रा. जगदीश जुनगरी उपस्थित होते.राज्याच्या उपमुख्यमंत्री नामदार सुनेत्रा पवार, कृषीमंत्री ना. दत्तात्रय भरणे, कृषी सचिव विकास चंद्र रस्तोगी आयएएस यांना या कार्यक्रमाची लेखी माहिती देऊन कृषी निसर्वोपचार थेरपीला राजाश्रय म्हणून देण्यात कटिबद्ध आहे. याप्रसंगी बबन तिकांडे, डॉ.गणेश डोंगरे, प्रा.प्रवीण इचे, म. फुले लोक विद्यापिठाचे अध्यक्षनअ‍ॅड. प्रभाकर वानखडे, अरुण तिजारे, बाळू देशमुख, प्रकाश तनपुरे, किशोर मानकर, किशोर खरवडे सलमान शेख,आकाश धामकर डॉ. प्रताप जायले, डॉ हर्षद ठाकूर, माणिक कापरे, भास्करराव चोंदे, सचिन मालकर, गौरव मोहाड इत्यादी उपस्थित होते.

कार्यक्रमाला उपस्थित असलेल्या सर्व मान्यवरांचे आभार प्रा. गंगाधर नाखले कुलसचिव यांनी मानले.

# FRS सक्तीमुळे आंगणवाडी सेवांमध्ये अडथळे

## केंद्रीय महिला व बाल कल्याण मंत्री यांची खा.बळवंत वानखडेंनी घेतली भेट



**अमरावती/प्रतिनिधीः-** देशभरातील आंगणवाडी सेवांमध्ये फेस रिकग्निशन सिस्टम (FRS) सक्तीमुळे गंभीर अडचणी निर्माण होत असल्याचा मुद्दा खासदार बळवंत वानखडे यांनी केंद्रीय महिला व बालविकास मंत्री यांच्या सोबत भेट घेऊन उपस्थित केला आंगणवाडी कर्मचाऱ्यांचे मानधन वाढविणे, सेवा अटी सुधारण्यासह FRS सक्ती तातडीने स्थगित करण्याची मागणी त्यांनी केंद्र सरकारकडे केली आहे.

बळवंत वानखडे यांनी सादर केलेल्या पत्रात नमूद केले की, एकात्मिक बाल विकास सेवा (ICDS) योजनेअंतर्गत आंगणवाडी केंद्रांमार्फत गर्भवती महिला, स्तनदा माता आणि लहान बालकांना टेक होम रेशन (THR) व पोषण सहाय्य दिले जाते. मात्र, पोषण ट्रॅकर ॲपमध्ये FRS सक्तीमुळे या सेवांच्या अंमलबजावणीत अडथळे निर्माण झाले आहेत.

ग्रामीण व दुर्गम भागांमध्ये इंटरनेट सुविधेचा अभाव, तांत्रिक त्रुटी आणि लाभार्थ्यांच्या प्रत्यक्ष परिस्थितीमुळे FRS प्रणाली प्रभावीपणे कार्यरत नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले. परिणामी, अनेक पात्र लाभार्थी योजनांच्या लाभापासून वंचित राहत असून, योजनेचा उद्देश धोक्यात येत असल्याची गंभीर बाब त्यांनी अधोरेखित केली.

यासोबतच आंगणवाडी कर्मचाऱ्यांच्या विविध मागण्याही त्यांनी पुढे मांडल्या. निकृष्ट दर्जाच्या टेक होम रेशनऐवजी ताजे शिजवलेले अन्न किंवा गुणवत्तापूर्ण अन्नधान्य देण्याची मागणी करण्यात आली आहे. तसेच, सर्वोच्च न्यायालयाच्या एप्रिल २०२२ च्या आदेशानुसार ग्रॅच्युइटीचा लाभ देशभरात लागू करण्याची मागणी करण्यात आली आहे.

बळवंत वानखडे यांनी आंगणवाडी कर्मचाऱ्यांना पूर्णवेळ कर्मचारी म्हणून मान्यता देऊन त्यांना वर्ग ३ व ४ कर्मचाऱ्यांप्रमाणे वेतनमान, महागाई भत्ता, इइ व पेन्शन सुविधा देण्याची गरजही अधोरेखित केली. निवृत्तीनंतर किमान १० हजार रुपये मासिक पेन्शन योजना लागू करण्याचीही त्यांनी मागणी केली आहे.

केंद्र सरकारने या सर्व मागण्यांकडे गांभीर्याने लक्ष देऊन तातडीने निर्णय घ्यावा, विनंती केली आहे.

# इन्स्टाग्रामवर प्रेम, गरोदर राहिल्यावर फसवणूक

## संभाजीनगरच्या तरुणाविरुद्ध अमरावतीत गुन्हा दाखल



**अमरावती/प्रतिनिधीः-** सोशल मीडियाच्या माध्यमातून ओळख झाल्यानंतर लग्नाचे आमिष दाखवून एका विवाहित महिलेवर अत्याचार केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. पीडित महिला गरोदर राहिल्यानंतर आरोपीने लग्नास नकार देत तिला जीवे मारण्याची धमकी दिली. याप्रकरणी अमरावतीच्या फ्रेजरपुरा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपासासाठी हे प्रकरण छत्रपती संभाजीनगरच्या वाळूज एमआयडीसी पोलिसांकडे वर्ग करण्यात आले आहे.

दोन मुलांची आई असलेल्या ३० वर्षीय महिलेचा इन्स्टाग्रामवर लव्ह स्टोरी सुरु झाली, पण गर्भवती राहिल्या नंतर आरोपीने तिला धोका दिला. लग्न करूयात म्हणून आरोपीने महिले सोबत अनेकवेळा शरीरसंबंध ठेवले. आरोपीने महिलेला जीवे मारण्याची धमकी दिल्यानंतर हे प्रकरण समोर आले. रेहान मोहम्मद शेख असे आरोपीचे नाव असून, तो छत्रपती संभाजीनगर जवळील राजनगाव येथील असून, पीडित महिलेने अमरावतीतील फ्रेजरपुरा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यानंतर पोलिसांनी या प्रकरणी गुन्हा दाखल केला. तपासासाठी हे प्रकरण एमआयडीसी वाळूज पोलीस ठाण्याकडे वर्ग केला. ३० वर्षीय पीडित महिलेचा विवाह झाला होता. तिला ८ आणि ५ वर्षांची दोन मुले आहेत. पतीला दारूचे व्यसन असल्यामुळे ती विभक्त झाली. त्यानंतर ती मुलांसह अमरावती येथे आईकडे ☞(पान २ वर)

# रिक्त पद भरतीसाठी आदिवासींचे भिकमांगो आंदोलन

## थाळी वाजून शासनाला जागे करण्याचे प्रयत्न



**अमरावती/प्रतिनिधीः-** आदिवासींचे १२ हजार ५०० रिक्त पद तात्काळ भरण्यात यावे, या मागणीसाठी विभागीय आदिवासी विद्यार्थी आंदोलन कृती समितीच्या वतीने आज बुधवार १८ मार्च रोजी जिल्हाधिकारी कार्यालया समोर भीक मांगो आंदोलन करून थाली वाजून शासन प्रशासनाला जागे करण्याचा प्रयत्न केला. जिल्हाधिकारी मार्फत आदिवासी मंत्रींना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, ☞(पान २ वर)

# साई मार्केटिंगमध्ये अग्नीतांडव, ५ लाखांचे नुकसान





## राम लक्ष्मण संकुल येथील घटना

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरातील राम-लक्ष्मण संकुल मार्केट यार्ड परिसरातील साई मार्केटिंग मध्ये मंगळवारीं रात्री अचानक आग लागल्याने एकच खळबळ उडाली. अग्निशमन दलाच्या वाहनाने घटना स्थळावर पोहोचून आगीवर नियंत्रण आणले मात्र तोपर्यंत पाच लाखाचे साहित्य जळून राख झाले होते.

माहितीनुसार राम लक्ष्मण संकुल येथील यार्ड मध्ये जयप्रकाश अशोककुमार वरदानी यांचे साई मार्केटिंग आहे. या दुकानात मंगळवारीं रात्री अकरा वाजता सुमारास अचानक आग लागली. दुकानातून आगी चे गोळे आणि धूर दिसल्याने येथून जाणाऱ्या नागरिकांनी याची माहिती अग्निशमन☞(पान २ वर)

# चित्रा चौक ते नागपूर गेट मार्गावर आजपासून नो एन्ट्री

## पर्यायी मार्गाचा वापर करण्याचे आवाहन



**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरातील चित्रा चौक ते नागपूर गेट उडानपुलाचे उर्वरित बांधकाम युद्ध स्तरावर सुरू आहे. उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार नियोजन पद्धतीने काम केले जात आहे. पुलाच्या उर्वरित कामासाठी आज पासून या मार्गावर वाहनांना प्रवेश बंदी करण्यात आलेली आहे. आज पासून ५ एप्रिल पर्यंत चित्रा चौक ते नागपुरी गेट मार्ग वाहतुकीसाठी बंद राहणार आहे. या कडे लक्ष देण्याचे आवाहन वाहतूक विभागाचे सहाय्यक ☞(पान २ वर)

# दर्यापूरात एसटीच्या चालकाचा उद्धटपणा

## प्रवास्यांची आगार व्यवस्थापकाकडे तक्रार

### नामफलक विनाच धावतात बसेस

खल्लार/प्रतिनिधीः- दर्यापूर येथील राज्य परिवहन महामंडळाच्या बसस्थानकाला नविन इमारत मिळाली, नविन बसेस मिळाल्या परंतु स्थानकामध्ये नेहमीच अनेक समस्या दिसत असून सोई सुविधांचा अभाव पाहायला मिळत असतो. त्यात आणखी भर म्हणजे बुधवारी (दि.१८) चालक व प्रवाशीसोबत घडलेला असभ्य वर्तनाचा प्रकार होय.

### चौकशी कक्षात तक्रार पुस्तीका नव्हती

बुधवारी बसस्थानकात बसचालकाने प्रवाशासोबत केलेल्या उद्धटपणाच्या प्रक्रारानंतर त्याचवेळी विशाल खंडारे हे चौकशी कक्षांत तक्रार नोंदविण्यासाठी गेले असता तेथील उपस्थित कर्मचाऱ्याने चक्क तक्रार पुस्तीका उपलब्ध नसल्याचे उत्तर दिले. साधा कागद देऊन यावरच तक्रार नोंदवा असे सांगितले. तक्रार पुस्तीका उपलब्ध नसणे हा गंभीर प्रकार या निमीत्ताने चव्हाट्यावर आला आहे हे विशेष.


दर्यापूर बस आगार मधिल काही मार्गावरील बसेस गेली कित्येक महीन्यांपासुन नामफलका विनाच धावतात. बरेचदा बसला पाटी नसल्याने प्रवाशी वाट पाहत बसतात अन् बस निघून पण जाते तर माहीत होत नाही.

दर्यापूर शहरातील साईनगर येथिल विशाल पांडुरंग खंडारे हे☞(पान २ वर)

# श्रीक्षेत्र सावंगा (विठोबा) नगरीत गुढीपाडवा

## रामनवमी यात्रा महोत्सवात लाखो भक्ताचा जनसागर उसळणार


## गुढीपाडव्यानिमित्त झेंडे चढविण्याचा सोहळा



**चांदूररेल्वे/प्रतिनिधीः-** तालुक्यातील श्री क्षेत्र सावंगा (विठोबा) येथील श्री विठोबा संस्थान उर्फ श्रीकृष्ण अवधूत बुवा संस्थान येथे गुढीपाडवा रामनवमी यात्रा महोत्सवात लाखों भक्ताचा जनसागर उसळणार आहे. या निमित्ताने हजारो क्विंटल कापुराची ज्योत प्रज्वलित होणार असून १९ मार्च सायंकाळी झेंडा चढविण्याचा नेत्रदीपक सोहळा पार पडणार☞(पान २ वर)

# मध्यरात्री अवकाळी पावसाचा कहर

## विजेच्या तडाख्यात नारळाचे झाड जळून खाक, जीवितहानी टळली




**चांदुर रेल्वे/प्रतिनिधीः-** चांदुर शहरात मंगळवारी मध्यरात्री सव्वा बाराच्या सुमारास अवकाळी पावसाने दमदार हजेरी लावली. अचानक आलेल्या पावसासोबत विजांचा कडकडाट सुरू झाला. याच दरम्यान शहरातील जुन्या सरकारी दवाखान्याजवळच्या परिसरात माजी नगर सेवक सुनिल राऊत यांच्या अगदी घराला लागून असलेल्या नारळाच्या झाडावर वीज कोसळल्याची घटना घडली. विजेच्या प्रचंड तडाख्यामुळे नारळाचे झाड पूर्णपणे जळून खाक झाले.

सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही. मात्र, मध्यरात्रीच्या सुमारास झालेल्या या घटनेमुळे परिसरात काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. दरम्यान या वेळी प्रभाग क्र. ४ चे नगर सेवक हर्षल वाघ, नगर परिषद उपाध्यक्ष बच्चू वानरे, नगर सेवक गजानन ठाकरे यांनी तातडीने रात्री अग्निशामक ☞(पान २ वर)

# अवैध वाळू तस्करी करणारा ट्रक जप्त

## २.५० लाखाचा ठोठवला दंड



**अमरावती/प्रतिनिधीः-** विना रॉयल्टी वाळूची वाहतूक करणाऱ्या १६ चाकी ट्रकवर बडनेरा पोलीस ठाणे हद्दीत महसूल विभागाच्या पथकाने कार्यवाही करून☞(पान २ वर)

# सणांच्या पार्श्वभूमीवर सोशल मीडियावर 'लक्ष'

## कठोर कारवाईचा पोलिसांचा इशारा

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरात आगामी सण-उत्सवांच्या पार्श्वभूमीवर शांतता व सुव्यवस्था टिकवून ठेवण्यासाठी पोलीस प्रशासनाने कठोर पावले उचलली आहेत. विशेषतः सोशल मीडियावर होणाऱ्या आक्षेपार्ह पोस्टिंगकडे पोलिसांनी बारकाईने लक्ष केंद्रीत केले असून, नियमभंग करणाऱ्यांवर थेट कारवाईचा इशारा देण्यात आला आहे.

१७ मार्च ते १५ एप्रिल या कालावधीत शहरात विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांची रेलचेल असणार आहे. या काळात कोणत्याही प्रकारे तणाव निर्माण होऊ नये यासाठी मिरवणुका,☞(पान २ वर)

# नगरसेवक सय्यद मुनज्जर अली यांना हायकोर्टातून दिलासा

## मनपा आयुक्तांच्या आदेशाला स्थगनादेश



**अमरावती/प्रतिनिधीः-** एमआयएमचे स्वीकृत नगरसेवक सय्यद मुनज्जर अली सैं. मुजफ्फर महानगरपालिका मध्ये कंत्राटदार असल्याने त्यांची सदस्यता रद्द करण्याचे आदेश मनपा आयुक्त सौम्या शर्मा यांनी मंगळवारी दिले होते. मनपा आयुक्तांच्या या आदेशाला सय्यद मुनज्जर अली यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठामध्ये आवाहन दिले होते. यावर सुनावणी दरम्यान न्यायाधीश कुबलकर यांनी मनपा आयुक्तांच्या आदेशाला स्थगनादेश देत सय्यद मुनज्जर अली यांना दिलासा दिला आहे. हायकोर्टाच्या निर्णयामुळे त्यांचे नगरसेवक पद कायम राहणार आहे. आता या प्रकरणाच्या पुढील सुनावणीकडे सर्वांच्या नजरा लागलेल्या आहे. राजकीय पक्षांमध्ये वेगवेगळ्या चर्चा यामुळे रंगलेल्या आहे. सय्यद मुनज्जर अली यांच्याकडून एड.अक्षय नाईक ,एड. श्रेयस वैष्णव, एड. संजय रावटे ☞(पान २ वर)





